# श्री साईलीला





रामनवमी विशेषांक

क़िंमत ७५ न. पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर**

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ६९६३१



# श्री सा ई वा क्सु धा

गुरुकृपेसाठी आपण झटले पाहिजे गुरूला शिष्याची चिंता असते. त्याने गुरूवर श्रद्धा मात्र ठेवली पाहिजे ज्याच्या अंत.करणांत श्रेष्ठ प्रकारचे वैराग्य नाही, जो नित्य अनित्य याचा कधीं विचार करीत नाही, त्याच्यावर गुरुकृपा व्हावी कशी ? गुरुपदकमलावर आपण निस्सीम श्रद्धा ठेवली पाहिजे. म्हणजे ईश्वर आपल्या साऱ्या इच्छा पूर्ण करतो. आपल्या गांठीला श्रद्धेचे पाठबळ भरपूर असलें पाहिजे, ज्ञानाचे गाठोडे भरपूर जोडले पाहिजे. सबुरीने, धीर धरून वागण्याची सवय मनाला लाविली पाहिजे. मग तुमचा मार्ग मोकळा झाला म्हणून समजा. शिष्याची मनोभूमिका तयार झालेली असावी लागते. मग सद्गुरुची भेट आपोआप व अचानकपणे होते. ती व्हायला मग वेळ लागत नाही. तुमची तयारी अगोदर होऊ द्या.

— श्रीसाईसच्चरित्

# श्रीसाईलीला


शिर्डी संस्थानचें अधिकृत मासिक |

वर्ष ४२ वें ] एप्रिल १९६३ [ अंक १ ला

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साइ निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

श्रीसाईलीलेचा हा श्रीरामनवमी विशेषांक वाचकाच्या हाती देताना आम्हांला नेहमीप्रमाणे अत्यंत समाधान वाटत आहे. गेल्या हजारो वर्षांपासून, ठराविक दिवशीं दर वर्षी रामनवमी येते व शिरडी येथे श्रीसाईबाबाच्या प्रेरणेनुरूप रामनवमी उत्सव प्रतिवर्षी मोठ्या समारोहाने साजरा केला जातो.

शिरडी क्षेत्रात दरवर्षी जे कांही उत्सव होतात त्या सर्व उत्सवाचा राजा म्हणजे रामनवमी उत्सव होय. प्रत्येक उत्सवाला महत्व हे असतेच, परंतु रामनवमी उत्सवाचे महत्त्व काही आगळेच आहे. कोणत्याही उत्सवापेक्षा या उत्सवार्थ जनसमर्दही विशेष मोठ्या प्रमाणात हजर राहून रामभक्तीच्या व रामनामाचा आनंद लुटीत असतो.

रामनामाचे महात्म्यच फार मोठे आहे. हिंदु समाजाच्या दृष्टीने ते नाव पुण्यपावन व तारक होऊन राहिलेले नाव आहे. भारतात प्राचीन कालापासून वंदनीय असे महापुरुष असंख्य होऊन गेले. परंतु रामनामाने आबाल वृद्ध जनतेच्या मनाची जी पकड घेतली आहे तशी दुसऱ्या कोणत्या नावाने घेतलेली आहे? सुशिक्षीत असो वा अशिक्षीत असो. ज्याच्या मुखातून रामनाम येत नाही असा हिंदु या जगात कुठेही सापडणार नाही.

साईबाबानी आपल्या हयातीत रामनवमी उत्सव सुरू केला व त्याची जबाबदारी आपले परम प्रिय शिष्य ह. भ. प. श्रीदासगणू महाराज याच्याकडे सोपवून तो अखंड चालू रहाण्याची चोख व्यवस्था केली. श्रीदास गणूनीही आपली ती जबाबदारी पार पाडण्यात कधीही कसूर केली नाही. जोपर्यंत त्याना हालचाल करण्याची शक्ति होती तोंपर्यंत त्यानीं शिरडी येथें जातीने हजर राहून वर्षानुवर्षे हा महोत्सव साजरा केला आणि नंतर आपले पट्टशिष्य श्री. अनंतराव आठवले त्याच्यावर त्यानी ही जबाबदारी सोपविली. ती शिरावर घेऊन उत्तमप्रकारे व अत्यंत समाधानकारकरीतीनें पार पाडण्यासाठीं मनोभावे झटणारा दुसरा कोणी सापडला असता किंवा नाहीं याबद्दल शंका वाटते. कारण या कार्यक्षेत्रातील अनंतरावजींची आजवरची कामगिरी खरोखर अभिनंदनीय व प्रत्येकास आत्यंतिक समाधान देणारी अशीच आहे. प्रतिवर्षी कर्तव्यबुद्धीने व आपल्या शिरावरील पवित्र जबाबदारी पार पाडण्यासाठी या उत्सवाच्या दिवसांत अनंतरावजी येतात व आपली कामगिरी

उत्तम प्रकारे पार पाडून जाताना सर्वांकडून धन्यवाद घेऊन जातात. त्याची परिणामकारक कीर्तनें हें या महोत्सवातील एक मोठ्यात मोठे आकर्षण होय.

या जगात दुसऱ्याकडून धन्यवाद मिळविणें व तसें वर्तन ठेवणे यासाठीं तर आपला जन्म आहे. जो जो आपले कर्तव्य श्रद्धायुक्त अंतःकरणाने पार पाडण्यासाठीं मनोभावें झटेल त्यालाच धन्यवादाची दौलत प्राप्त होत असते. अनंतरावजींनी ती दौलत मिळविली आहे.

बाबानीं रामचंद्र प्रभूला एवढे महत्त्व दिले व त्यांच्या प्रेरणेनुरूपे शिरडी येथें गेल्या अनेक वर्षांपासून रामजन्मोत्सव साजरा होत आला आहे असे आरंभींच सागण्यात आले. यावरून रामचरित्राला बाबा किती महत्त्व देत असत व एक आदर्श महापुरुष या दृष्टीने ते त्याच्याकडे पहात असत हे उघडच आहे. या जगांत जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाचे कल्याण झाले पाहिजे व त्यासाठी त्याच्यापुढें उच्चात उच्च असा आदर्श असणे जरूर आहे हे ओळखून बाबानी श्रीरामचंद्राचा आदर्श या महोत्सवाच्यारूपाने सर्वांपुढे ठेविला आहे. या उत्सवाचे हेच तर महत्त्व आहे. तें ओळखण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे.

रामनामाची गोडी अवीट आहे. ते कितीही वेळा घेतलें तरी कटाळा न येतां मन अधिकाधिक पवित्र बनत जाते, रामनाम हे सामर्थ्य आहे. त्यात अजब किमया भरलेली आहे. ' निर्बलके बल राम ' असे म्हटले आहे. जेथे रामनाम घेतलें जाते तेथे दुबळेपणा, निःसत्त्वपणा रहातच नाही. रामनाम हे पुरुषार्थाला व पराक्रमाला प्रेरणा देणारे आहे. आम्ही दुबळेपणा सोडून देऊन पराक्रमी बनावे, कर्तव्यपरायण बनावें, माता, पिता, पत्नी, बंधू, मित्र व गुरुजन. यापैकीं प्रत्येकाच्या बाबतींत आपले काही ना काही कर्तव्य असतें. ते पार पाडण्यातच मनुष्यत्व आहे. परतु आपल्याकडून त्या त्या वेळीं ते तें कर्तव्य पार पाडले जाते का? नाही. का नाहीं? आमच्या ठायी ती कर्तव्य बुद्धीची जाणीवच राहिलेली नाहीं. त्यामुळें आम्ही माणुसकी गमावून बसलों आहोत. माणसाने माणुसकी सोडली मग राहिले काय? अशा माणसाचा जन्म व्यर्थ होय.

प्रत्येक स्त्री पुरुषाला आपापल्या कर्तव्याची जाणीव व्हावी, त्याच्याकडून कर्तव्याचरण घडावें हेच त्याचे वैभव आहे. बाबा माणुसकीचे भुकेलेले. प्रत्येकानें कर्तव्याचरण करून व माणुसकीचा धर्म पालन करून जन्मा आलियाचें सार्थक करावे ही बाबाची अपेक्षा ती सफल व्हावी यासाठीं त्यांनी श्रीरामचंद्र प्रभूच्या पुण्यस्मरणाला एवढे महत्त्व दिले. आम्ही तें ओळखलें पाहिजे.

श्रीराम हा जीवन मंत्र आहे. संपूर्ण श्रद्धायुक्त अंतःकरणाने त्या पुण्यपावन मंत्राचा जो कोणी जप करील त्याचे कोटकल्याण झाल्याशिवाय रहाणार नाही. बाबानी तें बरोबर जाणले होते.

आम्हाला आमच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी श्रीराम जयंती प्रति वर्षी येते. हे येणे जाणे अखंड चालू आहे व पुढेही ते चालू राहील. नदीला पूर येतो आणि ओसरतो. झाडाना फुलाफळाचा बहर येतो आणि जातो. तसे आहे का हे ? या येण्या–जाण्याचा आमच्या मनावर शाश्वत टिकणारा परिणाम घडून आला पाहिजे. आमच्या मनाने रामनामाची कायमची पकड घेतली पाहिजे. त्या महं पुरुषाच्या जीवन कार्याचें रहस्य आम्ही ओळखले पाहिजे. मन तद्रूप झाले पाहिजे. मनाने तोच एकमेव ध्यास घेतला पाहिजे. त्याविना दुसरे काही सुचता कामा नये.

आमच्या जीवनात हा योग आम्ही साधावा हाच श्रीराम जयंत्युत्सवाचा संदेश आहे. तो आम्ही सदैव झेलावा व आपले सारे जीवन उजाळून सोडावे, त्या आदर्श महापुरुषाच्या प्रकाशात अहोरात्र वावरण्यासाठीं आम्ही झटावें हीच बाबांची इच्छा या प्रतिवार्षिक महोत्सवाच्या रूपाने प्रगट होत असते. त्या इच्छेपुढे आम्ही प्रेमादरपूर्वक मान वाकवूं या.

—संपादक



# रामनामाचें अचाट सामर्थ्य

**********************************

—डॉ. राजेंद्रप्रसाद

**महात्मा गांधी आणि डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणजे गुरु आणि शिष्य. जसे रामदास आणि कल्याण तसे. दोघेही रामभक्त. निस्सीम रामभक्त. त्यांच्या रामनाम भक्तीसंबंधी या अंकांत एक लेख देण्यांत आला आहेच. परंतु सत्शिष्य राजेंद्रप्रसाद यांना आपल्या गुरुजींच्या रामभक्तीबद्दल काय वाटत असे त्याची जाणीव करून देणारा हा लेख आहे.**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी या राष्ट्राला अनेक गोष्टी शिकविल्या व त्याला सामर्थ्यसंपन्न बनविले, परंतु महात्माजींच्या ठायी हें एवढे सामर्थ्य आले तरी कुठून ? त्यांचा आधार कोणता होता ? कोणत्या आधारावर ते स्वतः सामर्थ्यसंपन्न बनले ? त्यांनी भारताला सामर्थ्याचा मंत्र दिला, एवढेच नव्हे तर सर्व जगाला दिला. केवढे हे त्यांचें सामर्थ्य ? पण तें आलें कुठून ?

त्यांनी वेळोवेळी सांगितले आहे व लिहिलेही आहे की त्यांचा सर्व आधार रामनामावर होता. त्या नावावर त्यांची संपूर्ण श्रद्धा होती. त्या श्रद्धेच्या प्रकाशात ते सदैव वावरत होते. रामनामाने त्यांना सामर्थ्यवान् केलें व तेंच सामर्थ्य ते भारताला व साऱ्या जगाला देऊ शकले.

### रामनाम हीच प्रेरक शक्ति

त्या रामनामांत दैवी सामर्थ्य साठवलेलें आहे अशी त्यांची संपूर्ण श्रद्धा होती. त्या श्रद्धेच्या बळावर ते वावरत होते. त्यांनी जे जे विजय मिळविले त्यांच्या मागें ही प्रेरकशक्ति होती. शेवटपर्यंत त्यांनी रामनामाची कांस सोडली नाहीं. आयुष्याच्या अखेरच्या क्षणीं त्यांच्या मुखावाटे फक्त दोनच शब्द बाहेर पडले. कोणते ते ? 'हे राम !'

रामभक्त तुळसीदासजींनी एके ठिकाणीं स्पष्ट म्हटले आहे कीं, साधुसंतही जीवनभर रामाची भक्ति करतात; पुष्कळ लोक राम राम जपत असतात. परंतु अखेरच्या क्षणीं त्यांना रामनामाची विस्मृति पडते. जे खरे पुण्यवान् असतात, ज्यांनीं जीवनभर सत्कृत्यें केलेलीं असतात त्या पुण्यवंतांच्या मुखावाटेच शेवटच्या क्षणीं रामनाम बाहेर पडूं शकतें !

## शेवट गोड व्हावा

आणि शेवटची घटकाच साधायची असते. जन्मभर यातायाती करावयाच्या, बरी वाईट कृत्ये करावयाची; कशासाठी ? 'शेवटचा क्षण गोड व्हावा' म्हणूनच ना ? परंतु ते भाग्य मात्र सर्वांच्या वाट्याला येत नाही.

गांधीजींचें सारे जीवन मानव सेवेच्या रूपाने देवसेवेला वाहिलेले. त्यांचें जीवन हे समर्पित जीवन होतें. प्रत्येक कृत्य ते देवाच्या नावाने व देवासाठी करीत होते. गांधीजी म्हणजे भगवताच्या हातचे एक साधन होते. आपल्या सर्व सामर्थ्यांचा सदुपयोग त्यांनी मानवजातीच्या उद्धारासाठी केला, आणि जेव्हा त्यांच्या जीवनात शेवटचा क्षण आला तेव्हा राम, राम म्हणत त्यांनी या जगाचा निरोप घेतला. ते सतत देवाच्या सान्निध्यात होते व म्हणून तर त्यांनी शेवटचा क्षण साधला.

## आम्ही देवाचे नाव घ्यायला लाजतो !

आणि आम्ही ? आम्हाला देवाचे नाव घ्यायला वेळच नाही. आम्ही देवाचे नाव घ्यायला लाजतो. कोण काय म्हणेल याची धास्ती वाटते आम्हांला ! देवाचें नाव घेतलेच तर ते घ्यायचे म्हणून घेतो. त्यात आमचे अंतःकरण नसतें. ते नाव ओठावरचे ओठावरच रहाते. ते अंतःकरणाचा ठाव घेत नाहीं. मग त्यापासून जरूर तो लाभ कसा होणार आपणाला ?

रामनामानें अंतःकरण उजळावें लागते. रोमरोमात तें भिनावे लागते. तेव्हा त्याचा इष्ट परिणाम घडून येतो.

अंतःकरणापासून आम्ही रामनाम घेतले व त्याने आपल्या अंतरंगाचा ठाव घेतला तर त्या नावाचा विसर आपणास कधीही पडणार नाहीं.

आज जगात सर्वत्र अशांतता व प्रलय दिसून येत आहे; कारण आम्ही स्वतःला ओळखले नाही व इतरांचीही ओळख आपणास पटलेली नाही. ती पटली असती तर आम्ही एकमेकाशीं भांडत व नसते तंटे उपस्थित करीत राहिलों नसतों. आम्हाला देवाचा विसर पडलेला आहे व त्यामुळे देवही आमच्यापासून दूर दूर गेलेला आहे.

## देव अनंतरुपानी नटला आहे

देव एकमेव असला तरी अनंत रूपांनी नटलेला आहे; प्रत्येकाच्या अंतःकरणात त्याचें वास्तव्य आहे. ही गोष्ट जोपर्यंत आम्हाला पटली नाही व आम्हीं पटवून घेण्याचा घेण्याचा प्रयत्न केला नाहीं, तोपर्यंत हें असेंच चालावयाचें.

या महान् तत्वाचा आम्हाला विसर पडला आहे व म्हणून 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसग ' अशी स्थिती वाट्यास आलेली आहे !

कोण कोणाला मारूं शकत नाही व कोणीही मरत नाही. जीवात्मा अमर आहे.

**रामनामाचे महत्त्व कां ?**

सर्वांनी रामनामावर श्रद्धा ठेवावी व स्वतःचे जीवन सुधारावें अशी महात्माजीची महत्वाकांक्षा होती. त्याचे कारण मग सर्वत्र शांतता, बंधूभाव व प्रेमभाव यांचें राज्य होईल व लोक सुखी होतील.

महात्माजीची प्रार्थनेवर, रामनामावर असीम श्रद्धा होती ! प्रार्थनेशिवाय त्याचा एकही क्षण गेला नाही. सर्व लोकाना रामनामाचा लाभ घडावा, सर्वांना त्या नावाची दीक्षा द्यावी म्हणून ते सायप्रार्थना जेथे जात तेथे घडवून आणीत असत. व रामनामाच्या गजराने सारे वातावरण दुमदुमून सोडीत असत. यात त्याचा हेत कोणता होता हे आपण आता तरी ओळखले पाहिजे.



दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM — DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

याच्या येथे तज्ञ डॉक्टराकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

**छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८**

# रामकथेचें महात्म्य

: लेखक :

**आप्पाराव**

**रामायणासारख्या सुंदर काव्याची रचना करून त्याद्वारे वाल्मिकीनें आर्यांचा सर्वोत्तम व उच्च आदर्श जगापुढे ठेविला आहे. या जगांत विविध नात्यांनी एकमेकांशी आपले संबंध जडतात. परंतु ते ते नाते, ती ती आपल्या वाट्यास आलेली भूमिका शोभवावी कशी व या जगांत कृतकृत्य कसे व्हावे याची शिकवण, वाल्मिकींनी रामायणांत निरनिराळ्या नात्यांची वेगवेगळी पात्रे निर्माण करून दिली आहे.**

त्यामुळें रामायण हा महाग्रंथ सर्वांना सर्वकाळी आदर्श होऊन रहाणारा आहे. हजारो वर्षे लोटली तरी त्या महाकाव्याची गोडी अवीट होऊन राहिली आहे. ते कितीही वेळा वाचा, त्याला शिळेपणा कधीच येत नाहीं. नेहमी ताजा सुगंध त्यातून दरवळत असतो. यामुळेंच जगातील महाकाव्यांत त्याची प्रामुख्याने गणना केली जाते.

## सारें कांही आदर्शवत्

दशरथच पहा ना. आदर्श पिता कसा असावा याचे उत्तम चित्र दशरथाच्या रूपानें खडे करण्यांत आलें आहे. आदर्श माता कशी असावी याची खुणगांठ सुमित्रेच्या जीवनावरून बांधतां येते. आदर्श पुत्र कसा असावा व आदर्श राजा कसा असावा याचा उच्चांत उच्च आदर्श श्रीरामचंद्र प्रभूच्या रूपाने आपल्यापुढें उभा करण्यांत आलेला आहे. बंधू व मित्र कसा असावा, बंधुप्रेम कुठवर जाऊ शकते व केवढा त्याग करूं शकते याचे सुंदर दर्शन आपणाला भरताच्या रूपानें घडते. अन्यायाशी असहकार करणारा आदर्श बंधू व सेवक लक्ष्मणासारखा कुठें पहायला मिळेल का ? आदर्श भक्त, आदर्श दास कसा असावा याचा मूर्तिमंत दाखला म्हणजे हनुमानजी.

पत्नी कशी असावी तर सीतेसारखी. सीतामाईच्यारूपानें किती उच्च आदर्श स्त्रियापुढें ठेवण्यात आलेला आहे !

## दुष्ट प्रवृत्तीचीहि पात्रे आहेत

हें झाले मानवाच्या ठायीं असणाऱ्या सद्भावनासबंधीं. सारीच माणसे अशीं उच्च आदर्श शोभविणारी जगात नादत असती तर काय ? या भूवर स्वर्गच अवतरला असता ! परतु प्रत्यक्ष व्यवहारांत आपण काय बरे पहातो ? जिकडे तिकडे विषम व भिन्न स्वभावाचीं व वृत्तीची माणसें. या जगात सैतानी व दुष्ट प्रवृत्तीची माणसे थोडी थोडकी का आहेत ? त्या दुष्टपणाचे नमुने तरी किती विविध व विस्मयकारक ! तो दुष्टपणा पाहून मन सुन्न होते ! अशा प्रकारची दुष्ट प्रवृत्तीची माणसेही वाल्मिकी मुनींनी रामायणाच्या द्वारें आपल्या पुढे ठेविली आहेत. दुष्टाचा शेवट दुःखातच व्हावयाचा !

## मदांध माओचे काय होणार ?

कैकयी ! काय तिची इर्षा व महत्त्वाकांक्षा ! त्यापुढे तिला दुसरें काही दिसत नव्हते. साम्राज्यशाहीच्या मदाने मनुष्य कसा फुगून जातो, कसा आंधळा बनतो, देव, धर्म या सर्वांना कसा गुडाळून ठेवतो व सर्व भक्षक कसा बनतो हे रावणाच्या रूपाने स्पष्ट करण्यात आले आहे. हा मद शेवटपर्यंत टिकू शकतो काय ? नाही. साम्राज्यमदानें धुद झालेल्या कोणाचाही मद, गर्व वा अहंकार आजवर टिकू शकला नाही. त्याच्या वाट्याला एक दिवस सर्वस्व नाशाचा येतोच येतो. 'मना सांग बा रावणा काय झाले ?' असा रामदासस्वामींनी मनाला प्रश्न विचारला आहे. मदांध हिटलरचे काय झालें ?' आणि जे त्याचें झाले तेच शेवटीं साम्राज्यतृष्णेने बेफामपणे वागणाऱ्या व मित्रराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या चीनच्या मदांध माओचें होणार आहे !

हें भविष्य अटळ आहे. ते वर्तविण्यासाठी कोणत्याही भविष्यवाद्याची जरूरी नाही.

## राम राहिले–रावण लयाला नेले !

या जगात हजारो वर्षापूर्वी रावण नांदत होते. त्या वृत्तीचीं माणसे आज का कमी आहेत ? आजही आपल्या सभोंवार रावणाचें राज्य चालू आहे, परंतु ते टिकणारे नाहीं. तें एक दिवस कोलमडून पडणार आहे. त्याला शाश्वती नाही. मग टिकणारे राज्य कोणते ? रामराज्य ! ज्याच्या पाठीशी सदाचार आहे, ज्याची उभारणी न्यायाच्या पायावर झाली आहे, जेथे मानवता वास करीत आहे, जेथें धर्म आहे, न्याय आहे व नीति आहे तेंच राज्य चिरंतन काळ टिकूं शकतें.

वाल्मिकी एक रावण निर्माण करून व शेवटी त्याच्या ललाटी काय लिहिले असते हे सागून तेवढ्यावर थाबला नाही. जगात दुष्टपणासुद्धा नाना प्रकारचा असतो व तो नाना प्रकारे थैमान घालीत असतो.

कोणाला आपल्या शारीरिक बलाचा गर्व वाटत असतो. त्यापुढे त्याला सारे जग तुच्छ वाटत असते! वालीला अशाच प्रकारच्या अहकार झालेला होता. त्याचा शेवट अखेरीस काय बरें झाला? सुग्रीव म्हणजे परावलबीपणा! त्यामुळें मनुष्य कसा निर्बल बनतो व असहाय्य होतो हे पहायला मिळते.

मारिच कसा आहे? त्याला अन्यायाची भारी चीड, चीडच नव्हे तर आत्यंतिक तिरस्कार! परतु त्याचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्याच्याठायी नव्हते त्याच्यात हिंमत नव्हती. हा दोषच होय. अन्यायाची केवळ चीड आली म्हणजे तेवढ्यावर आपले कर्तव्य सपत नाही. त्याचा प्रतिकार करता आला पाहिजे.

या जगात झोपाळ, आयतखाऊ व आळशी माणसे किती तरी असतात. त्याना त्या पलिकडे दुसरे तिसरे काही एक सुचत नाही.

## कुंभकर्णाची वृत्ति पहा !

इद्रजित म्हणजे आसुरी संपत्तीचा अग्रदूत! शूरवीर परतु आसुरी भावना चिकटलेली! त्याचा शेवट काय व्हायचा तोच झाला.

## राजा कसा असावा ?

राजा कसा असावा याचे सुंदर चित्रण वाल्मिकी मुनींनी रामायणात केले आहे. राजाला राजसिंहासन मिळतें तें कशासाठी? स्वतःच्या सुखोपभोगासाठी का? प्रजे कडून करभार उकळायचा आणि त्याचा विनियोग स्वतःच्या सुखोपभोगासाठी करावयाचा!

आज भारतातील राजसिंहासने झाडून सारी रिकामी पडलेली आहेत! याचे प्रमुख कारण म्हणजे राजेलोकानी आपले कर्तव्य ओळखले नाही; त्यानी आपल्या राज्याधिकाराचा दुरुपयोग प्रजेला पिळून काढून स्वतःचा तळीराम गार करण्याकडे केला! याला अपवाद काही राजसिंहासने होतीं. नाही असे नाही, परतु तीं फार थोडीं! सुक्याबरोबर ओलेही जळते म्हणतात ना? तशी तीं जळून खाक झाली! ती जळून खाक झाली तरी कीर्तिरूपाने ती अमर होऊन राहिली आहेत. जगणें मरणे हे का कोणाच्या हातचें आहे? परंतु मरणातही अमरत्व असतें हें विसरून चालणार नाही.

## श्रीरामचंद्र म्हणजे आदर्श राजा

प्रजेच्या कल्याणासाठी, सर्वांगीण विकासासाठी जगणारा तो खरा राजा.

त्यानें प्रजेचें पिता, प्रजेचा सेवक बनलें पाहिजे. म्हणजे प्रजा त्याला मस्तकावर घेऊन नाचल्याशिवाय रहाणार नाही. प्रजेकडून मानाचा मुजरा मिळविणें यांतच राजाची इति कर्तव्यता आहे. राजाने प्रजेच्या अंतःकरणांत बहुमानाचे स्थान मिळविलें पाहिजे. त्यानें प्रजेच्या सुखासाठी सदैव झटत राहिले पाहिजे. तेथे धर्माला, न्यायाला व नीतीला अधिष्ठान असले पाहिजे.

श्रीरामचंद्र हा अशा प्रकारचा आदर्श राजा होता. त्याने स्वतःच्या सुखाची कधींही चर्चा केली नाही. प्रजा रंजन, प्रजा पालन, प्रजेचें सुख व समृद्धि हेच त्याने आपले सर्वस्व मानिले. प्रसंग आला तेव्हा स्वतःच्या प्राणाहून प्रिय पत्नीचाही त्याग करायला त्याने मागें पुढे पाहिलें नाही!

## सर्वांपुढे उच्च आदर्श

रामायणातील बारीकसारीक गोष्टीही किती सुंदरतेने रंगविण्यात आल्या आहेत. राजाने एक पत्नी व्रत पाळून प्रजेपुढे तो उच्च आदर्श ठेविला पाहिजे. राम व जनक हे जांवई सासरे. किती गोड संबंध होता तो! कौसल्या व सीता. सासू आणि सून किती आदर्श नाते होतें तें!

अशारीतीने रामायणातील सर्व पात्रें म्हणजे कालच्याच नव्हे तर आजच्याही काळांत वावरणारी आहेत. आणि त्यामुळेच मानवी मनावर त्याचा चिरकालीन ठसा उमटू शकतो,

ज्या काळात रामायणाची रचना झाली व ज्या काळात रामराजा होऊन गेला त्या काळास हजारो वर्षे होऊन गेली. तरीही भारतीय जनता रामाचें पुण्यस्मरण, रामाचा जयंत्युत्सव भक्तिभावानें आजही त्याच उत्साहानें करीत आहे व पुढेही करील.

श्रीसाईबाबांनी शिरडी येथील उत्सवात श्रीरामजयंत्युत्सवास अग्रपूजेचा मान दिला व वर्षानुवर्षे तो उत्सव त्या पुण्यक्षेत्रात वाढत्या समारोहाने चालू आहे तो उगाच नाही.

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा.
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

एक पौराणिक कथा—

# रामभक्त तुळसीदास

उत्तरदेशामध्ये हस्तिनापूर या नावाचे एक शहर होतें त्याठिकाणी आत्माराम या नांवाचा एक कनोजी ब्राह्मण राहत असे. तो मोटा चतुर असून बादशहाच्या नोकरीत तत्पर होता. त्याचे शहाणपण पाहून बादशहा त्याच्यावर प्रसन्न असे. या आत्मारामाच्या पोटीच तुलसीदासाचा जन्म झाला. कलियुगामध्ये मनुष्याच्या आचारात बहुत दोष उत्पन्न झाले आहेत असे पाहून लोकाना भजनमार्गास लावण्या करिता वाल्मिकीऋषीस मृत्युलोकी अवतार धारणा करण्याबद्दल परमेश्वराची आज्ञा झाली. त्याप्रमाणे त्या आद्य कवीनेच हा तुळशीदासाचा अवतार धारण केला. अशी तुळशीदासाबद्दलची पुराणातरी आख्या आहे. तुळशीदासाचें मौंजीबंधन झाल्यानंतर त्यास बारा वर्षे ब्रह्मचारी ठेवून आत्मारामानें त्याच्याकडून विधियुक्त स्नानसंध्या व वेदाध्ययन करविलें. तुळशीदासास तारुण्यदशा आली असे पाहून आत्मारामाने त्याचा विवाह केला. तुळशीदासाच्या बायकोचें नाव देवीममता असे होते. त्या दोघांमध्यें अस्खलित प्रेम बसत होते. तुळशीदासास बायकोवाचून एक क्षणभरही चैन पडत नसे. देवीममता ही पतिनिष्ठ असून पतिव्रतेच्या आचरणाने संपन्न होती.

### ममताईने माहेर गाठले

आत्मारामाने तुळशीदास कर्तासवर्ता झालासे पाहून त्याला बादशाही नोकरीत घातले. कोणी एके प्रसंगीं तुळसीदास बादशहाच्या स्वारीबरोबर दूरगावी हिंडत असताना ममताईस माहेराहून बोलावणे आलें. तुळसीदास घरी परत येण्यापूर्वीच मी माहेराहून परत येईन असें कबूल करून ममताई सासुसासऱ्याच्या अनुज्ञेनें माहेरपणास गेली. योगायोग असा जमून आला की, ममताई माहेरीं गेली त्याचदिवशी संध्याकाळी तुळशीदास स्वारीहून घरी परत आले. घरामध्ये कुटुंब कोठे दिसत नाहींसे पाहून त्यानी त्यासंबधी चौकशी केली तो त्यांना ममताई माहेरी गेल्याचे समजून आलें बायकोच्या भेटीस आतुर झालेल्या तुळशीदासांची अशी ही निराशा झाल्यामुळे त्याना मुळीच चैन पडेना. रात्री आंथरुणावर पडल्यानंतर तुळशीदासांना मुळींच झोप कसली ती येईना. विरहव्यथेनें व्याकूळ होऊन तुळशीदास तसेंच उठले आणि त्यांनी स्वशुर-

गृही जाण्याचा बेत ठरविला. रात्रीच्या रात्री पाच कोस वाट तुडवून तुळशीदास सासुरवाडीच्या दरवाजात येऊन दाखल झाले. त्यांनी दाराला धक्का देऊन पाहिला पण दरवाजा बंद होता. चोहोकडे सर्वत्र सामसूम होते. आपण इतक्या रात्रीं मार्गक्रमण करून येथवर आलो पण आता आपला वाड्यात शिरकाव कसा होतो या विवंचनेत ते वाड्याच्या मजल्याकडे पाहू लागले. तो माडीच्या खिडकीतून एक दोर खाली सुटला आहे असे त्याच्या लक्षात आले. त्याचे सर्व चित्त ममताईच्या आलिंगनसौख्याकडे वेधून राहिले असल्याने त्यानी निःशंकपणानें तो दोर धरून खिडकीवाटे मंदिरामध्ये गमन केले. माणसाची चाहूल लागतांच सेवक लोक जागे झाले. परंतु, तुळशीदासास पाहून ते नुसते विस्मयान्वित होऊन राहिले. सेवकाकडून प्रथमतः ममताईला हे वृत्त कळविण्यात आले.

## गृहप्रवेश कसा झाला ?

ममतादेवीने भ्रताराची मूर्ति पाहून आश्चर्य प्रदर्शित केले. ममताईने लागलीच प्रश्न केला की ' आपणास वियोगदुःख असह्य होऊन आपण इकडे आला यात काही नवल नाही. पण "इतक्या रात्रीं मंदिरामध्ये आपला शिरकाव कसा झाला ?" यावर तुळसीदासांनी खरा वृत्तांत सांगितला. खिडकीत लोंबत असलेल्या दोराचे वर्तमान खरें की खोटें याची प्रचीति पाहण्याकरिता ममताई सर्व सेवकासहवर्तमान पुढील उपरीच्या खिडकीकडे गेली. दिव्याच्या उजेडात खिडकीची पाहणी केली तो त्या ठिकाणी दोर नसून त्याच्या ऐवजी एक लांबच लांब कृष्णसर्प खिडकीतून खाली लोंबत आहे असें सर्वांच्या पाहण्यात आले. तुळशीदास दोर समजून त्या भुजंगास धरूनच माडीवर चढले अशी खात्री होऊन ममताई आपल्या भ्रतारासह आपल्या एकांत मंदिरात गेली. बायकोच्या नादामुळे तुळशीदासाची जी निर्मान स्थिति झाली ती ध्यानात घेऊन ममताई आपल्या प्रियकरास म्हणाली, " हे प्राणनाथ, आपलें मजवर निस्सीम प्रेम आहे यात शंकाच नाहीं. विषयप्रेमाच्या मोहाने तुम्हीं सर्प धरिला खरा. पण तो जर तुम्हास डसला असता तर तुमचा व्यर्थ अंत झाला असता. आपण चतुर, शहाणे म्हणविता, पण आपणाजवळ विवेक नाही. आपण अज्ञानमदाने धुंद आहा तुमचे जन्मदाते आईबाप जवळ असता त्याचा त्याग करून तुम्ही विषयाकरिता एवढ्या रात्री पाच कोस जमीन तुडवून येथें धावत आला आणि बेदर्दपणें सापाला धरून माडी चढलात. असा हा बेदर्दपणा परमेश्वरप्राप्तीकरिता स्वीकारिला तर जन्माचें सार्थक तरी होईल तुम्ही स्त्री काम—लुब्ध बनला आहां. पण हा स्त्रीकाम तुम्हाला चकवील. रावण, इंद्र इत्यादीचा नाश स्त्रीमोहामुळच झाला. हृदयामध्यें वास्तव्य करणारा आत्मा न ओळखिता तुम्ही स्त्रीकाम धरून विषयामध्यें भ्रांत होतां हें अज्ञान होय. पुत्र, दारा, संपत्ति यावर जशी प्राण्याची आसक्ति असते त्याप्रमाणें सकळ—विश्राम—श्री—राम

चरणावर आसक्ति ठेविली तर नरजन्माचें चीज होईल." ममतादेवीचा हा उपदेश ऐकून तुळशीदासांना अनुताप उत्पन्न झाला. त्याचक्षणीं त्यांनीं ममतादेवीस ' माता ' म्हणून प्रणाम केला. तिच्या ज्ञानोपदेशाबद्दल तिचे उपकार मानले. त्यांना आपण वाल्मिकी असल्याबद्दल आठवण झाली. परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें आपणास अज्ञ-जनांना भजनमार्गाला लावण्याचें काम बजाविलें पाहिजे अशी जागृति होऊन तुळशी-दास तेथून उठून आनंदवनाप्रत निघून गेले.

## तुळशीदासाचा पश्चात्ताप

भागीरथीचें स्नान करून त्याठिकाणीं तुळशीदास अनुष्ठान करू लागले. त्यांनीं अन्न वर्ज केलें. त्यांनीं गलित पत्रांचे सेवन आरंभिलें. अहोरात्र नामस्मरण चालविलें. अयोध्यावासी जानकी जीवनानें दर्शन द्यावें म्हणून तीव्र अनुष्ठान करण्यांत तुळशीदासानीं एक तप खर्च केलें. रामदर्शन होण्याकरितां तुळशीदासांची तपश्चर्या चालू होती त्या वेळचा त्यांचा क्रम असा असे कीं, ते देहधर्माकरितां जाऊन परत येतांना राहिलेलें पाणी नित्य एका झाडाखालीं ओतींत असत. त्या जागीं एक बलवत्तर पिशाच होतें. दासांच्या उदकदानानें तें पिशाच संतुष्ट झालें. बारा वर्षें उदकपान केल्यानें प्रसन्न होऊन एके दिवशीं तें पिशाच तुळशीदासापुढें प्रकट झालें. रामदर्शनाची इच्छा करीत असतां भूत-दर्शन झालेलें पाहून तुळशीदास विस्मय पावले. त्या पिशाच-दर्शनानें खट्‌टू होऊन दासांनीं उद्वेग प्रगट केला. कल्पतरूच्या शोधार्थ कष्टत असतां शिंदीवन प्राप्त व्हावें किंवा नंदिनीप्राप्तीच्या इच्छेनें गिरि-विवरें धुंडाळीत असतां सूकराचा लाभ व्हावा तद्वतच रामचरणाच्या ऐवजी पिशाच-चरण दृष्टीस पडलेसें पाहून तुळशीदासांनीं बहुत निराशा व्यक्त करून दाखविली. तेव्हा, त्या पिशाच्चानें त्यांना सांगितलें, ' आपण दिलगीर होऊं नका. आपण विचक्षण आहां: साधक आहां. कार्यसाधक लोक कार्यसाधन होत असेल तर नीचपदार्थांचेंही सेवन करितात. मी पिशाच्च आहे तरी आपलें कार्य करीन. माझा अव्हेर करूं नये. शिंदीपाडे अपवित्र असले तरी झाडण्याच्या कामीं केरसुणीचा स्वीकार करणें उचितच आहे. मी आपणास इच्छित वस्तुदर्शनाची किल्ली सांगेन.'

## पिशाच्याचें प्रतिपादन

कार्यसाधनाच्या प्रसंगीं शहाण्यानें लहानथोर हा भेद ठेवू नये. हे पिशाच्चाचें प्रतिपादन दासांना रुचलें. दासांनीं त्याला राम-दर्शनाचा हेतु कळविला. तेव्हां त्या पिशाच्याकडून दासांना असें समजलें कीं, आपण ज्या ठिकाणीं पुराण-श्रवण करण्यास जातों त्याठिकाणीं एका वृद्ध ब्राह्मणाच्या रुपानें प्रत्यक्ष मारुती येऊन बसतो तो आपणास राम-दर्शन करवील. तो वृद्ध ओळखण्याविषयी खाणाखुणाही

त्या पिशाच्चाकडून समजल्या. त्याप्रमाणें तुळशीदास दुसऱ्या दिवशीं पुराणाला गेले. त्यांनीं लक्षणें नीट न्याहाळून पाहून वृद्ध ब्राह्मणास ओळखिलें. हरयेनमः होऊन सर्व मंडळी जिकडल्या तिकडे गेल्यावर तुळशीदासांनीं त्या वृद्धब्राह्मणाच्या मागोमाग गमन केलें. नगराबाहेर पडताच दासांनी ब्राह्मणाचे पाय धरिले. ब्राह्मणाने दीन-स्वराने आश्चर्य दर्शविले. दासांनी त्याच्या पायाला घट्ट मिठी मारून विनंती केली की, "आपण साक्षात् रामभक्त मारुती आहां. आपण आता मजवर रामदर्शनाचा अनुग्रह करावा." तुळशीदास हा साक्षात् वाल्मिकी आहे असें जाणून मारुतींनीं त्यास उठवून पोटाशी धरिलें आणि रामदर्शनाचा योग घडवून आणण्याचे आश्वासन देऊन वायुकुमार अदृश्य झाले. मारुतीच्या विनतीवरून श्रीरामचद्रांनी तुळशीदासास दर्शन देण्याकरिता फकिराचा वेष घेऊन त्याच्या आश्रमा-वरून गमन केलें. तुळशीदासांनी तो फकीर पाहिला, पण तो कोणी सामान्य यवन असेल असे धरून चालून तुळशीदासानी त्याचा मोठासा विचार केला नाही. कांहीं वेळाने मारुतीरायानें तुळशीदासाची गाठ घेऊन त्याला रामदर्शनाबद्दल प्रश्न केला त्या फकिराचीही आठवण करून पाहिली; पण तुळशीदासानीं रामचद्रास जाणलें नाहीं असे समजून कपिराय बोलला 'चालता चालता हाताला परीस लागत असता तुम्हीं जर तो दगड म्हणून फेकून दिला तर त्याला दुसऱ्यांनी काय करावें? राजहंसाची टोळी टोळी दृष्टीस पडली असता तुम्ही जर त्याना कावळे समजून दगड माराल तर ते तुमचे दुर्भाग्य होय. प्रत्यक्ष रामचद्रानी अविधरूपानें तुमच्या आश्रमावरून गमन केलें असता तुम्ही त्याना सामान्य फकीर समजून स्वस्थ बसला तर त्यांत आमचा काय दोष आहे?' मारुतीरायाचें हें भाषण ऐकून तुळशीदास बोलले "स्वामी; आपण मला दोष लाविता पण त्यात माझी चूक नाहीं. परमात्म्याचा भागच असा आहे की, तो विश्वव्यापी असून अगोचर आहे, नीरापासूनच जरी क्षीराची उत्पत्ती आहे तरी क्षीर म्हणून नीर घेता येत नाही. पृथ्वीतलावरील सर्व पाणी तेथून एकच होय. तरीपण चातक या भूमीवरील उदकाचा स्वीकार करीत नाहीत, त्याप्रमाणे सर्व विश्वांत रामस्वरूप कोंदाटून राहिले आहे तरी श्रीरामोपासक वाल्मीकीने वर्णिलेल्या ध्यानावाचून अन्य ध्यान मानीत नाहींत.' दासाचे हे श्रद्धापूर्ण भाषण ऐकून मारुती संतुष्ट झालें. त्यानी दासाना परमेश्वराचें सगुण रूप दाखविण्याचे वचन दिले आणि ते अदृश्य झाले. पुढे काहीं काळानें त्या अंजनीतनयाच्या कृपेनें दासाना रामचंद्रानीं दर्शन दिलें. डोक्यावर देदीप्यमान मुगुट घातला आहे, पीतांबर धारण केला आहे, हातामध्ये धनुष्यबाण धरिला आहे अशा प्रकारची घनश्यामवर्णी रामचद्राची मूर्ति पाहून तुळशीदास सद्गदित झाले. दासानीं प्रभु-चरणा-वर मस्तक ठेविले. देवानीं दासाला उचलून पोटाशीं धरिलें, आणि कलियुगामध्ये योगादिसाधनें व्यर्थ आहेत. असे सांगून दासाना नाममहिमा प्रकट करून जनतेला भक्तिमार्गाला लावण्याची अनुज्ञा देऊन प्रभु गुप्त झाले.

## महात्म वाढत चाललें

हा सर्व प्रकार लौकरच जगजाहीर झाला. तुळशीदासांचें माहात्म्य फार वाढलें. मोठमोठे श्रीमान लोक अपार द्रव्य दासांना अर्पण करूं लागले. कोणी वस्त्रें, कोणी अलंकार देऊन जो तो आपापल्यापरी दासांची सेवा करूं लागला. तरी पण या भाग्यानें दासांच्या वृत्तींत मुळींच फरक पडला नाहीं. आकाशाच्या ठिकाणीं जसे तिन्ही काळ प्राप्त होतात तरी तें जसें संगदोषापासून अलिप्त असतें तद्वत तुळशीदास हर्षशोकापासून निराळे होते. त्यांच्या पंक्तीस सहस्र ब्राह्मणभोजन होत असे, रात्रींच्या प्रहरी कीर्तनाचा घोष चालत असे. नामोच्चारानें परमेश्वरास तोषविण्याकरितां रात्रीं भाविक लोकांच्या झुंडीच्या झुंडी आश्रमांत येत असत. दासांचा आश्रम इतन्हेच्या वैभवानें भरला होता. रात्रीं माणसांची निजानिज झाली तरी दरवाजा उघडाच असे. आश्रमाच्या स्वामींची वृत्ति पूर्ण सात्विकी असल्याकारणानें त्यांना दरवाजे बंद करून वित्ताचें संरक्षण करण्याची अवश्यकता वाटत नसे.

## दोन चोरांची फसगंमत

कोणत्याहि काळीं तमोगुणी माणसें सांपडावयाचीच. तुळशीदासांचा सोन्यारुप्यांनीं भरलेला आश्रम रात्रीं अपरात्रींहि उघडा असतो असें पाहून दोन चोरटे चोरी करण्याकरितां रात्रीं चोरून आश्रमांत शिरले. सर्वत्र सामसूम पाहून त्यांनीं सुवर्णपात्रें पदरांत बांधून ते दोघे पळून जाण्याकरितां निर्भय चित्तानें दक्षिणद्वाराशीं आले तों त्या ठिकाणीं हातामध्यें धनुष्यबाण धारण केलेले दोन धनुर्धर रखवालदाराच्या रूपानें उभे असलेलें त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांना चुकवावें या मिषानें ते दोघे तस्कर तो मार्ग टाकून उत्तरद्वाराकडे आले. तेथेंही तसेंच धनुर्धर पाहून ते चकित झाले. कांहीं काल तसेंच स्वस्थ बसावें आणि धनुर्धर उठून गेले म्हणजे आपण निघून जावें या बेतानें ते तसेंच आंतल्या आंत दवा धरून बसले. मधून मधून ते चोरून दारांकडे पहात; परंतु ते धनुर्धर तेथें अक्षय्य उभे असलेलेच त्यांच्या दृष्टीस पडत. अखेर अरुणोदय होऊन काकडआरतीकरितां आश्रमांत लोक जमले. त्यांतच ते तस्कर मिसळले. द्वाराशीं तिष्ठत असलेलें धनुर्धर मात्र दिसेनासें झाले. हा चमत्कार पाहून त्या तामसी तस्कराची बुद्धि पालटली. त्यांनीं पदरांत बांधलेली सुवर्णपात्रें टाकून देऊन ते तुळशीदाससमीप गेले. त्यांनी गहिंवरून जाऊन दासांच्या चरणावर मस्तकें टेंकिली. दासांनीं त्यांना कोण असा प्रश्न करितांच त्यांनीं आपला सर्व वृत्तांत दासांना स्पष्टपणें कळविला. रात्रीं दरवाजाशीं रखवाली कोण करीत होतें याबद्दल दासांनीं चौकशी केली; पण त्या रखवालदाराचा कांहींच शोध कळेना. तेव्हां त्यांतील सर्व इंगित दासांच्या ध्यानांत आलें. तुळशीदासाचे डोळे पाण्यानें भरून आले. आपल्याकरितां प्रभु रामचंद्रानें लक्ष्मणासह द्वारपाळाचें रूप धारण

केलें असें जाणून ते सद्गदित झाले. जो एकपत्नी, एक वचनी, एकबाणी, ज्याच्या चरण–स्पर्शानें अहिल्या शिळेचा उद्धार झाला; ज्यानें उपमन्यूला क्षीरसागर अर्पण केला; ज्यानें बिभीषणाला सोन्याची नगरी दिली; ज्यानें ध्रुवबालकाला अढळ पद दिलें; त्या भक्तवत्सल रामचंद्रानें आपल्याकरितां द्वाररक्षकाचें काम पतकरिलें आणि तस्करांना अटकाव करून कृपणता दर्शविली याबद्दल सात्त्विकीभावानें कष्टी होऊन दासांनीं सात्विकी खेद व्यक्त केला. तुळशीदास त्या चोरांना वाटेल तितकें सुवर्ण देण्यास तयार झाले. पण ते सात्विकी बनलेले तस्कर दासांच्या देणगीचा स्वीकार करीनात. परिसाच्या स्वभावधर्मानुसार त्याच्यावर लोखंडाचे घाव घातले तरीहि लोहाचें सोनेंच होतें, त्याप्रमाणें तुळशीदासांच्या घरावर दरोडा घालण्याकरितां गेलों असतांना आपणांस अपाय न होता उलट रामदर्शन घडलें याबद्दल प्रेमभरित होऊन ते दोघे तस्कर दासांच्या आश्रमांत सेवा करीत राहिले. आश्रमांतील सत्समागमाच्या योगानें ते चोर अखेर साधु बनले.

## रामनामाचें सामर्थ्य

श्रवण, कीर्तन, नामस्मरण यांमध्यें दास प्रेमानें काळ घालवीत असतां दासांच्या आश्रमांत एक मोठी अपूर्व गोष्ट घडून आली. एके प्रसंगीं सकल ब्रम्हवृंदासहवर्तमान तुळशीदास भोजनास बसण्यापूर्वी उदक सोडावयास उठले. दासांनीं हातामध्यें संकल्प घेतला ब्राह्मण ब्रह्मार्पणांचा उच्चार करणार तों द्वारावर कोणी अन्नार्थी येऊन त्यानें सीताराम दणकाविला. तुळशीदासांनीं तो कोण याची चौकशी करिता त्या भिक्षूनें सांगितलें " मी ब्राह्मण आहे; पण ब्रह्महत्त्यारी आहे. मला बुभुक्षिताला चार घास अर्पण करा " त्या ब्राह्मणाची इच्छा जाणून दासांनीं त्याला पंक्तीतील एका पात्रावर भोजनास बसविलें. ब्रह्महत्त्यारी चांडालासारखा पापी मनुष्य भर पंक्तीत बसविलेला पाहून सर्व ब्राह्मण दासांची निंदा करूं लागले. ब्राह्मणांनीं तेथें अन्न घेण्याचें नाकारिलें. त्यांची समजूत करण्याकरितां दासांनीं सांगितलें. " ब्राह्मणहो; कलियुगामध्यें नामाचा महिमा अद्‌भुत आहे. या ब्रह्महत्त्यारानें प्रथम ' सीताराम ' या शब्दांचा उच्चार केला त्याअर्थी त्याचें पातक तेव्हांच भस्म झालें यांत संशयच नाहीं. ब्रह्मकर्मांतील व्यंगही विष्णु–स्मरणानेंच पूर्ण होते स्नानसंध्या, पिताश्राद्ध, लग्ननिश्चय, या सर्व गोष्टी हरिनामावांचून पूर्ण होत नाहींत. महापातकी गणिका अजामिळ, इत्यादिकांचा उद्धार केवळ नामस्मरणानेंच झाला. इतकेंच काय पण प्रत्यक्ष शंकराच्या अंगाचा विषदाहही अखेर रामनामाच्या सामर्थ्यानेंच शमित झाला. या ब्राम्हणानें रामस्मरण केल्या कारणानें त्याचें सर्व दोष जळून गेले असून तो शुद्ध आहे. आपण सर्वजण त्याला पंक्तीस घेऊन खुशाल भोजन करा.

## ब्राम्हणांचें आव्हान

तुळशीदासाचें व्याख्यान ऐकून ब्राम्हण बोलले 'आपलें म्हणणें यथार्थ असेल; पण आम्हास साक्षात्कार पाहिजे. मोहऱ्याचा खरे खोटेंपणा पाहण्यास त्याला सूत गुडाळून अग्नीत टाकतात, त्याप्रमाणें तुम्ही जर एवढी नामप्रौढी गाता तर आम्हास नामसामर्थ्यांची प्रत्यक्ष प्रचीत दाखवा. विश्वेश्वराच्या देवळातील नंदीस नैवेद्य दाखवून तुम्ही नामप्रभावाने जर तो नैवेद्य नंदीकडून खाऊन दाखवाल तरच आम्ही तुमचे नामस्तोत्र खरे मानून या ब्राम्हणासमवेत भोजन करू."

ब्राम्हणाचे म्हणणें दासानीं मान्य केले. तुळशीदास हातात अन्नपात्र घेऊन सर्व ब्राह्मणासह विश्वेशराच्या देवळात गेले. दासानी अन्नपात्र नंदीपुढें ठेवून ईश्वराची प्रार्थना केली की, 'हे चंद्रमौळी, मृडानीवरा, हे त्रिपुरारी, मज दीनाची विनती मान्य कर. तू महादारुणविष प्राशन केल्याकारणानें तुझ्या अंगाचा जो भडका उडाला तो जर राम-नामाच्या योगानें शांत झाला असेल तर या नंदीला नैवेद्य भक्षण करण्याची अनुज्ञा दे.'

दासासारख्या सत्वशील भक्ताची प्रार्थना ऐकताच विश्वनाथ संतुष्ट झाला. सर्व लोक पाहत असतां तो पाषाण-नंदी उठून उभा राहिला. त्यानें आरंभी निश्वास सोडून संपूर्ण भक्षण करून अखेर पत्रावळही खाऊन टाकली. हा भक्तचमत्कार पाहून सर्वत्र तटस्थपणा उत्पन्न झाला. सर्वजण तुळशीदासाना साष्टांग नमस्कार घालं लागले. सर्वांच्या मुखातून तुळशीदासाबद्दल धन्यवाद निघूं लागले. सर्वत्र परत येऊन ब्रह्महत्यारी ब्राह्मणासह सर्वांचे एका पंक्तीत भोजन झालें. सर्वत्र आनंदीआनंद झाला. त्या दिवसापासून वाराणशी नगरींत चोहींकडे हरिनामाचा गजर उसळून राहिला. हरिलीलेच्या भजनांत बरेच दिवस लोटल्यानंतर त्याच वाराणशीमध्यें एक अद्‌भुत चमत्कार घडला.

## पतिव्रतेला आशीर्वाद

जैतपाळ या नावाचा कोणीएक सावकार मरण पावला. त्याची स्त्री महान पतिव्रता होती. तिनें लागलीच सती जाण्याचा निश्चय केला. जैतपाळाची प्रेतयात्रा तुळसीदासांच्या गुंफेवरून चालली. सहगमनापूर्वी दासाना नमस्कार करण्याकरितां ती सती गुफेमध्ये शिरली. तिने दासाना नमस्कार केला. दासानी तिला 'अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव' असा आशिर्वाद दिला. मंगलकारक आशिर्वाद ऐकून सती हात जोडून दासाना म्हणाली, "माझा पति नुकताच मृत झाला असून मी सहगमनाकरिता चाललें आहे." तिचे भाषण ऐकतांच दास चकित् झाले. पण आपण जें बोललो तें सत्यच झालें पाहिजे अशा निर्धारानें तुळशीदास जैतपाळाच्या प्रेताजवळ गेले. त्या विष्णुभक्ताच्या दिव्य दृष्टीनें जैतपाळ जिवंत होऊन उठून बसला. हा चमत्कार पाहून सर्वजण आश्चर्यचकित्

ले. दास आपल्या आश्रमात परत गेले. जैतपालही आपल्या स्त्रियेसह आश्रमात जाऊन दासाच्या पायावर लोळू लागले.

तुळशीदासाच्या भक्ती–सामर्थ्यामुळे पाषाणनदीने नैवेद्य खाल्ला व जैतपाळाचें जीवन झाले हा लौकीक हस्तिनापूरच्या बादशहाच्या कानावर गेला. बादशहानें प्रधानास तुळशीदासाना राजधानीस आणण्याचा हुकुम केला. प्रधानाने लागलीच तुळशीदासाकडे पालखी देऊन सेवक पाठविले. तुळशीदासाकडे सेवकसमूह येऊन पोच- ल्यावर दास पालखीत बसून हस्तनापुरास आले राजाने दासाना आपल्या सिंहासनावर बसविले. त्याची षोडशोपचारे पूजा करून राजा बोलला, ‘आपण अद्‌भुत सामर्थ्यानें संपन्न आहा. आपली अघटित कर्णी ऐकून आपण आम्हास देवतुल्य वाटता.’ त्याच्या भाषणावर दास नम्रतेने बोलले, ‘हा सर्व प्रभाव श्रीराम–नामाचा आहे.’ यावरून बादशहाने रामदर्शन करविण्याबद्दल आग्रह धरला. ज्या श्रीरामचंद्राबद्दल तुळशीदास एवढा अभिमान दर्शवितात त्या रामचंद्राचें दर्शन करविल्याखेरीज बादशहा तुळशीदासास जाऊ देईना. त्यानें सेवकजनाना तसे हुकूम सोडून बादशहा आपल्या मंदिरात चालता झाला. तुळशीदासानी हा संकटाचा प्रसंग जाणून हनुमानाचे स्मरन केलें. मारुतीरायाची स्वारी दासापुढें प्रकट झाली. तुळशीदासाचा सर्व मजकूर त्याच्या तोंडानें ऐकून घेऊन मारुतीनें आपलें सर्व वानरसैन्य पाचारण केलें. हस्तनापुरात चोहोकडे वानरमय होऊन गेलें. राजाला साक्ष दाखविण्या- करिता त्या कपीगणानी अनेक चेष्टा आरंभिल्या. मोठाले वृक्ष उपटून ते लोकांवर टाकून देण्याचा त्या वानरानीं सपाटा चालविला. वानरानी कोणाचे कान तोडले ? कोणाची नाकें ओरबडली. पाणी आणण्याकरिता गंगेवर जाणाऱ्या बायकाची घागरी हिरावून घेऊन ती वानरानी पाण्यात टाकून दिली. राम–भजन–विमुख असे जे, कधींहि अन्नदान न करणारे शेटसावकार यांचा वानरानी बहुतप्रकारें छळ चालविला. राजस्त्रियाच्या अंगावर दीर्घ शंका करून वानरानीं त्यांची मोठी विटंबना आरंभिली.

## बादशहा उमजला !

वानरानी शहरामध्ये प्रळय माडिला. वानरानी माडिलेला उच्छेद बंद पाडण्या- करिता राजसेवकानी हजारो प्रयत्न केलें, पण त्याचा उपाय थकला. वानरसैन्य अजिंक्य झालें. बादशहा चिंताक्रांत झाला. त्या समयी कोणी सज्जनानी बादशहाला सांगितले की, “आपणाकडून जो तुळशीदासाचा छळ होत आहे त्याचाच हा सर्व परिणाम असावा” बादशहालाही ही कल्पना खरी वाटली. बादशहाला लागलीच दुर्वास आणि अंबरीष याचें आख्यान आठवलें. बादशहाला पश्चात्ताप वाटला. तो बद्धांजुलीनें दासांपुढें येऊन उभा राहिला आणि बोलू लागला

'हे महासमर्थ भगवद्भक्त; द्रौपदीच्या छलामुळें जशी दुर्योधनाची गति झाली तशीच माझी अवस्था होण्याचा रंग दिसतो. हें वानर-सैन्य आपण आता आवरून धरा. नगरामध्यें प्रळय होत आहे. आपली मला पूर्ण साक्ष पटली.' बादशहा अगदी घाबरला आहेसें पाहून दास म्हणाले, 'राजा; तुझा रामदर्शनाचा हेतु आहे. तो पूर्ण करण्याकरिता प्रभु रामचंद्र येणार आहेत. त्यांनीं आपल्या अठरा पद्म दळातून हे वानर सैन्य पुढें पाठवून दिलें. मननापूर्वी श्रवणभक्ति-उत्पन्न होतें; किंवा ज्याप्रमाणें साक्षात्कारापूर्वी निदिध्यास प्रकट व्हावा लागतो त्याप्रमाणें रामचंद्राच्या आगमनापूर्वी हें वानर-दळ प्राप्त झाले आहे.' हें उत्तर ऐकतांच बादशहा थक्क झाला. एवढेंसें वानरसैन्य जर इतका प्रलय करते तर अठरा पद्में सैन्य प्राप्त झालें असता हलकल्लोळ उडेल असे जाणून बादशहा दासापुढे नम्र होऊन सैन्य आटपण्याची विनति करूं लागला त्याची विनयसपन्नता पाहून दासानीं आपल्या आज्ञेने वानर-सैन्य नाहींसें केलें. बादशहानें दासांची पूजा करून त्याना स्वच्छेनें गमन करण्याची परवानगी दिली.

**रामभक्ताचा महिमा**

तुळशीदास तेथून निघाले तो गोकुळ, वृंदावन याच्या यात्रा करीत करीत मथुरेस आले. त्या ठिकाणीं श्रीकृष्णाचे दर्शन करून सर्व संतजनाना भेटले. त्या ठिकाणीं प्रियादास नावाच्या संतचरित्रकाराची व दासाची भेट झाली. प्रियादासानें कलियुगातील सताची चरित्रे लिहून 'संतचरित्रें' या नांवाचा ग्रंथ केला होता. तो ग्रंथ सस्कृत होता. त्यामध्यें त्यानें सर्व संतांची चरित्रें लिहिली होती, पण दासाचें चरित्र लिहिलें नव्हतें. प्रियादासाच्या ग्रथाची हकीगत तुळशीदासास कळली. त्यानीं सर्व सत-मडळी दासाच्या ग्रथाचे वाचन करण्याचें ठरविले. त्यामध्यें तुळशीदासाचें चरित्र नाहींसें ध्यानात येऊन प्रियादास चिंताक्रांत झाला. पण असा काही विलक्षण प्रकार घडला कीं, ग्रंथ वाचन चालले असतां त्यामध्यें तुळशीदासांचे चरित्र लिहिलेलें आढळून आलें. प्रियादासानें आपण तें चरित्र मुळीच लिहिलें नसल्याचे सागितलें. तेव्हा सर्व संतजन तुळशीदासाकडे टक लावून पाहूं लागले. दासानीं आपल्या चरित्राचें हस्ताक्षर पाहून सागितलें. 'हें कृत्य प्रत्यक्ष रामचंद्रानींच केलें आहे.' इतर संताना देखील लेखनातील अक्षराचा दिव्यपणा पाहून दासाची कल्पना खरी वाटली. विष्णुभक्ताचा महिमा काहीं अपूर्व आहे याबद्दल सर्व जनतेची खात्री पटली. जो साक्षात् वाल्मिकीचा अवतार, ज्याच्यावर श्रीरामचंद्राची पूर्ण कृपा, प्रियादासाच्या ग्रंथातील कमीपणा नाहींसा करण्याच्या हेतूनें ज्याचें चरित्र लिहिण्याकरिता प्रत्यक्ष रामचंद्रानी गुप्तपणानें हातात लेखणी धारण केली त्या संत-जनशिरोमणी तुळशीदासाच्या स्मरणानें सर्व पातकें दग्ध होतील याचा कोणास तरी सशय राहील काय ? त्या महापुरुषाचें जें चरित्र साक्षात् रामचद्रानीं वर्णन करून ठेविले आहे त्याचें सद्भावानें श्रवण करणारास श्रीरामचंद्राचे दर्शन घडेल यात संदेहच नको.

# रामनाम हाच आधार! लेखक : विवेक

**रामनामांत केवढी तरी जादू भरलेली आहे. ते भारलेले शब्द आहेत. एका महापुरुषाच्या पुण्याईनें व सत्कृतींनी ते शब्द भारलेले आहेत. त्यांनीं आजवर अनेकांना आधार दिलेला आहे. आम्हींही तो आधार घेऊं या.**

आम्हांला संकटप्रसगीं रामनामाची आठवण होते. जशी आईची तशी रामाची. रामनामांत केवढी जादू सामावली आहे! रामनाम हें पुण्यकारक व शुभफलदायक होऊन राहिलें आहे. मनुष्य गरीब व श्रीमत कसाही असो. रामनाम घेतल्यानें त्याला एक प्रकारचा आधार वाटतो. तें जादूनें भारलेले नांव आहे! जादू आहे त्यांत!

## रामनामांतील किमया

त्या पुण्यपुरुषानें, रघुकुलतिलकानें आपल्या सत्कृत्यांनीं व आपल्या आदर्श वागणुकीनें त्या नावात जादू भरून ठेविली आहे. हातांत माती घेतली तरी आजच्या काळांतही ( म्हणजे सुवर्ण निर्बंधाच्या ) त्याचें सोने व्हावें अशी किमया आहे त्या नावात! संत तुळसीदास, अजामीळ आणि कितीतरी संतमहात्मे या नांवामुळें तरले, संकट पार झाले, भगवत्चरण त्यांनीं आपलेसे केले.

रामनामात सर्व कांहीं आहे. तुम्हांला सुख, समाधान व आनंद देणारें हें नांव आहे. जो जो हिंदु म्हणून आहे त्या त्या प्रत्येकाला त्या नावाचा अनादि काळापासून आधार वाटत आला आहे. रामनाम हें त्याच्या रक्तमासांत भिनून गेलें आहे.

वर्षांमागून वर्षें लोटतील. युगांमागून युगें येतील व जातील. परतु रामनामाची गोडी तीळभरही कमी न होता ती सतत वाढतच राहील. कारण दुःखितांचें दुःख दूर करण्याचें व हा संसारसागर सुखेनैव तरून जाण्याचें अमाप सामर्थ्य त्या दोन शब्दांत आहे.

## दोन राष्ट्रपुरुषाचा आदर्श

रामनामाची महती आजवर कित्येकांनी गायिली. परतु अशावेळीं आधुनिक काळांतील दोन राष्ट्र पुरुषांचें रामनामाच्या बाबतीत स्मरण झाल्याशिवाय

रहात नाही. कोण ते राष्ट्र पुरुष ? पहिले आमचे राष्ट्रपिताजी महात्मा गांधी आं दुसरे नुकतेच दिवंगत झालेले राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद. गुरु आणि शिष्य. दोघांची रामनामावर अलोट व असीम श्रद्धा

महात्मा गांधींनी या भारतासारख्या महान् राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा संसार मांड व तो डाव कितीहि बिकट प्रसंग आले तरी त्यांनी न डगमगता यशस्वी क दाखविला तो कशाच्या बळावर ? रामनामाच्या ? सर्व संकटप्रसंगी, आपत्काळीं सुखानंदाच्या वेळीं त्यांना जर कोणी आधार दिला असेल तर रामनामानेंच हे वेळोवेळीं हे त्यांनी कटाक्षानें सांगितले आहे. केवढी अपरंपार त्यांची श्रद्धा हो रामनामावर !

## शेवटीही रामाची आठवण

त्यांच्यावर मृत्यूनें घाला घातला त्यावेळीहि आयुष्यातील अखेरच्या क्षणी त्यां रामनामाची आठवण झाली. त्या दुःख वेदना त्यांना सुसह्य झाल्या असतील. क्षणीं जणू रामनाम त्यांना प्रेमाने कवटाळायला त्यांच्याजवळ आले. ‘हे राम हे राम ! ! असे उद्गार त्यांच्या मुखावाटे बाहेर पडले.

आणि नुकतेच दिवंगत झालेले, आपले माजी राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसादजी ! त्यांच हातून जीवनभर केवढी राष्ट्रसेवा घडलेली आहे ! त्यांचाही सर्व आधार रामनामा होता. श्रद्धा तसें फळ ! तुमची असीम श्रद्धा असली म्हणजे हे दोन शब्द केव तरी कामगिरी पार पाडू शकतात.

## गुरु तसा शिष्य

गुरु तसा त्यांचा शिष्य. डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याही मुखावाटे आयुष्या अखेरच्या क्षणीं ‘राम भजो’ हेच शब्द बाहेर पडले.

जणूं काय आपणा सर्वांना या जगाचा निरोप घेतां घेतां त्या दोनच शब्दां अखेरचा संदेश त्यांनीं दिला !

आपण तो झेलू या व या जगात सर्वसमर्थ बनू या.



# भगवंताच्या दहा आज्ञा

—स्वामी विवेकानंद

**श्रीकृष्णाने गीतेच्या रूपानें अर्जुनास जो गीतामाईच्या रूपानें सदुपदेश केला तो तुम्हां आम्हां सर्वांसाठीच आहे. तो आमचा अमूल्य ठेवा आहे. त्या ठेव्याचे मोजमाप करतां येणार नाहीं. भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनास परोपरीने उपदेश केला आहे गीता म्हणजे तो महासागरच आहे. त्या महासागरांतील दहा निवडक व बहुमोल रत्नें स्वामी विमलानंद (रामकृष्णमिशन) यानी निवडून काढून आमच्यापुढें ठेविली आहेत.**

त्या दहाला आणखी पूरक म्हणजे एक अकरावें रत्न जोडण्यात आलें आहे. सबंध गीता वाचावी व अभ्यासावी परंतु ज्यांना तेवढी सवड नाहीं त्यांनी या दहा रत्नाच्या तेजांत वावरण्याचा अवश्य प्रयत्न करावा. भगवंताच्या त्या आज्ञाच आहेत म्हणा ना.

उपदेश गळीं उतरायला व त्याचा योग्य तो उपयोग व्हायला आपली वृत्ति तयार व्हावी लागते. नाहीं तर उपड्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणें व्हायचें! ज्याच्या मनाची तयारी झालेली आहे तोच त्या उपदेशाचे पालन करील व त्यालाच त्याचा उपयोग होईल.

अर्जुन सांगतो—

**शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम्**

'भगवंता! तुझी आज्ञा पालन करण्याचा मी दृढ निश्चय केला आहे. मी तुला सर्वस्वी व सर्व परीनें शरण आलो आहे. तुझ्याशिवाय मला अन्य गति नाहीं. तूंच माझा सर्वाधार. तू मला पदरात घे आणि या कच्च्या मडक्याचें पक्कें मडकें बनव. तूं याचें काय वाटेल तें कर.'

**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि**

आपल्या धर्मशास्त्रांनीं काय करावें, कसें वागावें यासंबंधीं नियम घालून दिले आहेत. त्यांचें ज्ञान आपण संपादन केलें पाहिजे. धर्मशास्त्रकार विचारी होते; अनुभवी

होते. त्याच्या आज्ञा काय आहेत त्या पाहून आपण त्या आचरणांत आणण्यासाठी जरूर झटलें पाहिजे.

होय, आम्ही भगवताचें मार्गदर्शन मिळवावे, त्याच्या कृपाछत्राखालीं यावें. परतु त्यासाठीं मन निर्मळ व्हावें लागते. भगवत् कृपा वाटेल त्याला प्राप्त होत नाही. ज्याची मनें पवित्र बनली आहेत, निर्मम, निरहकारी झाली आहेत त्याच्याकडेच भगवताची नजर जाते. त्यासाठी धर्मशास्त्राची जरुरी. त्या आज्ञा, ते वागणुकीचे नियम ज्यानीं भगवत् कृपा प्राप्त करून घेतली अशानीं घालून दिलेले आहेत.

## न त्वं शोचितुमर्हसि–मा शुच

'कांहींही घडो; वाट्यास काय वाटेल ते येवो; त्याबद्दल तूं दुःख, खेद कांहीं मानू नकोस. नाहीं ! नाहीं ! तूं दुःख करीत मुळींच बसावयाचें नाहीं.'

भगवताची अपेक्षा आहे कीं, तुम्हीं नेहमीं आनंदात रहा. कोणत्याही परिस्थितींत मनाचा समतोल बिघडवूं देऊं नका. सुखदुःख सारखीं माना. कितीहि दुर्धर प्रसंग वाट्यास येवो. धैर्यानें वागावयाचें. निर्धारपूर्वक आलेल्या प्रसंगास तोंड द्यावयाचें. हें सामर्थ्य आपण कसें मिळवायचें ? तेंही पुढें सागितलें आहे.

## पाप्मानं प्रजहिहि

पापी वासना व दुष्ट विचार मनांत केव्हाही येऊ देऊ नका. त्यांच्या बाबतीत हात धुवून मोकळे व्हा.

होय, परतु तें तरी कसें करायचें ? त्याला सुद्धा सामर्थ्य लागतें ना ? तें कुठून आणायचें ? तेंच तर पुढें सांगितलें आहे.

## क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप

हलकी, क्षुद्रमनोवृत्ति झाडून टाक. त्यापासून मोकळा हो आणि निधड्या छातीनें उभा रहा पाहूं.

ईश्वर सर्व शक्तिमान आहे. तो काय करू शकणार नाही. सत्य संकल्पाचा दाता भगवान हें आहे ना माहीत ? त्याचें स्मरण म्हणजेच सत्य संकल्प त्याची आज्ञा आहे आम्हांला कीं आम्हीं सारा दुबळेपणा झुगारून द्यावा, आम्ही माणूस बनावें, पुरुषार्थी पराक्रमी बनावे अशी त्याची इच्छा आहे. त्याची आज्ञा आम्ही पाळावयाची नाही काय ? ती विचारपूर्वक आपण पाळण्याचें ठरविले तर दुष्ट विचार दुबळ्या भावना व सारा कमकुवतपणा आमच्यातून हा हां म्हणतां नष्ट झालाच पाहिजे. आमच्या वाऱ्यालाही त्यानीं उभे रहातां कामा नये.

अरे खरंच ! तरीही हृदय दौर्बल्य दूर होत नाहीं. हें दौर्बल्य महाकठीण आहे. हें चिकटलें आहे एकसारखें ! काय करावें याला ? सांगतो—

## योगाय युज्यस्व-मामिच्छाप्तुं

त्यासाठीं मी योगाचें आचरण करीन. योगानें सांगितलेल्या मार्गानें जाईन व भगवंताच्या भेटीची स्वतःला तळमळ लावून घेईन.

जागे व्हा, जागा अशी भगवंताची आज्ञा आहे. परतु त्यासाठीं आपण योगाची कास धरली पाहिजे. योग आचरणात आणला पाहिजे. त्याच्या भेटीची आम्हाला जबरदस्त तहान लागली पाहिजे. त्यासाठी जीव कासावीस झाला पाहिजे. तडफडला पाहिजे. धडपडला पाहिजे. परंतु त्याच्या भेटीची इच्छा तरी कधीं होते का आम्हाला ? मग हुरहूर, तळमळ राहिली बाजूला ! मग त्यासाठीं काय करायचें ?

## अनित्यम सुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्

ज्या जगात तुम्हीं वावरतां तें हें जग अशाश्वत व दुःखपूर्ण आहे. येथें शाश्वत कांहीं नाहीं आणि येथें आनंदालाही थारा नाहीं. मग काय बरें याचा उपयोग ? मग याचा नाद सोडून माझ्यामागें भगवत्‌चरणामागें लागावयाचें. तो शाश्वत, नित्य व आनंददाता आहे.

देवीच्या भेटीची, त्याच्या प्राप्तीची इच्छा केव्हा बळावते ? ज्यावेळीं हें जीवन क्षणिक आहे, टाकाऊ आहे, सभोंवार जें पसरलेले आहे व ज्याबद्दल माया, ममता वाटते तें सारें असार, क्षणभंगूर व शेवटीं दुःखाला कारण होणारें आहे, त्यात 'राम' राम आणि कांही नाहीं. मग त्याचा लोभ का बरें धरावयाचा ? त्यासाठीं आपण भक्तीची, भजनाची कास धरावयाची. त्याच्या चिंतनाकडे वळावयाचें. तेंच सर्वस्व व आधार व तेंच तारक असें समजावयाचें; देवाची भक्ति, त्याचें भजन, त्याचें स्मरण कसें असावें माहीत आहे का ? भजन म्हणजे आपल्या सभोंवार आपण ऐकतो तो गोंगाट नव्हे बरें का ! मग कसें ?

## बीजं मां सर्वभूतांना विद्धि–मे रूपं मिदं
## प्रपश्य सर्वाणि भूतानि मत्स्थानित्युपथारय

सर्व प्राणिमात्राच्या ठायी मी वास करीत आहे. मी बीजरूपानें प्रत्येकांत आहे. माझ्यामुळेंच तर त्यांचें अस्तित्व तुझ्या सभोंवार जे निरनिराळे आकार निरनिराळी स्वरूपें दिसतात ती सारी माझींच ही गोष्ट तूं मनाला पटवून घेतली पाहिजे. मी सर्वांच्या ठायीं आहे आणि सर्व माझ्या ठायीं आहेत. ही खूणगांठ मनाला पटली पाहिजे. हीच तर गुरुकिल्ली आहे. ती घे तूं प्रथम हस्तगत करून.

अशा रीतीनें भगवंताने काय बरें सांगितलें ? कोणाचाही तिरस्कार करू नये एखाद्याचा तिरस्कार करणे, एखाद्याला हडहड करणे म्हणजे ते मलाच पावन होते तो माझाच तिरस्कार होतो. किती बहुमोलाचे शब्द आहेत हे !

आमच्या सभोंवार आम्हाला जे नातलग, सगेसोयरे, शेजारी पाजारी, ग्राम वगैरे जे जे कोणी दिसतात ती ती सारी माझी रूपे, ती सारी माझी लीला, आहे असे समज. त्या सर्वांच्या ठायीं तू मला पहा. त्यांची सेवा कर. त्यांच्या उपयोगी पड त्यांची सेवा म्हणजेच माझी सेवा. त्या सेवेच्या द्वारे तू माझ्याजवळ येशील.

**नियतं कुरु कर्मत्वं–कार्यं कर्म समाचर**
**मुक्तसंगः समाचर–कुरुष्व मदर्पणं–निमित्त मात्रं भव**

'तुझ्या वाट्यास जे काही करावयाचें आलें असेल ते नेहमी मन लावून व मा आठवण ठेऊन कर. तुझें कर्तव्य तू कौशल्यपूर्वक सपूर्ण मनापासून व आनंदानें पाडण्यासाठी झटलें पाहिजे. त्याच्यावर कोणत्याहि प्रकारच्या लोभाची पुटे चढू नये स्वार्थ रहित व निर्लोभपणे जे काहीं करायचे तें कर. तें मी तुझ्यावर सोपवलेलें म काम आहे या भावनेनें कर. तूं माझें हत्यार आहेस या भावनेने कर.

तुम्ही कोणत्याही अवस्थेत व कोणत्याही अधिकार पदावर असा. हा नि तुम्हीं पाळला पाहिजे. त्यात तुमचा मोक्ष आहे. परंतु असे घडणे किती कठीण आ नाही का ? मग हे कसे पार पाडायचें ? याला मार्ग कोणता ?

तें सांगितले आहे पुढच्या आज्ञेत. पहा बरे !

**बुद्धियोग मुपाश्रित्य मच्चित्त; सततं भव**
**मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय**

'तूं बुद्धियोगाची कांस धर आणि नेहमीं माझ्या चिंतनात रहा. दुसरा को ताही चाळा मनाला लागूं देऊं नको. मन सैरावैरा धांवतें, पळतें ना ? मा चिंतनाची त्याला लगाम घाल. मन सतत माझ्यावर केंद्रित कर मलाच सर्वस्व मान

भगवंताची ही शेवटची आज्ञा म्हणतां येईल. योग नित्यानित्य, विवे समदर्शन आणि कर्मयोग या सर्वांना स्थीरता केव्हा येईल ? आम्हीं देवाचें सांगि मानू व स्वीकारूं तेव्हा. आमचें मन आणि बुद्धि आम्हीं त्याच्या चरणीं समर्पित के पाहिजेत. त्यासाठी मनाला खेचण्याचा प्रयत्न सतत चालू ठेविला पाहिजे. कारण भारी ओढाळ आहे.

या सर्व आज्ञा पालन करण्यासाठीं झटत असतांही पदोपदीं अडचणी येता त्यांच्यापायी जीव अगदी हैराण होतो. याचीही भगवंताला जाणीव आहे. म्हणून त्यां आश्वासनपूर्वक शेवटीं सांगितलें आहे कीं—

### प्रतिजाने प्रियोऽसि मे

हे घे माझे आश्वासन, अरे ! तू मला प्राणाहूनही प्रिय आहेस ! आणखी काय पाहिजे तुला ?

प्रत्येकाने या आश्वासनावर श्रद्धा ठेऊन आपला जीवनक्रम आखला पाहिजे. त्यातच सुख आहे. आम्ही कसेही असलो तरी तो कृपाळू देव आम्हाला दूर लोटणार नाही. या जगात आमची दया कोणाला नाही आली तरी त्याला आल्याशिवाय रहाणार नाही. कारण तो आमचा जन्मदाता, निर्मिता. त्याला आमची काळजी असणारच. ही श्रद्धा आपण बाळगली पाहिजे. व त्या श्रद्धेच्या शांत छायेखाली रात्रंदिन वावरले पाहिजे. आम्ही वाईट, बरे, पापी, दुराचारी कसेही असलों तरी त्याचें लक्ष आमच्यावर सतत असणारच.

आणि आम्ही निर्मळ, शुद्ध मनाने त्याचें चिंतन केलें, त्याचा ध्यास घेतला, प्रत्येक गोष्ट त्याच्यासाठी व त्याच्या नांवे करावयाची या धोरणानें वागू लागलों तर तो किती प्रेमाने आमच्याजवळ येईल व आम्हाला प्रेमानें कुरवाळील याची कल्पनाही करवणार नाहीं.

भगवताच्या या दहा आज्ञा आमच्या दृष्टीसमोर सतत राहोत व त्याप्रमाणें आचरण करण्याचे सामर्थ्य आम्हाला प्राप्त होवो हीच प्रार्थना.



लहान मुलांच्या आंकडीवर
जुनें आणि प्रसिद्ध औषध
जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी
सोल प्रो जयकर ब्रदर्स, ६६. मरीन ड्राईव्ह, मुंबई १.
: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# मी व माझें अस्तित्व

लेखक : केशव कृष्ण प्रधान

## लेखांक ७ वा

महापुरुषाची भेट ही एक अनन्यसाधारण बाब असते. ' व्यतिशजति पदार्थान अंतरः कोऽपि हेतुः ' या श्रीकालीदासकवीच्या उक्तीप्रमाणें महापुरुषाचे दर्शन झाल्यानंतर त्याच्याबद्दलची ओढ मानवी मनाला निव्वळ वेडच लावते. अंतरंगातील सर्व गुप्त विचार, आशा–आकांक्षा, इतकेंच नव्हे तर अंतःकरणांत खोलखोल दडलेल्या सर्व सुप्त उर्मी जागृत होऊन त्या महापुरुषाकडे आपणांस एकदिलानें ओढू लागतात. लोहचुंबकाची व त्यांची घट्ट मिठी पडल्याशिवाय चैन पडत नाही. महासागर पूर्ण भरती आल्यानंतर पौर्णिमेच्या चंद्राकडे थैमान घालणाऱ्या लाटांनी ओढला जातो, अगदीं त्याप्रमाणें मानवाचा त्याच्या सर्व आंगोपांगानी महापुरुषास मिळण्याचा प्रयत्न सुरू होतो. महापुरुषाच्या व आपल्यामधील अंतराची पर्वा न करिता हवेच्या कणाकणा-मधून ती अतिंद्रीय ओढ आपणास त्या महापुरुषाकडे ओढूं लागते. माझी अगदी तशीच स्थिती झाली. दुसरे दिवशीं बरोबर चार वाजता माझ्या नकळत माझे पाय त्या महापुरुषाच्या मंदीराकडे मला ओढू लागले व त्या स्थितींत मी कधीं त्या महापुरुषाकडे जाऊन बसलो हे माझें मलाच समजले नाहीं. मला पहाताच आपलें कमलनयन किंचीत विस्फारून व ज्या योगे विश्वातील चराचर मोहीत होतील अशा तऱ्हेचे दिव्य आणि मोहक हास्य मुखमंडलावर विराजीत करून त्या महापुरुषाची अमृतवाणी गंगौघासारखी स्रवूं लागली.

" पंचमहाभूतापासून निर्माण झालेला तुझा देह त्यांतील धडपडणारे मन व बुद्धी व त्यांतून वर उफाळू पहाणारा सच्चीतानंद स्वरुप, चैतन्यानें मुसमुसलेला, परमात्मप्रभूचा प्रतिनिधी आत्मस्वरुप खरा जो तू, हे सर्वच मला स्पष्टपणें दिसत आहे. आणि म्हणूनच माझ्याकडे तू वारंवार यावेस असें मला वाटलें. गरुडपक्षी कसल्याही कणखर पिंजऱ्यात कोंडला तरी तो पिंजरा फोडून बाहेर आल्याशिवाय रहात नाहीं. तुरुंगाच्या भिंती, लोखंडी गज, स्वातंत्र्यइच्छूवीराला किती दिवस कोंडून

ठेवणार ? भोवतालचें जीवन, मनात उठलेली भावनांची अनंत वादळे किंवा बुद्धीनें थेट आकाशापर्यंत मारलेली झेप, मानवाला कधीं ना कधींतरी मायेच्या पिंजऱ्यातून बाहेर काढून मुक्त स्थितींत नेल्याशिवाय रहाणार नाहीं. नाट्यसृष्टीनें इतस्ततः विखुरलेली कोटी कोटी आमीषें, तकलादी विषयसुखाची मायेनें दाखविलेली प्रलोभने, सत्यशोधार्थ तळमळणाऱ्या भवपथावरील वाटसरूस विघ्नस्वरुप न होता मार्गदर्शक होऊन सत्यं, शिवं, सुंदरम् चा साक्षात्कार क्षणार्धांत करून देतात. अशी माझी खात्री आहे. परंतु त्यानें सत्याचा शोध मात्र सोडतां कामा नये.

**मानवी जीवन**

आपण कालच काय बोलत होतो बरें ? हरघडीला विविध रंग धारण करणाऱ्या मानवी जीवनाविषयी नव्हे का ? हो. मानवी जीवन हे आशानिराशा, सुखदुःख, सौंदर्यकुरुपता, सत्यअसत्य, ह्या विविध रंगातून एकसारखे पुढें धावत असते. व ह्या जीवनाचा रथसारखी मनबुद्धीमागील परमात्मरुप आत्मा जसा काहीं आपला काहींच संबंध नाहीं, अशा तऱ्हेनें ह्या जीवनाच्या विवीध रंगाकडे खुशाल पहात स्वस्थ असतो. एकदां का आपल्याला त्याची अनुभूती आली म्हणजे ह्या मानवी जीवनातल्या विवीध चळवळीकडे पाहताना मानवाच्या नेत्रात कांही औरच जिवंत असे सौख्य विलसू लागते. व त्याची मनबुद्धीच काय पण शरीरसुद्धा तेजस्वी दिसू लागतें. तूं कधी तरी संध्याकाळीं अगदीं सूर्य मावळताना हिरवळ पसरलेल्या विस्तीर्ण मैदानात फिरावयास गेला असशीलचना. त्यावेळीं आजूबाजूचा सर्व प्रदेश कसा निळसर पिवळ्यातावडया रंगानी भरून जातो, अगदीं त्याप्रमाणे मानवी अंतःकरणात आत्मज्ञानानंतर असें सर्व तऱ्हेचे इंद्रधनुष्यातील रंग स्वेच्छेनें खेळू लागतात. मी तुझ्याशी बोलत असताना हे सर्व अनुभव मला येत आहेत. व ते सर्व अनुभव जसेच्या तसे तुला एकदा काहीं बाकी न ठेवता देऊन टाकावे अशी मला तीव्र इच्छा होते. ये अगदी माझ्या जवळ येऊन बैस. माझ्या श्वासाशी तुझा श्वास एकरुप करून मी तुझे वाऱ्याप्रमाणे गति असलेले, सोन्याच्या ताजव्याप्रमाणें अति कंपीत, असें मन क्षणार्धांत नाहीसे करून टाकतो. अरे मानवी बुद्धी म्हणजे काय ? तो मानवी मनांचाच एक सूक्ष्म भाग आहे. मानवी मनात उठलेली वादळें शमवून त्यातील काही विचारांना निश्चयात्मक स्वरुपाकडे नेण्याचा फसवा प्रयत्न करणारी ही बुद्धीबाई इंग्रजीत Old dome म्हणतात ना तशी. आपण तिला आजीबाई म्हणतो. एरवी जगांत थेट अश्मयुगांपासून तो हल्लीच्या थेट वातायनाच्या युगापर्यन्त, आधीभौतिक सृष्टीत उत्क्रांती करून सुद्धां मानवाला खरेखुरे शाश्वत सुख देण्याच्या बाबतीत पुन्हा ही कोरडी ती कोरडीच. जगातील सर्वोत्कृष्ट वाङ्मयातून, काव्यांतून,

तात्विक गुदगुजनातून, मानवाला परमानंद सागराच्या अगदी किनाऱ्यापर्यंत पोहचवून त्याला वितर्कानें, पांडीत्याने, विद्वत्तेने मागे ओढणारी हीच ती बया. तू माझ्या अगदी जवळ बसलास तर माझा श्वास तुझ्या श्वासाशी एकरूप होईल व मग मी तुझ्या मन बुद्धीचे सपूर्ण निराकरण केल्याशिवाय रहाणार नाही. अरे अनत कालपर्यंत जीवनाच्या विविध आगोपागाचा खोल विचार करून थेट गरीबापासून कोट्याधिशापर्यन्त सर्व जीवने स्वतःच्याच अतर्यामी जगून मानवी अतःकरणात उत्पन्न होणाऱ्या विकार व विचाराशी एकरुप होऊन, मानवाचा विविध आनद व दुःख ह्याच्या सर्व अवस्था आपल्याच ठिकाणी कल्पून, महाप्रयासानें मी मानवी मनबुद्धीमागे जाऊन आत्मस्वरुपामध्यें स्थित झालो आहे. सतत आत्मस्वरुपाच्या अनुभवामुळें मानवी मनात व बुद्धीत काय काय आहे हे मला कळून चुकले आहे. इतकेच नव्हे तर बाहेर पसरलेल्या ह्या अफाट पृथ्वी आप तेज वायू व आकाश यांनीं बनलेल्या सृष्टीमागील स्थीर परमात्मस्वरुपाचा अनुभव मला आल्यामुळे मला माझ्या या लहानशा देहातील पृथ्वी आप तेज वायू व आकाशांचे मिश्रण त्यातील मन आणि बुद्धी व त्या मागील आतमदेव याचा सतत अनुभव येत राहिल्यामुळे तोच अनुभव मी इतरास देण्यास परमेश्वरकृपेने क्षम झालो आहे. या अनुभवामुळें माझ्या भोवताली पसरलेल्या व माझ्या देहातून बाहेर पडणाऱ्या दिव्य वलयाच्या कक्षेत तू एक क्षणभर तरी येऊन बसावेस अशी माझी इच्छा आहे. महासागरात उठलेली एखादी प्रचड लाट सर्व लहान लाटाना जशी आपल्या पोटात घेते व आपल्याशी एकरूप करून टाकते, त्याप्रमाणें मला तुला एक माझा अविभाज्य भाग बनवावयाचा आहे. तुझ्या व माझ्या जीवनातील ही महामगलमय घटना घडविण्यास मी अगदी उत्सूक झालो आहे."

### माझी बेभान अवस्था

त्या महापुरुषाच्या दिव्य अमृतवाणीने माझें सर्व अग व वृत्ती थरथरून भरून आल्या. वसतऋतुच्या आगमनाबरोबर वेलीवेलीच्या, वृक्षावृक्षाच्या, फुलाफळाच्या अतरंगात अमृतस्राव भरभरून वाहू लागल्यावर ती जशी बहरून येतात, तशी माझी स्थिती झाली. व त्या महापुरुषाच्या भोवताली पसरलेल्या त्या दिव्य वातावरणात एक पाऊल पुढें टाकताच जागच्याजागी निमीषार्धात मला ह्या जगातून मन बुद्धी विरहीत होऊन मी दूर कोठेतरी एका दिव्य स्थळी गेलो आहे असे वाटू लागले. माझे हात, पाय आणि डोळे अतिशय बधीर व जड झाल्यामुळें मला बाह्य जगाचा पूर्णपणें विसर पडला. समाधी समाधी म्हणून जी काही म्हणतात तशी काहीशी अवस्था मला जाणवू लागली. माझी बाहेरील जगाची शुद्ध जाऊन हळू हळू मला आतील अतींद्रीय अफाट अशा विश्वाची जाणीव होऊ लागली. मला वाटू लागले की मी स्वतःच एका महान् दिव्य स्वर्गीय सगीताचा आलापच बनलो

आहे. क्षणांत वाटले की मी पृथ्वीतलावर अनुनभवीत असा एक दिव्य सुगंध झालो आहे किंवा नवपरीणीत युवक यूवतींच्या हृदयात निर्माण होणारे दिव्य प्रेम ते मींच श्री काय ? अशा स्थितीत मी किती वेळ होतो हे मला सांगता येत नाही. परतु जेव्हां श्री जागृतावस्थेंत आलो तेव्हा मला असे वाटले की अमृतांनी भरलेला माझ्या हृद-चा दिव्य कलश मी स्वप्नात कोठेतरी दूर एका सुदर उपवनात विसरून आलों आहे.

मी त्या महापुरुपाच्या दिव्य चरणाला स्पर्श करून बाहेर पडलो, व घरच्या ख्याला लागलो. रस्ता नेहमीप्रमाणें माणसानी व वहानानी गजबजलेला होता. तु मला मात्र मी माझ्याच घरात दालनादालनांतून एखादा महासमारभ चालावा आसमंतात सर्व बाजूला दिव्य सुगध व वाद्याचा मजूळ आवाज असावा व त्यातून धुद होऊन चालावे. याच धुदीत मी केव्हा घरी येऊन पोहोचलो ते माझे मलाच ळले नाही.

---


# जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठी बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणे म्हणजे डंबल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यात येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रे, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः ..



लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स, ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

# श्रीराम आणि श्रीकृष्ण

लेखक : त्रिविक्रम

**कोणत्याही देशांतील समाजाचें अंतर्गत व स्वभाव विशेष यांची कल्पना करून घ्यावयाची असल्यास त्यांच्या इष्टदेवतांकडे लक्ष पुरवावे म्हणजे सहजासहजीं तत्संबंधी कल्पना करतां येते. कारण त्यांचाच आदर्श सतत त्यांच्या दृष्टीपुढें असतो. त्यांचे अनुकरण कर- ण्याचा यथाशक्ति प्रयत्न त्यांच्याकडून होत असतो.**

आपला हिंदुसमाज जास्तीत जास्त कोणत्या देवताना भजतो व पुजतो! राम आणि कृष्ण. कोणी रामाचे भक्त असतात तर कोणी कृष्णाचे आणि कोणी कोणी दोघाचेही. यापैकीं श्रेष्ठ कोण ? राम की श्रीकृष्ण ? ही तुलना करणें कठीण आहे व ती योग्यहि ठरणार नाही. त्या दोघाच्या बाबतींत व प्रकृती स्वभावांत सारखेपणा आहे व भिन्नपणाही आहे. परंतु दोघेहि पुरुषोत्तम आहेत हें निर्विवाद होय ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें जो तो त्या त्या पुरुषोत्तमाकडे आकर्षिला जातो एवढेंच.

**जीवन म्हणजे कठोर व्रत**

श्रीरामचंद्राचे चरित्र आपणास काय शिकवितें ? जीवन हें एक कठोर व्रत आहे आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत पोहोचणारी ही एक प्रकारची शिपाईगिरी आहे म्हणा ना. स्वतःच्या हितापेक्षा दुसऱ्याच्या हितासाठी झटावयाचें. तुमच्या मनांत नानाप्रकारच्या आशा आकांक्षा व अभिलाषा वास करीत असतील. स्वतःसाठीं किंवा आपल्या जिवलगासाठीं अमुक करावें असे वाटत असलें तरी इतरेजनाच्या बाबतींत आपले कर्तव्य कोणतें तें ध्यानीं आणून त्या भावना आतल्या आत दाबून टाकाव्या लागतात, त्यांचा होम करावा लागतो. हू कीं चू न करतां निमूटपणे कर्तव्य पालनासाठीं झटावे लागतें. फार काय ? जीं सर्वस्व आपलीं ज्यांच्यावर असीम प्रेम त्यानाही दूर लोटावे लागतें. आपल्या आकांक्षाबरोबर त्यांच्याही आशा आकांक्षाच्या समीधा यज्ञ कुंडांत फेकाव्या लागतात. आणि त्याही दुःख न करतां अगदीं निमूटपणें !

## हेंच रामचरित्राचें सार

राम चरित्राचें सार जर कोणतें असेल तर तें हेंच होय. रामाची पितृभक्ति, गुरुभक्ति, एक पत्नी व्रत व पत्नीवरील निस्सीम प्रेम, बंधु प्रेम, प्रजापालन, कोणतेंहि क्षेत्र घ्या. राम प्रत्येक क्षेत्रात पराकोटीला जाऊन पोहोचला आहे. त्याला सर्वांसाठीं असीम त्याग पत्करून झटावें लागले.

त्याने आपल्या जीवनाचें क्रीडांगण नाहीं बनविलें. ख्याली खुशाली, सुखविलास यातच तो कधी रमला नाही. कधी दोन घटका गप्पा मारण्यात त्याने खर्च केल्या नाहीत. त्याला त्यासाठी वेळच नव्हता. त्याच्या रोजच्या वेळापत्रकातून हास्यविनोदाला किंवा थट्टामस्करीला स्थान नव्हतें. कर्तव्यपालन, कितीही कठोर व्हावे लागलें तरी कर्तव्यपालन हाच त्यानें गिरविलेला जिवन मंत्र होता.

रामापुढे जायचें आणि उभा रहावयाचें तर त्यानें सारीं पापे, सारा दुष्टपणा व अहंकार साफ नाहीसा करून उभा राहिले पाहिजे. इतरास तेथें स्थान नाहीं.

## रामाची न्यायनिष्ठूरता

राम न्यायनिष्ठूर होता. त्यानें न्यायापुढे आपली प्रिय पत्नी पाहिली नाही कीं प्रियतम बंधूही पाहिला नाही. न्याय म्हणजे न्याय. तो सर्वांना सारखा. त्याच्या हातांतील न्यायाचा तराजू कोणीही पुढें आला तरी तो जरासुद्धा खालवर झाला नाहीं. त्याच्या जीवन चरित्रांत जशी कठोर न्यायनिष्ठूरता आढळून येते तशी तुम्हांला इतरत्र क्वचित्‌च आढळून येईल.

स्वजनाबद्दल त्याच्या अंतःकरणात अपरपार प्रेम होते. परंतु त्या प्रेमापायीं त्यानें आपल्या कर्तव्य पालनांत कधींही चुकारपणा केला नाही. स्वजनांवरील संकट-प्रसंगी धांवून जायला त्यानें कधीं आळस केला नाही, परंतु तेथेंही त्याने कर्तव्या-चरणाला अग्रस्थान दिलें.

## श्रीकृष्ण महात्म्य

आणि आतां आपलें दुसरें थोर दैवत श्रीकृष्ण, हें दैवत कसे होते ? तसाच पराक्रम व पुरुषार्थ. कर्तव्य पालनाबद्दल तीच कठोरता. पितृभक्ति, गुरुभक्ति, स्वजनप्रेम, कुटुंबप्रेम, भूतदया, मित्रप्रेम सारें येथें श्रीरामचंद्राप्रमाणेच पहायला मिळतें. तीच सत्यनिष्ठा, तेच जीवन पावित्र्य, धर्मरक्षणासाठीं तीच तळमळ. हें सर्व समसमान असले तरी हे जीवन म्हणजे एक कठोर व्रत आहे असें त्यानें भासविले नाही. जीवन म्हणजे मंगलोत्सव. जीवन हे व्रत असलें तरी आनंदाचा, उत्सवाचा उपभोग घेत घेत ते पाळावयाचें. कृष्णही कर्तव्यकठोर कमी नव्हता. वेळ आली तेव्हां धर्मरक्षणासाठीं

त्यानें कंसाचा वध करायला कमी केले नाही. जरासंधाचा नक्षा वेळोवेळी त्यानें उतरविला, परंतु त्याचबरोबर गोकुळांतील आनंद त्यानें लुटला. गोपगोपींबरोबर लीला केल्या, त्याचप्रमाणे कुरुक्षेत्रावर दुष्ट कौरवांचा संहार करण्यासही त्यानें कमी केले नाही. प्रसंग येईल तसें वागायचे. सुख दुःख आनंद विलास सर्वांचा उपभोग घ्यावयाचा. परंतु धर्मासाठी धर्मरक्षणासाठी वेळ येईल तेव्हा कर्तव्य कठोर बनावयाचें.

### कृष्ण जवळचा वाटतो

असें आहे कृष्णाचें जीवन. कृष्ण त्यामुळे लहानापासून थोरापर्यंत सर्वांना अधिक जवळचा वाटतो. तो बाळपणी खूप खेळला बागडला, दही, दूध लोणी चोरून खायला व आपल्या मित्रांना द्यायला त्याने कमी केले नाही. कृष्णानें आपल्या मित्रासाठी—अर्जुनासाठीं वेळ आली तेव्हां सारथ्य स्वीकारले. त्यांत त्याला कमीपणा नाही वाटला. रामाच्या दरबारांत जायचे तर साध्यासुध्या माणसाला संकोच वाटावा, परंतु कृष्णाचा दरबार सर्वांना खुला. गरीब सुदामा त्याच्या अंतःपुरांत जाऊं शकला ! उद्धव आणि कृष्णाचें नाते कोणत्या प्रकारचे होते ? तेथे संकोचास स्थान नव्हते. कृष्णाच्या दरबारात शिष्टाचार नव्हता. कोणी कुठेही बसावे व उठावे.

अशारीतीनें या दोन पुरुषोत्तमाच्या ठायीं आपणांस वर वर पहाता थोडा थोडा फरक आढळून येतो. दोघांचीही उपासना फलदायक होऊं शकते. कारण दोघांनीही आपले जीवने कर्तव्यपालनासाठी नीति व धर्म याचें रक्षण करण्यासाठीं आणि जगाच्या कल्याणासाठी खर्च केले.

### दोघांचेही निस्सीम उपासक

राम आणि कृष्ण या दोघांचेही निस्सीम उपासक आढळून येतात. रामाच्या उपासनेत धोका कमी आहे. तेथे अधःपाताला स्थान नाहीं. शुद्ध पवित्र अंतःकरण बनवून रामभक्तीकडे वळावें लागतें. तेथें पतन होण्याची धास्ती नाहीं. परंतु कृष्णाची उपासना मोहक असली तरी तेथे पतनाला जागा रहाते. परंतु कृष्णभक्तीकडे लोकांचा ओढा अधिक. याचे कारण तेथें मोहकपणा आहे. गोपी बनून कृष्णाची भक्ती करावयाची हे व्रत सर्वांनाच साधण्यासारखें नाहीं. मनुष्याला भोगवृत्ति सर्वसाधारण आहे. कधीं त्याचें मन विचलीत होईल सांगतां येणार नाहीं. फार जपून पाऊल टाकावें लागतें.

पुरुष आणि स्त्री ही भिन्न प्रकृतीची माणसें आहेत. पुरुषानें पुरुषाप्रमाणें वागून पुरुषार्थ गाजवून दाखवावा व स्त्रीने स्त्रीप्रमाणे वागून आपलें कर्तव्य पालन करावें. पुरुषाने स्त्री होण्याचा किंवा स्त्रीनें पुरुष होण्याचा प्रयत्न केव्हाहि करूं नये. त्यांत

निश्चितपणें हानी आहे. पुरुषानें स्वतः स्त्री आहे अशी भावना करून गोपीव्रत पाळायचे व त्याद्वारें श्रीकृष्णाची भक्ति करायची यात अधोगती आहे. फार फार कठीण व्रत आहे ते. कधी पतन होईल सागता येणे कठीण आहे. मग अशा धोक्याच्या व्रताकडे आपण का बरे वळायचे ! श्रीकृष्णाची राधा होऊन किंवा गोपी होऊन भक्ति करावयाची हा मार्ग या देशात कित्येकानी स्वीकारला, परंतु त्यात पतन पावलेले फार व तरले असे अत्यल्पच. मग कां स्वीकारा तो मार्ग ? रामभक्तीचें तसे नाही. तेथें पतनाला जागाच नाही. हनुमान, रामदास, तुळसीदासासारखे, रामभक्त ध्यानी आणा म्हणजे हे कोडें उलगडेल. मिराबाईला गोपीभक्ति शोभली कारण ती स्त्री होती हे आपण विसरता कामा नये.

**कृष्णोपासना म्हणजे काय ?**

कृष्णाची उपासना करणे म्हणजे धर्मनिष्ठ व सत्याचा पाठ पुरावा करणारा होणे. अधर्माचे निर्दाळण करणे, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी झटणे, औदार्य, शौर्य व विद्वता वेळ येईल त्याप्रमाणे प्रगट करणे. कृष्ण ज्ञाता होता, योगी होता तसाच भोगीही होती. आम्ही भोगी होण्याकडे लक्ष देणार. त्यात पुरुषार्थ कसला आला आहे ! आपण श्रीकृष्णाप्रमाणे ज्ञानी व योगी होण्यासाठी प्रथम झटले पाहिजे.

राम आणि कृष्ण हे आरंभी सागितल्याप्रमाणे दोघेही श्रेष्ठ व पुरुषोत्तम, परतु त्याच्याठायीं जे अतर आढळून येते ते दाखविण्याचा व आपण कोणत्या बाबतींत खबरदारी घेतली पाहिजे याची जाणीव करून देण्याचा अल्पसा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे. वाचकानी हंसक्षीर न्यायाने त्यातील रहस्य जाणावे व स्वीकारावे.

---


**ए. आर. सावंत अॅन्ड ब्रदर्स**

**२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रिटेलर्स**

# आमची सीतामाई

—द. शं. टिपणीस

**आम्हांला अभिमान वाटावा की, आमचा भारतीय राम सर्वपरीने कसोटीला उतरला. इतर कोणाच्याहि वैभवावर व सौंदर्यावर त्याची कधी नजर नव्हती व आजही नाही. आपल्या सीतामाईचें (भारतमातेचे) वैभव व सुंदरपणा वाढविण्याकडे त्याचे सारें लक्ष होतें. इतर राष्ट्रांच्या संपत्तीचा व कशाचाही अभिलाष त्यानें बाळगला नाही. सर्वांशी मैत्रीच्या नात्याने वागण्याचाच पुरस्कार आमचा राम आजवर करीत आला; परंतु अति सर्वत्र वर्जयेत् हें विसरल्यामुळे मात्र आज घोटाळे निर्माण झाले आहेत.**

### धनुष्य बाण सज्ज

सुंदरपणा व मूल्य हे चांगल्याला जितके पोषक आहेत तितकेच वाईटालाही उत्तेजक असूं शकतात. जगाकडे वाईट वा चांगल्या दृष्टीने पहाणारे दोन्ही प्रकारचे लोक आहेत. त्यातही वाईटाचे अधिक आहेत. यामुळे सुंदरपणा वा मूल्य संकटें निर्माण करु शकतात, आपत्ती दाराशी आणूं शकतात. रावणाने सीतेचें हरण केले ते तिच्या सुंदरपणामुळेंच नव्हे काय? चांगल्याचे अपहरण करून आपल्या पाशवी वृत्तीचे समाधान करून घेणे ही मानवी प्रवृत्तीच आहे. ही बळावली तर जगांत माणुसकीला जागा राहणार नाही. यास्तव मानवतेच्या पुजाऱ्यांनी केवळ शांति देवीची पूजा करण्यात गढून न जाता अशांतेच्या चंडिकांचा समाचार घेण्यासही सिद्ध असले पाहिजे, श्री रामचंद्राचें कोणाशीं वैर नव्हतें, किंवा त्याच्या ठिकाणीं कोणाबद्दल द्वेषभाव नव्हता. शांततेचें, बंधुभावाचे व मानवतेचे ते उपासक होते. असें असूनही त्यांचें धनुष्य-बाण त्याच्याबरोबर सदैव सज्ज असत. प्रभूला पूर्ण जाणीव होती कीं वनवासांत चांगल्यावर केव्हा घाला येईल, आपल्या जवळील हिरकणीवर कोणाची केव्हां कशी नजर पडेल याचा नेम नाहीं व अशा वेळीं वाईटाचा निःपात करायला बाणासारखें अमोघ शस्त्र नाही. श्रीरामाच्या जीवनातील ही गोष्ट रामायणाची अनेक वर्षं पारायणे करूनही परवांपर्यंत

आमच्या ध्यानी आली नाही. परंतु वाढत्या वैभवामुळे, जागतिक प्रतिष्ठेमुळें व मानवी संपत्तीमुळे आमच्या सीतामाईचे—भारताचे अपहरण करण्याचा आधुनिक चपट्या नाकाच्या रावणाने प्रयत्न केला तेव्हा कोठे आमच्या डोक्यात प्रकाश पडला व बाणांचा आम्ही शोधाशोध करूं लागलो. श्रीरामाला सोडून आम्ही कुंभकर्णाचेच अनुकरण करीत बसलो होतो. परंतु उपकार त्या रावणाचे की त्याने आमची झोप उडविली.

## सध्यां घडलेलें रामायण

जे कार्य आपण करतो त्या कार्याबद्दल आपणास आस्था असली, खरी कळकळ असली तर ते कार्य यशस्वी होते. ज्या कार्यांत ही आस्था नाहीं, कळकळ नाही त्या कार्यात काही राम उरत नाहीं. ज्या राष्ट्रातून वा समाजातून असा राम निघून गेला ते राष्ट्र वा तो समाज असा राम म्हटल्याखेरीज राहत नाही. लक्ष्मण हा पराक्रम आहे. राम गेला की त्या मागोमाग लक्ष्मणहि जातो. रामाशिवाय लक्ष्मणाला तेज नाही. असे झाले म्हणजे रावणाला रान मोकळे होते व 'रामायण' घडते. असेच रामायण नुकतेच घडले हे भारतीय जनता जाणतेच. स्त्रीजाती इतका कांचनाचा मोह दुसरे कोणाला नाही हें ओळखून रामाच्या पर्णकुटीच्या आसपास एक कांचन मृग रावणानें सोडून दिला. सीतेच्या इच्छापूर्तीसाठीं राम त्याच्या मागे गेला. राम गेला म्हणून लक्ष्मण गेला व शेवटीं एकंदर बेसावध परिस्थितीचा फायदा घेऊन सीतामाईचा हात रावणाने धरला. पूर्वी रावण दक्षिणेकडून आला तर तो आता उत्तरेकडून आला एवढाच फरक.

## रामाचें पवित्र कर्तव्य

आमची भारतमाता म्हणजे सीतामाई सारखी सुंदर, सालस, विनयशील व वैभव संपन्न आहे व भारत सरकार राम आहे. सीतामाईचें पालनपोषण करणे, तिला वैभवशाली करणे व तिचें रक्षण करणें हें आमच्या रामाचे पवित्र कर्तव्य आहे. श्रीरामाप्रमाणें या रामानें एक पत्नीव्रत पाळले पाहिजे. इतर स्त्रिया लाख लावण्यवती का असेनात त्या बहिणी समान आहेत. त्यांच्याकडे इतर दृष्टीने पहाणे नाहीं. आम्हां भारतीयाना अभिमान आहे की आमचा भारतीय राम या कसोटीस पूर्ण उतरला आहे. इतर कोणाच्याही वैभवावर सुंदरपणावर त्याची नजर कधीं नव्हती व आजही नाही. त्याचे सर्व प्रेम आपल्या सीतामाईचें वैभव व सुंदरपणा वाढविण्यांतच केंद्रीत झालेले आहे, इतर राष्ट्रांच्या संपत्तीचा अभिलाष त्याला नाहीं. सर्वांशी मैत्रीच्या व बहिणभावाच्या नात्यानें नांदणाऱ्या शांतिधर्माचा पुरस्कारच आमचा राम सदैव करीत

आला आहे. परंतु अति सर्वत्र वर्जयेत् हे विसरल्यामुळें मात्र घोटाळे निर्माण होत आहेत.

श्रीराम शांतिधर्मांचा पुरस्कर्ता होता. सुखी व सुराज्याचा तो भोक्ता होता. नीतिचा पालनकर्ता होता. दंडकारण्यातील ऋषिमुनींना आपली तपश्चर्या व धर्माचरण निर्विघ्न व शांतपणे करता यावे म्हणूनच ना त्याने आपल्या बाणाचा उपयोग केला? शांतिधर्मांचे धोरण श्रीराम व आमचा राम यांचे सारखे असले तरी ध्येय साध्य करून घेण्याच्या साधनांत जी तफावत आहे. ती आमच्या रामाने आपली मूळ संस्कृती सोडल्याचे द्योतक आहे. श्रीरामचंद्रानेही शत्रूला समजावून मैत्री करण्याचा प्रयत्न केला पण त्यात मर्यादा राखली. पण आमच्या रामाने ती उल्लंघली व सीतामाई आज बिकट परिस्थितीत येऊन पडली. चिनत्या, निषेध करीत श्री रामचंद्र स्वस्थ कधीच असले नाहीत, वेळ पडली तर सज्जता पाहिजे म्हणून त्यांचा भाता बाणांनी सदैव भरलेला असे. श्री साईबाबांनी ही शांति धर्माची मर्यादा

**" कोणास प्रत्यक्ष निक्षून सांगती। आमची तो मोठी कडवी जाती ॥**
**सांगून पाहूं एका दोवक्ती। शेवटची गती बहु कठीण ॥ २१–१३१**
**सांगू एकदां सांगू दोनदां। न करी जो गुमान आमुचे शब्द ॥**
**त्या मग पोटचे पोरास सुद्धां। चिरून द्विधा फेकूं की ॥ २१–१३२ "**

या ओव्यांतून व्यक्त केली आहे. कर्तव्य पालन मग तें कितीही कठोर वा निर्दय वाटो ते करण्यास श्री राम कधीही कचरले नाहीत. रामाचे जीवन प्रजेसाठी, त्यांचे बाण दीन दुबळ्यांच्या रक्षणासाठी होते. स्वतःच्या सुखासाठी नव्हे तर नीतिच्या व पावित्र्याच्या रक्षणासाठी त्याने लंकेवर स्वारी केली. श्री रामाला खाजगी जीवन नव्हते. श्री राम हा केवळ सीतेच्या वा कौशल्येच्या मालकीचा नसून तो सर्व जनतेच्या मालकीचा होता व आहे. श्री रामचंद्राप्रमाणे सीता माईचे संरक्षण करणे तिला वैभव संपन्न करणे तिच्या सर्व लेकरांना सुखसंपन्न करणें हे आपले आद्य कर्तव्य आहे, आपल्याला खाजगी जीवन नाहीं. याची जेव्हा आमच्या रामाला जाणीव होईल. व श्रीरामानें दाखवून दिलेला राज्यकर्त्यांचा आदर्श जेव्हा तो आपल्या कृतींत उतरवील तेव्हाच या भारतात खरेखुरे रामराज्य निर्माण होईल.

### आमचे क्षात्रतेज

आमच्या रामाची वानरसेना म्हणजे भारतीय जनता होय. या वानरसेनेची आपल्या रामावर पूर्ण श्रद्धा आहे. रामभक्ति त्यांना प्रिय आहे. हें ओळखून आपल्या

बोलण्यामुळे वानर सेनेत निराशा वा अविश्वास निर्माण होणार नाही याची दक्षता रामाने घेतली पाहिजे. वानराची ही निष्ठा नाश करण्याच्या उद्देशाने व वानरसेनेचा बुद्धिभेद करण्याच्या इरायाने रावणाने धाडलेले अनेक मायावी राक्षस वानरसेनेत वावरु लागणें अपरिहार्य आहे. या सर्वांना हेरून, हुडकून त्याचे खरे रुप उघड करून त्याचा नायनाट करणे हे सीतामाईच्या रक्षणासाठी, शांतिधर्म नांदण्यासाठीं आवश्यक आहे. श्रीरामाने तरी दंडकारण्यात प्रथम शूर्पणखा आदि राक्षसराक्षणींचा नाश करून हीच कामगिरी केली नव्हे काय ? रामरावण युद्धातील आघाडीचा खरा पहिला वीर म्हणजे जटायू होय. दहा तोंडाच्या रावणाला चिमुकल्या जीवाने विरोध करून मरण पत्करणे, सतीच्या रक्षणासाठी अनीतिला विरोध व अटकाव करणे ही आजची खरी भारतीय संस्कृती आहे, तें आमचे क्षात्रतेज आहे. असे जे आमचे क्षात्रतेज आहे. असें जे आमचे आघाडीचे जटायू त्यांना सर्वतोपरी साहय्य करणे व ज्यानी अन्यायाच्या प्रतिकारार्थ आत्मसमर्पण केले. त्यांचा सन्मान करणे व त्यांच्यापासून आमच्या चिमुकल्या वानरांना स्फूर्ति मिळवून देणे हें रामाचे व रामनिष्ठा बाळगणाऱ्या सर्व वानरांचे कर्तव्य आहे. जटायूसाठी श्रीप्रभूनी अश्रू का ढाळले याचे इंगित आम्ही दृष्टी आड करता कामा नये. मारुती, अंगद वगैरे वानर सेनेचे नेते होते. आमच्या ही वानर सेनेचे नेते मारुतीप्रमाणे बलशाली तर पाहिजेतच पण त्याच बरोबर त्यांची राम-सीतेवर भक्ति पाहिजे. मारुतीला श्रीराम भक्ति फक्त ठाऊक होती. श्रीरामाच्या शब्दासाठीं व सीतेच्या शोधासाठी तो एकटाच निर्भयपणे पुढे झाला. आपण मागे राहून आपल्या वानर सेनेला नाही पुढे ढकलली. श्रीरामाच्या नुसत्या स्मरणाने त्याला दहा हत्तींचे बळ येई. कारण रामाचा त्याला तसा पाठिंबाच होता. आमच्याहि रामाचा आमच्या मारुती, अंगद वगैरे नेत्यांना असाच पाठिंबा असेल तर त्यांच्याहि ठिकाणी हत्तीचे बळ निर्माण होऊन वानर सेना उल्हासीत व उत्तेजीत होईल व मग उत्तरेकडील बर्फाचे उंच उंच महासागर ओलांडून लंकेत जाऊन सीतामाईची पूर्ण सुटका करणे सहज साध्य होईल.

---

या ! माणसे बना ! पुरुषार्थी बना ! शांत व अगदी गाजावाजा न करतां आपले कर्तव्य पार पाडण्यासाठीं झटा. वृत्तपत्रातील प्रसिद्धीला महत्त्व देऊं नका. नावासाठी, प्रसिद्धिसाठी कोणतीही गोष्ट करूं नका. ही महत्वाची गोष्ट नेहमीं लक्षांत बाळगा.

**— स्वामी विवेकानंद**

# बाबा भक्तांचे कैवारी

**भक्तांच्या भल्यासाठी तर बाबांचा अवतार. ते आपल्या भक्तांना कधींहि अंतर देत नाहीत. भक्त मग तो कुठेंहि असो त्यांचें भक्ति भावानें स्मरण करतांच ते त्याच्यापुढें हजर होतात. तुमच्या हांकेसरसा मी तुमच्या पुढें हजर आहें म्हणून समजा, हें आश्वासन ते सदैव पाळीत आले आहेत.**

सत्कृद्दर्शनी हे विश्वास ठेवण्यास कठीण की मनुष्य दुसऱ्या माणसाचे स्वास्थ्या करिता अथवा रक्षणाकरिता आपल्या स्वतःचे जीवन धोक्यात घालील, परतु भागवतात (स्कद ५–१८) एक उज्वल ध्येय सांगितले आहे.

**गुरुर्न सःस्यात् स्वजनो न सःस्यात्। पिता न स.स्याज्जननी न सा स्यात्।**
**दैवं न तत् स्यान्न पतिश्च सस्यात्। न मोचयेद्यः समुपेत मृत्युम्।**

बाबाना या श्लोकाचे नुसते 'शब्दज्ञान' नव्हते. त्याचे गुरु व्यकुशा यानी त्याचा स्वतःचा प्राण वाचविण्याकरिता आपले प्राण खर्ची घातले होते. तद्वतच. आपल्यावर विसबून राहणाऱ्या सर्व भक्तासाठी आपले सर्वस्वही वेचावयास बाबा तयार असत. 'जो मला आपले सर्व मन देईल आणि माझा आश्रय घेईल त्याने देहाची अथवा आत्मिक कल्याणाची कोणतीही चिंता करण्याचें कारण नाही. जो आतुरतेनें माझें चिंतन करतो आणि माझाच आश्रय घेऊन राहतो त्याचा मी ऋणी आहे. त्याचे रक्षण करण्याकरिता मी आपले प्राणही देईन.'

बाबांचे हे उद्गार म्हणजे अतिशयोक्ति नव्हे. बाबा निर्मळ सत्याशिवाय दुसरे कांहीच बोलत नसत. याप्रमाणे बाबानीं आपल्या उद्गाराची सत्यता पटवून दिल्याचे कांही अनुभव खाली देत आहोत.

फार दिवसांपूर्वी शिर्डीचे सर्व मुसलमान एकदा एकत्र झाले आणि त्यानीं ठरवलें की बाबांनी हिंदु पद्धतीची पूजा स्वीकारून मशिदीचा मोठा अपमान केला आहे आणि या प्रकारास आळा घातला पाहिजे, म्हणून त्यांनीं संगमनेरच्या काजीस बोलावणें पाठवले. आता लाठ्याचा मार सहन करावा लागणार हें पाहून **म्हाळसापति** घाबरुन गेले आणि त्यानी मशिदीच्या बाहेरूनच बाबांची पूजा करण्याचा प्रयत्न केला. पण बाबांनीं त्यांना आंत बोलाविलें आणि नेहमीप्रमाणें पूजा करण्याची आज्ञा केली. बाहेर लाठीबंद

मुसलमान समाज सज्ज असल्यामुळें बाबांची ही आज्ञा पालन करणे फार धोक्याचे होते. पण त्याना न भिता आपला नित्यक्रम चालू ठेवण्याची बाबाची धडाडी पाहून खवळलेला मुसलमान समाज एकदम गोंगलगाय होऊन परत गेला. पुनः २० वर्षांनंतर म्हणजे स. १९१४-१५ च्या सुमारास एक माथेफिरु मुसलमान बाबा आपल्या शिष्या-सह मशिदींत असता अचानक मशिदीत आला आणि 'हे सर्व हिंदु तुम्हाला बिघडवून राहिले आहेत तर त्याना ठार करण्याची परवानगी मला द्या.' असे म्हणू लागला. इतक्यात त्या भक्तातून श्री. तर्खड जागे झाले, आणि त्या माथेफिरुला पाहून घाबरले. पण त्या सर्वांचे रक्षक बाबा तिथें असल्यामुळे भीति कसली? बाबानी त्या माथेफिरुला सांगितले कीं असेल दोष तर माझाच आहे या हिंदूचा नाही. माझाच गळा तू काप हवा तर. त्याच्या माथेफिरुपणाची मजल बाबांवर वार करण्यापर्यंत पोहोचली नाही आणि प्रसंग टळला.

वर्ष दोन वर्षांनतर पुनः एक रोहिला माथेफिरु बाबाना मारण्यासाठीं आला. बाबानीं त्याचे मनगट धरुन एकच दृष्टिक्षेप केला. त्याबरोबर वाताचे झटक्यानें शरीरक्रिया बंद पडल्याप्रमाणें तो मटकन खालीं बसला. त्याचें क्रूर अंतःकरण पार वितळलें. बाबाच्या अचाट सामर्थ्याचा त्याच्यावर पुढे इतका प्रभाव पडला की त्या योगे बाबास तो पैगंबरच म्हणू लागला.

बाबानी भक्ताचे आजारही आपल्या स्वतःवर घेतल्याचे आपणास माहीत आहे. तत्संबंधी काही थोडे अनुभव खाली देत आहोत. पण तत्पूर्वी हें लक्षात ठेवले पाहिजे कीं, बाबाचे सर्व आयुष्यच भक्तांच्या अशा खस्ता खाण्यांत आणि त्याचे दुःख निवारण करण्यात गेले, आणि त्यांचा शेवटही त्यानेच झाला. डिसेंबर १९१० मध्यें बाबा एकदा श्री. खापर्ड्यांस म्हणाले, 'दोन वर्षांपासून माझी प्रकृती ठीक नाही आणि शिर्डीस असतो तो टीकही होणार नाहीं. मला माझ्या निजधामाशिवाय बरें वाटणार नाही. माझ्या भक्ताची किंमत मला माझ्यापेक्षां जास्त आहे. जन्म केवळ त्याच्याकरिता आहे.'

श्री. शांताराम बलवंत नाचणे हे कुर्ला येथील तालुका कचेरींत हेडक्लार्क होते. बाबावर त्याची निःसीम भक्ति होती. १९१३ त बाबांना ते भेटले. त्यावेळी बाबानी सहजच उद्गार काढले 'वेड्या माणसावर विश्वास ठेवू नये.' श्री. नाचण्याना या उद्गारांत त्यावेळी कांही महत्त्व वाटलें नाहीं, पण कांही दिवसानंतर आपल्या घरींच बाबाच्या प्रतिमेची ते पूजा करीत असता दूर अंतरावर एक वेडा उभा असलेला दिसला पण वेडाच तो त्याचें काय असें म्हणून श्री. नाचण्यांनीं त्याकडे लक्ष दिलें

नाहीं. पण तो वेडा एकाएकी त्याच्यावर उसळला व त्याचा गळा धरून 'मला तुझें रक्त घ्यावयाचे आहे.' असे म्हणून चावू लागला. श्री. नाचण्याना एकदम कुठून तरी अवसान आले. त्यानी आपली सव्येची पळीच त्या वेड्याच्या तोंडात टाकली आणि दुसऱ्या हाताने आपल्या गळ्या भोवतीचा त्याचा हात सोडविला. त्यानतर मात्र श्री. नाचणे बेशुद्ध झाले. वरातील मडळींनी त्या वेड्याला पळवून लाविल. श्री. नाचणे नतर एकदा शिर्डीस गेले असता बाबानी आण्णास [एक सद्‌भक्त] आपणच ती सर्व हकीगत सांगितली आणि म्हणाले, 'आण्णा, मी जर एक क्षणाचाही उशीर केला असता तर हा (श्री. नाचणे) त्या दिवशी गेलाच असता. त्या वेड्याने तर याचा गळाच धरला होता पण मी त्याला दूर केले. आणि दुसरे करणार तरी काय? मीच जर माझ्या भक्ताचे रक्षण केले नाही तर कोण करणार?'

दुसऱ्या एका प्रसगीं बाबाचे उद्गार आहेत की, 'माझ्या भक्ताना त्रास आलेला मला खपणार नाही. मला त्यांचीच चिंता करावी लागते आणि त्याच्यातून एकादा पडणार असला तर मी त्याला हात देतो. एकच काय पण एका वेळी चार चार हात सुद्धा पुढे करीन आणि त्याला वाचवीन, पण मरूं देणार नाही.'

बाबाच्या उद्गाराच्या सत्यतेचा आणखी एक अनुभव खाली दिला आहे. श्री. नानासाहेब चांदोरकर हे बाबाच्या एकनिष्ठ भक्तापैकी एक प्रमुख भक्त होते. पुण्याच्याजवळ ते सहजीच एकदा टांग्यात जात होते. एकाएकीं घोडे उधळले आणि गाडी उलटली. प्रसंग फारच विलक्षण. नानांचा जीव धोक्यात होता पण बाबा सर्व साक्षी. बाबा–निजलेले थोडेच होते? ते शिर्डीस एकदम मोठ्याने म्हणाले "अरे नाना आता मरणार होता पण मी त्याला मारू देणार नाही." कुठे पुणे आणि कुठें शिर्डी! १०० मैलाचे अतर. पण बाबांनी आपलें म्हणणे खरे केले. नाना आणि आत बसलेली मडळी बाजूला जणू अलग पडली आणि त्याना कोणतीही दुखापत झाली नाही.

नाना शिर्डीस गेल्यावर बाबा त्या दिवशीं काय म्हणाले हे कळल्यावर आपण त्या दिवशीं कसे वाचलो हे त्याना समजले.

नानासाहेबाची मुलगी मीनाताई सतरा वर्षांच्या असतांना त्याना प्रथम प्रसूतिचे वेळी वेदनाचा भयंकर त्रास झाला. प्रसव वेदनांच्या यातना त्यानी बराच वेळ भोगल्या आणि असें निश्चित दिसले की त्या आता जगत नाहींत. त्या गांवी (जामनेर) दवाखानाही नव्हता. नानांनी घरींच कांही होम वगैरे सुरू केले. बाबांना

त्यानीं मुद्दामच कळविले नाही. कारण बाबाच म्हणत " तुम्ही काहीही करा, कुठेही असा, नेहमी हे ध्यानात ठेवा की माझे सदैव तुमच्यावर लक्ष असते."

पण नानानी कळविलें नाही तरी बाबाना कळल्यावाचून कसे राहील ? बाबांनीं शिर्डीच्या एका गोसाव्यास थोडी विभूती देऊन नानाकडे पोहोचविण्यास सांगितले. त्या गोसाव्याजवळ जळगाव स्टेशनपर्यंत पोहोचण्यापुरतेच मोजके दोन रुपये होते. पण तेथून जामनेरला जाण्यासाठीं त्याच्याजवळ काही शिल्लक राहत नव्हते. पण बाबानी सांगितले, "जा, सर्व काही व्यवस्था लागेल." जळगावी पोहोचल्यावर स्टेशनवर आपल्यासाठी एक चपराशी व टांगा उभा असल्याचे त्याला दिसले. चपराशी म्हणाला, मला नानासाहेबानी पाठविले आहे. जामनेरास पोचल्यावर नानासाहेबाकडे ( उदी ) विभूती दिली. ती विभूती मुलीच्या आंगास लावताच तिच्या सर्व यातना दूर झाल्या आणि सुखरुपपणें प्रसूत झाली. चपराश्याची आणि टांग्याची गोष्ट कळताच नानासाहेबाना आश्चर्य वाटले, कारण त्यानी कोणताच चपराशी किंवा टांगा स्टेशनवर पाठविला नव्हता. पण लगेच बाबाच्या अचाट सामर्थ्याची जाणीव होऊन सर्व खुलासा झाला.

वरील सर्व अनुभव बाबा कलेवराने प्रत्यक्षपणे हयात असतानाच लोकानी अनुभविलेले आहेत. पण बाबाच्या महा समाधीनंतरसुद्धा त्यानी आपल्या भक्तास पूर्वीप्रमाणेच मदत केली आहे. याचेही पुष्कळ अनुभव आहेत.

सन १९२६ किंवा १९२७ चे सुमारास काही भक्त मंडळी मुंबईहून शिर्डीस रामनवमी उत्सवाप्रीत्यर्थ जात होती. ठाण्याला गाडी थांबली असता या मंडळीतून एक स्त्री नळाचे पाणी घेण्याकरिता खाली उतरली. तिने आपले भांडे भरले व ते कमरेवर ठेवून डब्यात बसण्याचा प्रयत्न करू लागली. पण तिचा पाय डब्यात पडतो न पडतों तोच गाडी चालू झाली आणि तिचा तोल जाऊन ती गाडी आणि प्लॅटफॉर्म याच्या मधोमध पडली. तिचे पती आणि इतर मंडळींनी ओरड करून गाडी थांबविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. गाडी दूरवर गेली होती पण शेवटीं ती थांबली. लोक धाऊन जाऊन पाहतात तो बाई उभी ! लोकांनीं विचारता ' बाबांनींच मला वाचविले ' असे तिनें सांगितले. आणि दुसरे कोण वाचवणार ? ती म्हणाली, " मी खाली पडताच बाबाची मला आठवण झाली आणि त्यानीच मला प्लाटफार्मला चिकटून धरून ठेविले, पडू दिलें नाही." वास्तविक त्या बाई आणि गाडीच्या मध्ये तिसरा कुणी उभाही राहूं शकत नव्हता. पण बाबाच तिथे उभे राहणारे आणि त्यांना अशक्य काय ? त्या बाईशिवाय मात्र बाबा कुणाला दिसले नाहीत.

अदृश्य होणें ही योगाने मिळणारी एक सिद्धि आहे. पण लक्षावधी भक्तांच्या हितासाठी सदैव जागरूक असणे आणि त्याची हाक येण्यापूर्वीच धावून जाणें हा कळवळा काही योगामार्गानें सिद्ध होत नसतो. हा कळवळा म्हणजे लाभावाचून प्रीति करणाऱ्या त्या महा प्रेमाच्याच खाणाखुणा होत. "ते बोलविण्यापूर्वीच मी धावून जाईन आणि ते बोलण्यापूर्वीच मी ऐकेन." हाच त्याचा टक.

**सत्याशिषो हि भगवन् तव पादपद्म ।**
**माशी स्थतानुभजतः पुरुषार्थ मूर्तेः ।**
**अप्येव मार्य भगवन् परिपाति दीनान् ।**
**वाश्रेव वत्सक मनुग्रह कातरोऽस्मान् ॥**

---

# असे हे नाथ शिरडीचे

[ चाल—**राग मधुवंती** ]

दैवत भक्तांचे, असे हे नाथ शिरडीचे ॥ धृ० ॥

जे चरणी घाली मिठी । उभे साई त्यांच्या पाठी ॥
वात्सल्याने संकटी पावूनि । हरीती दुःख मनीचे ॥
असे हे नाथ शिरडीचे ॥ १ ॥

समाधीस या स्पर्श करोनि । भावभक्तीची आस धरोनि ॥
काय बोलणे संतचरणी हो । ज्ञात ज्या भाव अंतरीचे ॥
असे हे नाथ शिरडीचे ॥ २ ॥

स्वये बैसुनि जात्यावरी । दळीयले ते धान्य सत्वरी ॥
टाकोनि त्या वेशीवरी । तारीले प्राण कितीकांचे ॥
असे हे नाथ शिरडीचे ॥ ३ ॥

निबर्पणाहि गोड जाहले । अन् शिरडीचे भाग्य उजळले ॥
चमत्कार दाविला लावूनि । दीप हो जलांचे ॥
असे हे नाथ शिरडीचे ॥ ४ ॥

कवि—**जयवंत कुळकर्णी**

# श्री दासगणू महाराज व सच्छिष्य दामूअण्णा

***********************************************

## श्री साईबाबांची आज्ञा

************************

**श्री साईबाबा श्री. चांदोरकरना म्हणाले, "अरे! हें गणूचें पोरगे! तूं आपल्याबरोबर कशाला ठेवतोस? ज्यांची पोरे त्यांनी संभाळावी. तुला ही नसती पंचाईत कशाला? जाऊं दे ज्याचा मुलगा त्याच्याकडे!" तेव्हांपासून दामूअण्णा आठवले, ह. भ. प. दासगणू महाराज यांच्याबरोबर पुत्रवत् राहूं लागले.**

पुण्यास पोतदाराच्या येथें राहात असताना श्रीदासगणू महाराजाचे प्रसिद्ध साथीदार मानसपुत्र आणि पट्टशिष्य श्री. दामोदर वामन आठवले यांची व महाराजांची भेट झाली.

### टांगेवाला माधुकरीला शिवला

एक दिवस महाराज पोतदाराच्या माडीवर बसले असतांना खालीं रस्त्यावरून एक तेरा चौदा वर्षांचा, नाकीडोळी सुरेख, असा ब्राह्मणाचा मुलगा माधुकरी मागत चालला होता. त्यास एका टांगेवाल्याचा धक्का लागला. मुलानें हातातील माधुकरी खालीं ठेवली व तो रडूं लागला. श्रीदासगणूना या गोष्टीचें फार नवल वाटलें. त्यानीं त्या मुलाला वर बोलाविलें आणि विचारलें, 'कां रडतोस रे बाळ?'

'टांगेवाला माधुकरीला शिवला.'

'मग रडायचे काय कारण?'

'ही विटाळलेली माधुकरी मी कशी खाऊं? आणि पुन्हा आता मला माधुकरी कोण घालणार? जवळ जवळ सर्व घरें माझी मागून झाली आहेत.'

दासगणूंना मोठें कौतुक वाटलें. पुण्यासारख्या सुधारक शहरांत परिस्थितीनें नाडलेल्या मुलाच्या मनांतहि सोवळ्याओवळ्यासंबंधीं एवढी निष्ठा जागृत असावी, हे विशेष आहे. श्रीदासगणू महाराज मुलाला म्हणाले, 'हें पहा. आज येथेंच जेव आणि मी येथें आहे तोपर्यंत माझ्याबरोबरच जेवत जा.'

'भक्तिलीलामृत' ग्रंथाचे शेवटचे शेवटचे अध्याय पक्के करण्याचें काम या वेळी चालू होते. श्रीदासगणूं महाराजांना स्वतः लिहिण्यापेक्षा दुसऱ्यानें लिहावें व आपण सांगावें, हें अधिक बरें वाटत असे. कोणा तरी स्नेहासोबत्याला पकडून ते लिहिण्याचे काम सांगत असत. हें ग्रंथलेखनाचे काम या मुलाने आवडीनें पत्करिले. वेदशाळेत जात असल्यामुळे त्याला बराच वेळ मोकळा असे, अक्षर मोत्यासारखें वळणदार असून लिहिणेंहि त्वरित गतीचे असे. अर्थात् श्रीदासगणू महाराजांचे लिखाणाचें काम फार सुकर झाले. एकमेकांशी परिचय वाढून जिव्हाळाहि उत्पन्न झाला. अधिक चौकशी करता समजले की, हा मुलगा तसा निराधार आहे. याला वडील भाऊ आहे. त्याचे लाकूडकामाचें दुकान येथे पुण्यातच आहे, पण तो याची फारशी काळजी वाहात नाहीं. या मुलाला आईहि आहे, पण ती तिकडे कोकणात असते. हाच महिन्याकाठी एक दोन रुपये निव्वळ पाठवितो. मुलाचे हस्ताक्षर जसे सुंदर होते, तसा आवाजहि खूप मोठा, उंच पहाडी असूनहि अत्यंत मधुर होता. महाराजांनी रचलेल्या आख्यानांतील पदें सुस्वर कंठानें म्हणत. कीर्तनाची साथ करण्यास त्याचा उपयोग होण्यासारखा होता. या सर्व गोष्टींचा विचार करून एक दिवस महाराजांनीं त्याला विचारले,

'बाळ, तूं माझ्याजवळ नेहमी राहशील का रे?'

पायावर डोकें टेवीत दामुअण्णा म्हणाले,

'दादा, आता तुम्हाला सोडून दूर कोठें जाऊ? दुसऱ्या कोणाचा आधार आहे मला?'

दासगणूंनी दामुअण्णाच्या थोरल्या बंधूस म्हणजे श्री. रामचंद्र वामन आठवले यास बोलावून आणविले व विचारले, 'तुमच्या या भावास आम्ही आमच्याबरोबर न्यावें काय?' त्याची आडकाठी असण्याचे काहीही कारण नव्हते; उलट ती इष्टापत्तीच वडील भावाची संमति मिळण्यास अर्थातच वेळ लागला नाही. श्रीदासगणूंच्या या कौटुंबिक परिस्थितीचा फार खोल परिणाम झालेला होता. आतेष्टांच्या मतलबीपणा आणि दामुअण्णाच्या स्वभावातील सरलता यांतील सरलता यातील फरक चांगलाच जाणवला.

वडील भावाची संमति मिळतांच दामूअण्णा त्यानंतर दासगणूंचे बरोबरच राहूं लागले.

पुण्यातील काम पुढे संपलें. त्यावेळीं महाराजांच्या मनांत विचार आला कीं, 'मी फटिंग माणूस. गांवोगांव भटकणार. मला घर ना दार. या होतकरू मुलाला

माझ्याजवळ ठेवून याचे नुकसान कशाला करावे? कोणा श्रीमंताच्या येथे ठेविले, तर याचें हित तरी होईल. हा तेथे राहील. पूजाअर्चादि कामें करील. जेवील व अभ्यास करून मोठा होईल.' दासगणूंनी आपले मित्र श्री. नानासाहेब चांदोरकर यांस विनविले.

'या मुलाला तुमचेकडे ठेवा नानासाहेब. हा गुहागरचा. याला विचारणारे कोणी नाही. पुण्यात माधुकरी मागतो. चांगला हुशार असून ऋग्वेदी कोकणस्थ ब्राह्मण आहे, त्याला षोडशोपचार पूजाअर्चा करतां येते. संस्कृत पाठशाळेत, वेद-शाळेंत तो शिकत आहे. तुमच्याकडे राहू द्या याला. पूजा करील, जेवील व शाळेचा अभ्यास करील.'

श्रीदासगणू व श्री. नानासाहेब चांदोरकर यांचा संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा होता. श्री. नानासाहेबहि अंतःकरणानें उदार, वृत्तीने सात्विक व शक्य तो दुसऱ्याच्या उपयोगी पडावे, या स्वभावाचे असल्याने श्रीदासगणूंच्या म्हणण्यास त्यांनी तत्काल संमति दिली. त्याप्रमाणे श्री. दामोदर वामन आठवले हे श्री. नानासाहेबांकडे दीडदोन वर्षे होते. पुढे एकदा सर्व मंडळींना घेऊन श्री. नानासाहेब शिरडीस गेले. त्यांत दामूअण्णाहि होते. त्यांना पाहतांच श्रीसाईबाबा श्री. चांदोरकरांना म्हणाले, "अरे नाना, हे गणूचे पोरगें. तू आपल्याबरोबर कशाला ठेवतोस? ज्याची पोरें त्यांनीं सांभाळावीं. तुला ही नसती पंचाईत कशाला? जाऊं दे ज्याचा मुलगा त्याच्याकडे." श्री. नानासाहेब हे पक्के गुरुभक्त. श्रीसाईबाबांचें वाक्य म्हणजे त्यांना वेदवाक्य. त्यांनी तत्काल श्रीदासगणूंना पत्र लिहिलें कां, "मी या मुलास ठेवून घेण्यास तयार नाहीं. तुम्हीं आपला घेऊन जा. कारण श्रीसाईबाबांची मी दामूला सांभाळू नये, अशी आज्ञा आहे." श्रीसाईबाबांची गांठ पडल्यावर श्रीदासगणू म्हणाले,

"बाबा, माझी सोय मी कशी तरी लावतो आहे. त्यांत या मुलाला कोठें संभाळत बसू. श्री. नानासाहेब चांगले श्रीमंत आहेत. त्यांना याचें ओझें थोडेच आहे? मग त्यांना नको म्हणून कां सांगितलेंत?"

'अरे गणू, तुझा मुलगा तो. नानाजवळ काय म्हणून? तुझा तू सांभाळ, आपली काळजी देवाला.'

श्रीसाईबाबांची आज्ञा प्रमाण मानून श्रीदासगणू महाराजांनी त्या मुलाला मग नेहमीं जवळ ठेविलें. श्रीदासगणूंचे काव्य सुंदर अक्षरांनी लिहिणे, त्यांच्या कीर्तनांत पाठीमागें उभे राहून खड्या गोड आवाजात साथ करणे, हें त्याचे आवडीचे व्यवसाय असत. हेच श्री. दामोदर वामन आठवले किंवा दामूअण्णा या नावानें श्रीदासगणूंच्या

सर्व परिवारात प्रसिद्ध असलेले त्यांचे पुत्रनिर्विशेष पट्टशिष्य. या गुरुशिष्याचे एकमेकावर अत्यंत प्रेम वसले. श्री. दामूअण्णांच्या मनामध्ये श्रीदासगणू महाराजाविषयी अत्यंत कृतज्ञताबुद्धि होती. केवळ महाराजाच्यामुळेच आपल्या परिस्थितीत हे इतके अंतर पडले, याची जाणीव श्री. दामूअण्णा कधीहि विसरले नाहीत. श्रीदासगणूंवर रचलेल्या एका अष्टकामध्ये त्यांनीं याविषयी कृतज्ञतेचे उद्गार काढिले आहेत.

'समर्थ गणुदास तो गुरुपिताच म्या वंदिला' असे त्या अष्टकाचें ध्रुपद मोठे भावधुर आहे. श्रीदासगणू महाराजाना श्री. दामूअण्णाविषयी फारच जिव्हाळा वाटत असे. इतका की, या दोघाचे परस्पर कांही नातें नाही, हे शपथ वाहून सागितलें तरी खरें वाटू नये. आपल्या या भेटीचा वा संगमाचा उल्लेख करताना 'शिष्यबोध' या श्री. दामूअण्णाना केलेल्या उपदेश प्रकरणामध्यें महाराज म्हणतात,

**"तूं परशराम क्षेत्रांतरी। जन्म घेतला निर्धारीं। मी जन्मलो घाटावरी। पहा अंतर केवढें॥ जैसें लवण समुद्राचें। वाळा आवळे डोंगरीचे। एके ठिकाणी होती साचे। तैसा हाचि प्रकार॥ तुशी न कोणाचा आधार। मीही निपुत्रिक साचार। तुला मला परमेश्वर। करता झाला एके ठायी॥ तेल करडी कान्हाळ्याचें। वात हें अंग कापसाचे। कांहीं संबंध नसतां साचे। एके ठिकाणीं जाहलीं॥ तैल वात एक्या ठायी। जें झाली पोरापायी। तें तदंगी सामर्थ्य येई। प्रकाश परातें करावया॥'**

या ओवींत आलेल्या उपमेंतून जणू आपल्या जीवनाचा हेतूच महाराज ध्वनीनें प्रगट करीत आहेत. पुढे ते म्हणतात.

**'तूंच माझी म्हातान्याची। काठी आहेस निश्चयेसी। मजला कधी गटाराची। गांठ तान्हुल्या घालूं नको॥ माझी भिस्त तुझ्यावर। येथून अवघी साचार। मी जो भक्तिरूप लाविला तरुवर। त्यास पाणी घालावे॥ मी जें जें करीन संपादन। तें तें आहे तुझेंच पूर्ण माझ्यामागे तूंच जाण। आहेस त्याचा अधिकारी॥ तुझ्या वन्या वाइटाची। मी काळजी वाहीन साची। आण वाहून विठ्ठलाची। करतो ऐसी प्रतिज्ञा॥ या उपदेशाप्रमाणे। त्वां जगी चालणें। हेंचि माझें मागणे। आहे आतां तुज लागी॥ ज्या ज्या वेळी तुला पोरा। रागें भरितो साजिरा। परि तिळ तिळ तुटतो खरा। जीव माझा ते काळीं॥ तूंच मजला आतां सुत। तूंच अवघें गणगोत। आतां माझी अवघी भिस्त। आहे तान्हुल्या तुजवरी॥'**

या ओव्यावरून श्रीदासगणूंच्या मनामध्ये श्री. दामूअण्णाच्याविषयी कोणता भाव होता, ते स्पष्ट होते. श्री दामूअण्णांनीहि कधी ह्या प्रेमभावास धक्का बसेल, असें वागण्याचें मनांतहि आणले नाही. श्री. दामूअण्णाचा गोड पहाडी आवाज व सुंदर रूप पाहून एका प्रसिद्ध नाटककंपनीतील व्यवस्थापक त्याचेकडे आले आणि म्हणाले, 'कीर्तनात काय मिळणार हो? आमच्या नाटकमंडळीत येता का? बघा. आरंभीच महिना शंभर रुपये पगार देईन.'

त्या काळी नाटक फार लोकप्रिय होते. उत्तम आवाजाच्या आणि नीटस रूपाच्या माणसाला फार मोठी कीर्ति मिळत असे. श्री. दामूअण्णांनी होय म्हटलें असते तर कोल्हटकर, गंधर्व, हल्याळकर, भोसले यांच्याप्रमाणे उत्तम गायक नट म्हणून त्यांनींहि अपार लौकिक मिळविला असता. नाट्यानुकूलता त्यांच्यामध्ये होती. गुहागर येथे होणाऱ्या उत्सवातून नाटकें केली जात. त्यात श्री. दामूअण्णांनीं आपल्या बाल-वयात बरीच कामें केली होती. ती मोठी सुरेख असत, असे पाहिलेले लोक सांगतात. अभिनयाची कला त्याना चांगली अवगत होती. एकाद्याची नक्कल ते हुबेहुब वठवीत. त्यानी लिहिलेलें कान्होपात्रा नाटक संवाद व संविधानकाची मांडणी या दृष्टीने फारच चांगलें आहे. नाटक अपूर्ण राहिले आहे. पण नट होण्याइतपत अनुकूलता त्याना सर्व बाजूंनी होती, हे दाखविण्यापुरताच येथे मी हा उल्लेख केला. असें असतानाहि नाटकाच्या व्यवस्थापकाना त्यानी स्पष्ट शब्दांत नकार दिला. 'महाराजांच्याकडून मी स्वतः खटपट करून परवानगी काढतो,' असे म्हटल्यावरहि श्री. दामूअण्णा म्हणाले की, "दादानी कदाचित् परवानगी दिली, तरी मी नाटकात येणार नाहीं. मला एके काळीं दोन प्रहरची भ्रांत होती. त्यावेळीं नाही तुम्हांपैकी कोणी चौकशी केली? आतां मी दादाचे पाय सोडून कोठेंहि जाणे शक्य नाही." अनेक प्रकारे प्रयत्न करूनहि व्यवस्थापकास या कामी यश आलें नाहीं. अशा या निष्ठावंत वृत्तीमुळें सच्छिष्य दामूअण्णाविषयी श्रीदासगणूमहाराजाना पोटच्या पोराप्रमाणे प्रेम वाटूं लागलें असल्यास काय नवल?

श्री. दामूअण्णाच्या पहाडी पण मधुर कंठाचा कीर्तनाच्या दृष्टीनें फारच उपयोग झाला. महाराजाच्या कीर्तनाची ख्याति जी सर्वदूर दुमदुमली, त्याचें अर्धे तरी श्रेय श्री. दामूअण्णाचेच आहे. श्रीदासगणू महाराज अद्यापहि आठवणीने गहिवरून म्हणतात, 'दामूमुळे मी पुढे आलों.' दामूअण्णा साथीला उभे राहिले व 'रामदास माय माझी' हे नमनाच्या पदाचें पहिलेंच चरण झालेल्या अत्यंत गोड झंकाराबरोबर खड्या उंच

आवाजात मधुर स्वरानें त्यांच्या कंठातून बाहेर पडूं लागले की, चार चार पाच पांच हजारांचा विराट समुदाय ध्वनिक्षेपक नसलेल्या त्या काळातहि मंत्रमुग्ध नागासारखा तटस्थ होऊन डोलू लागे. श्रोत्यांची ही नादसमाधि तीन चार तासपर्यंत सतत टिके. 'इची दान दे गा देवा' म्हणून महाराजाचा हात जमिनीला लागला व आरती सुरू झाली म्हणजेच काय ते श्रोते भानावर येत. पद्य गात असताना श्री. दामूअण्णा हे निराळे राहूंच शकत नसत. त्याचे भावकोमल हृदय पद्याच्या अर्थाशीं इतकें तन्मय होऊन जात असे की, प्रत्यक्ष ती ती व्यक्तीच पुन्हा मूर्तरूपानें श्रोत्याच्या पुढें प्रकट झाली आहे, असा भास व्हावा. करूणरसाची पद्ये गात असताना गळ्यांतून निघणाऱ्या मधुर ध्वनीला नेत्रातून वाहणारे अश्रुप्रवाह अशी विलक्षण आर्द्रता आणीत की, श्रोतृवर्ग आपल्या भावना आवरू शकत नसे. महाराजानी 'अरे, पुरे पुरे' म्हणून हात दाखवून सारखे रोखीत असावे, परंतु तल्लीन झालेल्या श्री. दामूअण्णाना किती वेळ तरी त्याची दादच लागत नसे. कीर्तनाचे तीन चार तास कोठे गेले हें उभयताच्याहि आणि श्रोत्यांच्याहि लक्षात येत नसे.

अनेक दुःखानी पोळले गेले असल्याने श्री. दामूअण्णाचे हृदय इतके कोमल झालें होतें की, फुलाचाहि स्पर्श त्यांना दुःसह व्हावा. करुणरसामध्ये किंवा भक्तिरसामध्यें श्रीदासगणू महाराज नेहमीं अक्षरशः वाहात जात व श्रोत्यानाहि वाहवीत. हृदयाची कोवळीक त्याचेहि जवळ अतिशय, परंतु काही प्रसंग असे येत की, त्यावेळी श्रीदासगणू आणि श्री. दामूअण्णा याच्यामध्यें अधिक कोवळ्या मनाचे कोण, याचा संभ्रम इतराना व्हावा.

एकदा सर्व मंडळी जेवावयास बसली होती. त्या वेळी एक भिकारी दाराशीं भिक्षा मागत उभा राहिला. त्याला झिडकारीत कोणी तरी म्हणाले,

'अरे जा. चालता हो. आता काही मिळावयाचें नाहीं. आमची जेवणें झाल्यावर ये.'

भिकारी गयावया करीत होता, पण तो स्वयंव्यवस्थापक तें मानीना. अधिकच दटावूं लागला. भिकाऱ्याच्या केविलवाण्या बोलण्यानें श्री. दामूअण्णाच्या डोळ्यात टचदिशीं पाणी आले. ते म्हणाले,

'भिकाऱ्याला परत पाठवूं नका रे. दोन प्रहरी पोटामध्ये भडकलेली भूक घेऊन उन्हातान्हातून वणवणत दाराशीं येणाऱ्याला हाकलून देण्यात काय दुःख आहे, त्याच्या मनाची स्थिति कशी विलक्षण हळवी होते, याची तुम्हास कशी कल्पना येईल ? 'जावें त्याच्या वंशा तेव्हा कळे.''

श्री. दामूअण्णानीं अजून चित्राहुति घातल्या नव्हत्या. ते चटकन् उठले आणि आपले भरलेले पान त्यानी भिक्षेकऱ्याच्या पदरात घातलें.

---

# शिरडी क्षेत्रांतील महत्वाचे उत्सव

(१) **गुढीपाडवा**— चैत्र शु. प्रतिपदेपासून शिरडी येथें बाबाच्या समाधी-समोर लहानमोठे अनेक उत्सव साजरे केले जातात. सुरुवात होते ती गुढीपाडव्यानें. त्या दिवशीं बाबाच्या मंदिरावर ध्वजारोपण म्हणजे गुढी उभारण्यात येते. श्रींच्या समाधीस अभिषेक, पुरणपोळीचा महानैवद्य, श्रींच्या समाधीस भरजरी किनखापी व उंची मखमलीचा पोषाख चढविण्यात येतो. सायंकाळी रथाची मिरवणूक निघते.

(२) **श्रीरामनवमी महोत्सव**— चैत्र शु. ९ मी. हा उत्सव श्रीबाबानीं स्वतःच सुरू केला. तो त्याच्या प्रेरणेने ह. भ. प. दासगणू महाराज साजरा करीत असत. नंतर त्याच्या प्रेरणेनें त्याचे शिष्य ह. भ. प. अनंतराव आठवले हे स्वतः शिरडींत येऊन तो उत्सव उत्तमप्रकारे साजरा करीत असतात.

**आरंभ काळांतील उत्सव**

श्रीसाईबाबा श्रीरामजयंतीचा उत्सव करीत असत. तो जेव्हा पूर्वस्वरूपात होता, तेव्हा फार थोड्यानाच कळत असे. त्या उत्सवाची पद्धत अशी होती. रामनवमीचे दिवशीं श्रीसाईबाबा स्वत. मशीद धूत असत, व दुपारी बाराचे सुमाराला थोडें तेल आणून दिवे लावीत. व पैसा--अधेल्याचा गुलाल आणून धुनीवर व आपले डोक्यावर, मशिदीचे तीन पणत्यावर, कोपऱ्यात व कमानीत उधळीत. पुढे त्या रामनवमीला फार महत्त्व आले. त्याचे (बाबांचे) देखत मशिदीपुढें कथा, कीर्तने व रामजन्म होऊ लागला, व जन्म झाल्यावर श्रीसाईबाबा पेढे, बर्फी पुष्कळ वाटीत आणि कालाकीर्तनानें उत्सवसमाप्ती होत असे.

(३) **श्रीगुरुपौर्णिमा**— आषाढ शु॥ पौर्णिमा— हा व्यासपूजेचा दिवस. श्रीव्यासाच्या कालापासून ह्या दिवशीं गुरुची पूजा करून गुरूना वस्त्रे देण्याची वहिवाट असल्याचा दाखला पुराणातरी सापडतो.

शिर्डीस श्रीबाबानीं ह्या पूजेचें महत्त्व स्वतः आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अपरोक्ष मार्गाने सांगितले.

इ. सन १९०८ रा. लक्ष्मण कृष्णाजी ऊर्फ तात्यासाहेब नूलकर, सबजज्ज, मु. पंढरपूर, हे रजा घेऊन शिरडीस राहिले होते. त्यावेळी त्याचा मुकाम चावडींत होता.

एके दिवशी सकाळीं श्रीबाबा माधवरावाना म्हणाले की, "त्या म्हाताऱ्याला म्हणावें कीं, या खांबाची पूजा कर." (तात्यासाहेब नूलकराना बाबा म्हातारा म्हणत) पूजेकरिता जो खांब बाबानीं दाखविला तो धुनीजवळ असून त्याला टेकून कित्येक वेळा (सकाळीं नेहमीं) बाबा बसत. नूलकरांना व माधवरावाना हा काय प्रकार आहे तें प्रथम लक्षात येईना. नूलकरानीं पंचांगात काहीं खुलासा मिळतो की काय तें बघण्याकरिता पचाग पाहिलें तेव्हां

तो दिवस व्यासपूजेचा म्हणजे गुरुपूजेचा आहे असे आढळून आले. अशा त्या महत्त्वाच्या दिवशी बाबाची का होईना पण मशिदीत पूजा करण्याचा योग आल्यामुळे त्याना परमानद आला. माधवराव देशपांडे पुन्हा मशिदीत गेले, तेव्हा बाबा त्यानाही म्हणाले की, “ तोच काय एकटा पूजा करतो, तुलाही करायला काय झाले ? ” माधवराव म्हणाले की, “ आपण बाबाची पूजा नाही करणार, जर तुम्ही करू द्याल तर तुमची मात्र पूजा करीन. ” शेवटी नाही होय करता श्रीबाबाची पूजा करण्याची परवानगी मिळाली.

रा. रा. दादासाहेब केळकर याना गुरुपौर्णिमेच्या पूजेची माहिती होती. तात्या गणपत पाटील ( कोते ) शेतावर गेले होते. त्याना बोलावून आणिलें. मडळींनीं पूजेचे सामान तयार केले, धोतरे आणविलीं व सर्वांनी प्रत्यक्ष श्रीबाबाची पूजा करून त्याना वस्त्रें दिलीं. वस्त्राचा बाबाना काही उपयोग नव्हताच. परतु आपल्या भक्तमडळींना गुरु पौर्णिमेस गुरुची पूजा करण्याचा योग यावा व पुढे तो परिपाठ चालू रहावा याकरताच हें सर्व लाघव श्रीबाबानी केले; अशा रीतीने ही पूजा सुरू झाली व नतर या समारंभात हलके हलके मोठ्या उत्सवाचे स्वरूप आले. हल्ली हा उत्सव मोठ्या थाटानें तीन दिवस स. कमिटी साजरा करीत असते.

## ( ४ ) श्रीसाईबाबांचा पुण्यतिथि– उत्सवः—

ज्या विभूतीनें आपल्या भक्तांकरिता, आपल्या भक्ताचे कल्याण करण्यात आपला देह कष्टविला त्या विभूतीच्या स्मरणार्थ, त्याची पुण्यतिथी साजरी करणें प्रत्येक भक्ताचें आद्य कर्तव्य आहे. पूर्वपरपरा पाहिल्यास गुरु ब्रह्मीभूत झाल्यावर त्याची सेवा करण्याचा हा एकच मार्ग आहे.

श्रीबाबानीं विजयादशमी- दसरा– दिनाक १५ आक्टोबर मगळवार इ. स. १९१८ रोजीं दोन प्रहरीं सुमारे २ वा. ३५ मिनिटानीं देह ठेविला. त्यामुळ तीच वेळ इष्ट काल धरून त्याच्या पुण्यतिथीचे दिवशीं आरंभीं होणारा आराधनाविधि त्याच वेळीं सुरू करण्यात आला. श्रीबाबानीं आपला देह ११ एकादशीला– ( त्यावेळी एकादशी होती, ) ठेवला, अर्थात् दशमींतून एकादशीत सिमोल्लघन करून दसरा साजरा केला.

### आराधनाविधी

रोजचा नित्यनियम सपल्यावर ४ ब्राह्मणाना दक्षणा देण्यात येते. या चार ब्राह्मणाची योजना (१) गुरु–( श्रीसाईबाबा ) स्थानीं, ( २ ) परम गुरु ( महाराजाचे गुरु ) स्थानीं, (३) परमेष्ठी गुरु ( ब्रह्मदेव ) स्थानीं, (४) परात्पर गुरु (परमेश्वर स्थानीं). अशी विधिपूर्वक होते. या विधींत गुरूना ब्रह्मीभूत न म्हणतां “ विश्वरूपधर असा जो आचार्य त्यास ” असा सकल्प करण्यात येतो. वरील ब्राह्मणाना स्थानापन्न केल्यानंतर त्याचें पादप्रक्षालन करून त्याजकडून आचमन करवून पुरुषसूक्ताने त्याचे पूजन होतें, व

आनंदमानंदकरं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोधरूपम् ।
योगींद्रवंद्यं भवरोगवैद्यं श्रीमद्‌गुरुं नित्यमहं नमामि ॥

या श्लोकाने त्याची प्रार्थना करण्यात येते. नतर मडले करून त्यावर त्याची पात्रे माडून त्याना पचपक्वानाचे भोजन दिले दिलें जातें. ब्राह्मणाचें भोजन झाल्यावर त्याना तांबूल दक्षिणा व वस्त्रें दिलीं जातात. नतर तीर्थराजाच्या पूजेस सुरुवात होते. सागितलेल्या विधीप्रमाणे गोमयाने सारविलेल्या जमिनीवर चौरग माडून, समोवर्ती रागोळया काढून चौरंगावर ठेविलेल्या धान्यावर–( गहू–तादूळ ) पाण्याने भरलेला कलश ठेवला जातो. तेथे गगोदकाची भावना धरून तीर्थराजाची स्थापना केली जाते, व पुरुषसूक्त मत्रपूर्वक पूजा करतात. त्यानतर विधि करणारानें तो कलश मस्तकावर धारण करून ब्राह्मणाच्या वेदसूक्तातील मत्रघोष चालू असता अंगावर कलशातील पाणी साडेल अशा बेतानें नृत्य करावयाचे असतें. त्याप्रमाणें करून कलश पूर्वोक्त ठिकाणीं ठेविला जातो. पुनः कलशाची पूजा आरती करून ब्राह्मणाना प्रदक्षिणा घालन कलशामधील तीर्थ प्रथम ब्राह्मणाना देऊन नतर आपण प्राशन करणे अशा तऱ्हेने विधियुक्त श्रीबाबाचा पुण्यतिथि–उत्सव हल्ली सस्थानकमिटीमार्फत तीन दिवस साजरा होतो.

( ५ ) **कोजागिरी पौर्णिमा**–रात्री श्रीच्या समाधीवर अभिषेक, व रात्रौ १२ वाजता चद्राची पूजा करून सर्व भक्तगणाना दूध दिलें जाते.

प्रत्येक उत्सवाला पालखीची, अगर रथाची मिरवणूक गावातून निघते. श्रीसाईबाबाच्या हयातीतील झालेल्या शेवटच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी मात्र बाबानी रथ मिरविण्याची परवानगी दिली. रथाची मिरवणूक दारुसामान व वाद्याच्या गजरात थाटाने होते. दीक्षित वाड्यासमोर ती काहीं वेळ थाबते. तेथे भजन व गारुड–( हें गारुड एकनाथ महाराजानी रचलेलें आहे. ) म्हणणें होऊन मिरवणूक समाधिमदिरात येते व तेथें शेजारती वगैरे होऊन कार्यक्रम सपविण्यात येतो.

—०—


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, विणकाम**

यांस लागणारे सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तके
लोकर, गंगावने आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं. ***

श्रीदासगणू महाराजांची एक बोधकथा—

# मतलबी फूल

**श्रीदासगणू महाराजांचे काव्यग्रंथच किती तरी आहेत. त्यांनीं गद्य फारसें लिहिलें नाही. तरी नाही म्हणायला त्यांनी सुमारे १२५ बोधकथा गद्यांत लिहिल्या आहेत. त्या खरोखर उत्कृष्ट बोधकथा आहेत. त्यांपैकी नमुन्यादाखल एक बोधकथा पुढें देण्यांत येत आहे. शितावरून भाताची परिक्षा.**

श्रीगोदावरीच्या काठीं ब्रह्मदेवाने दोन प्रकारची उपवनें निर्माण केलीं. एका उपवनात जी फुलझाडें लावलीं होतीं, त्याना सुवास मुळीच नव्हता. मात्र तीं दिसण्यास सुरेख व आकारानें मोठी होती. त्यात जरी काहीं फुलाच्या ठिकाणीं आकारात व वर्णात निराळेपणा होता तरी पण त्या सर्वांचा निर्गंध हा गुणधर्म एकसारखाच होता. त्या उपवनाचे राज्य फुलें चालवीत असत. पण सगळयाचा धर्म एकच असल्यामुळें त्याची विशेष फूट न पडता एकीच होती. व तें उपवन केवळ या एकीच्या बळाने सबळ असे झाल होते. दुसऱ्या उपवनात नाना प्रकारची सुवासयुक्त, नेत्रानंद देणारीं अशीं लहान मोठीं अन्य अन्य जातीचीं फुलझाडे होतीं. येथलेंहि राज्य तेथलीं फुल झाडे करीत होती. पण त्याच्या गुणधर्माप्रमाणें मोठेपणाचा दर्जा मानला जात असे. तीं सर्व फुले आपल्या भिन्न भिन्न सुवासाच्या धर्मांकडे न पाहता मर्मांकडे लक्ष देऊन एकीनें वागत असत. असा क्रम बहुत दिवस चालला.

## पांढऱ्या गुलाबाचा कावा

हीं दोन्हीं उपवनें निरनिराळ्या ठिकाणीं होती. एका वेळेस मोठ्या सोसाट्याचा वारा सुटून या सुगंधी उपवनातील फुलाचा सुवास त्या निर्गंध असलेल्या फुलाना कळला आणि त्यामुळें ती सर्व फुले सुगंधानें वेडीं होऊन हा सुगंध कोठून येत आहे याच्या तपासास निघालीं. काही दिवसानीं तीं निर्गंध फुले या सुगंधी उपवनात येऊन पोहोचली. पण त्यानी पाहिलें कीं, या उपवनात आपले बीं रुजणे कठीण आहे. हें उपवन सर्व बाजूनें समृद्ध आहे. तेव्हा हे असलें अनुपम उपवन जर आपल्याला प्राप्त होईल तर आपलें मोठें भाग्य समजलें जाऊन आपण सर्वजण सुखी होऊ. तेव्हा हें सुगंधी उपवन ताब्यात घेण्याला काय युक्ति करावी याचा विचार करू लागलीं. तेव्हा त्यात एक पांढऱ्या जातीचा गुलाब होता. त्यानें विचार करून आपलें मत आपल्या जातभाईपुढें मांडल व सांगितलें कीं, जर आपणास या उपवनाचा ताबा हवा असेल तर त्याला थोडी युक्ति आहे. ती अशी कीं, या उपवनातील फुलें जरी शक्तीनें, बुद्धीनें, आपणांहून श्रेष्ठ असलीं तरी त्याच्या भिन्न

भिन्न जाती आहेत. तेव्हा याच एका तत्त्वावर त्याच्यात आपल्याला यादवी उत्पन्न करता येऊन हळूहळू त्याचे उपवन आपल्या ताब्यात घेता येऊन या सुगंधित फुलाना कायमचें दासानुदास करून टाकता येईल. त्यात इतकीच एक अडचण आहे कीं, या उपवनात आपल्याला थारा मिळेपर्यंत मोठे लीनतेनें वागावें लागेल.

असा विचार करून तो पांढरा फटफटीत गुलाब या गुलाबी गुलाबाला भेटण्यास आला व म्हणाला की, "महाराज! काय आपले सौंदर्य! आपले वैभव इंद्राच्या वैभवालासुद्धा मागे सारील. आम्ही फार लाचार फुले आहोत. आम्हाला सुवास नाही म्हणून उपवनात जर आम्हा दोघातिघाना थोडीशी जागा द्याल तर आम्ही तुमच्या सहवासानें सुगंधित होऊ. शिवाय आपले हे उपवनहि मोठे आहे. तेव्हा आमच्या रहाण्यानें आपल्या वागणुकीस अडचण येईल असा संभव नाहीं." तो सुवासिक गुलाब थोडा भोळा होता व थोडा भोळा असल्याखेरीज ईश्वरी कृपाहि होत नसते. असो. तो सुगंधी गुलाब त्या निर्गंध गुलाबाला चटदिशी 'हो' म्हणाला, व आपल्या उपवनात त्यानें त्याला थोडीशी जागा दिली.

## फडशा उडवूं या

बी रुजल्यावर त्यानीं याप्रमाणे उपक्रम सुरू केला होता तो असा. एक दिवस हा निर्गंध गुलाब मोगऱ्याला म्हणाला की, "तुमचें मोठें दैन्य आहे. या काटेरी गुलाबानें तुमच्यावर वर्चस्व मिरवावे हे काहीं चागलें नाहीं. न्यायदृष्टीने पाहता तुमच्या अंगी जो सुवास आहे, त्यायोगानें तुम्हीच या उपवनाचे राजे होण्याला पात्र होता. तुमचा भोळे पणा तुम्हालाच भोवला आहे. तुम्हाला जर या उपवनाची मालकी पाहिजे असेल तर आम्ही तुम्हाला मदत करून या गुलाबाचा फडशा पाडू." हे त्याचे म्हणणें मोगऱ्याना पटले, व मोगऱ्यानें एक सभा बोलाविली. त्यात पांढऱ्या वर्णाचें प्राधान्य होतें. म्हणजे पांढरा कण्हेर, जाई, जुई, दुधाणी, घोतग, टाकळी म्हणजे जेवढीं पांढऱ्या रंगीची फुलें होतीं, तेवढ्याना बोलावून मोगऱ्यानें सांगितले की, "मित्रहो? आज पर्यंत आपण या गुलाबाच्या जुलमी अमलाखालीं दिवस काटले. पण आपल्या सुदैवाने हे आपले पाहुणे येथे आल्यामुळे आपला भाग्योदय होण्याची वेळ आली आहे. ती आपण गमविता कामा नये. त्याना सामील होऊन या गुलाबाचा फडशा उडविला पाहिजे."

मग काय, सर्वच फुलानी गुलाबाचें दैन्य मांडलें! कोणाचा पायपोस कोणाच्या पायात राहिला नाही! असें झालें असता हा निर्गंधी गुलाब त्या गुलाबाला म्हणाला कीं, महाराज तुमच्या उपवनातील ही अन्य वन्य जातीचीं फुले उलटली आहेत. ही तुमचा नायनाट करण्यासाठीं आमची मदत मागत आहेत, पण आम्हाला तुम्ही केलेल्या उपकाराकडे दृष्टी देऊन तसें करता येत नाही. आम्हाला तुमच्या उपवनाशीं केव्हाहि कृतघ्न व्हावयाचें नाहीं. म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदानें व एकीने रहावें व तें आम्ही पहावे. याचसाठीं आम्ही येथें आलो आहोत. म्हणून आमची भीति न धरता

तुम्ही आमच्यावर विश्वास ठेवा व आम्ही सांगितल्याप्रमाणे चाला तर तुमचे कल्याण व हित होणार आहे." हा सुवासिक गुलाब आधीच या भांडणाने गांगरून गेला होता. त्याने चट्दिशी मान्यता देण्याचें कबूल केलें. असे झाल्यावर हा निर्गंध गुलाब मोग ऱ्याला म्हणाला कीं, "मोगरे महाराज! तुम्ही जो तुमच्या गुलाबाचा नायनाट कर ण्याचे मनात आणले आहे, हे अगदीं रास्त आहे. पण या कामात तुमचे कल्याणा साठीं तुम्ही सबुरी धरली पाहिजे. कारण तुम्ही जशी पांढऱ्या फुलांनी आपली एकी करून घेतली तशी तांबड्या फुलांनींहि आपली एकी करून घेण्याचा संभव या उपवनात आहे. ती अशी—तांबडा गुलाब, तांबडी जास्वंदी, तांबडा कण्हेर, तांबडी कर्दळी.

## आम्ही तुमचे रक्षण करूं

पण हे तत्त्व अजून त्या गुलाबाच्या लक्षात आलें नाही. त्याने जर आम्हास विचा रलें तर त्यास आमच्या उपवनाच्या कायद्याप्रमाणें आम्हास खरा सल्लाच देणें भाग आहे. आणि तसें झालें तर दोन्ही पक्षात रणकंदन माजून नाहक एकमेकाचा नाश होण्याचा संभव आहे. तसे झालें तर आमच्यासारख्या न्यायी व्यक्तिला राहणें असह्य होईल. तूर्त तुमच्या सुवासिक गुलाबाचे अधिकार आम्ही स्नेहबुद्धीने आमच्याकडे घेतो. त्याला तुम्ही बिनदिक्कत मान्यता द्या. आम्ही तुमच्या कोणत्याहि जातीला, रिवाजाला, धर्माला न दुखविता तुमचें रक्षण करू. आम्ही, तुम्ही सौजन्यानें एक- मेकाशीं वागण्यास लायक झालात असें पहाताच तुमचे अधिकार तुम्हास देऊ." असे झाल्याबरोबर त्या सुगंधित उपवनातील फुलांनी या निर्गंध उपवनाची मालकी दिली. इतकें झाल्याबरोबर त्या निर्गंध गुलाबानीं सर्व उपवनाची खानेसुमारी करून जाती व आकडे कायम केले व आणि असा कायदा केला कीं, तुमच्या उपवनाचे राज्य तुमच्या सांगण्यावरून आम्हास करणें भाग आहे. पण आम्हास कोणाचा अपहार करावयाचा नाही. तेव्हा तुमच्या सल्ल्यानें राज्य करण्यासाठीं तुम्हीं आपल्यातून एकेक व्यक्ति निवडून द्यावी.

त्याप्रमाणें सर्व फुलानीं आपल्यातील एकेक इसम निवडून दिला. त्यायोगानें फायदा न होता उलट नुकसानच होण्याची पाळी आली. कारण फुलें चांगलीं तरी त्यांची बाजू मांडणारी व्यक्ति एकच, त्यामुळें चांगल्या फुलाचा ऱ्हास होत चालला. कारण जिकडे बहुमत होईल ती बाजू खरी धरून त्याप्रमाणें उपवनाचे कायदे होऊ लागले सभेचा प्रथमतः असा कायदा होता की, पोटजातीकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. तांबडा आणि पांढरा अशाच दोन वर्गाला प्रतिनिधी निवडून देण्याचा अधि कार राहील. निळ्या फुलांना व पिवळ्या फुलांना जसें आजपर्यंत तांबड्या—पांढऱ्याच्या ताब्यात राहावे लागले तसेंच आता राहिलें पाहिजे. कारण हे दोन्ही वर्ग चांगले सुशिक्षित असल्यामुळें या अल्पसंख्याक असलेल्या फुलाचा नायनाट करण्याला तयार होणार नाहींत. त्यामुळें असें झालें कीं, त्या सभेच्या ठिकाणी तांबड्या फुलाचे प्रतिनिधी चारच येऊ लागले, व पांढऱ्या फुलाचे दहावीस येऊं लागले, यामुळें पांढऱ्या फुलांचे

बहुमत होऊं लागून तांबड्या फुलाच्या ऱ्हासाला आरंभ झाला. तो इतका की, पांढरें फूल तांबड्या फुलाला आपल्या शेजारीसुद्धा राहू देण्यास तयार होईना व तांबड्या फुलाचें बहुमत नसल्यामुळे त्याचें कांहीच चालेना.

## तांबड्या फुलांचा नायनाट

एकदा तर असें झालें की, पांढऱ्या फुलाचें बहुमत असल्यामुळें त्यानीं असा कायदा केला की, तांबड्या फुलाना पोषक असलेलें खतसुद्धा या उपवनात राहू देऊं नये. कारण त्यामुळें पांढऱ्या फुलाच्या स्वास्थ्याला, इज्जतीला कमीपणा येण्याचा संभव आहे. तसेंच पाणीसुद्धा, पांढऱ्या पांढऱ्या फुलाची सगळीं आळीं भरल्यावर, तांबड्या फुलानीं त्यात अल्पसंख्याक जीं निळीं व पिवळीं फुलें याना पाणी घेण्याचा मान आधी दिला पाहिजे. असें झाल्यामुळें थोडे दिवसातच तांबड्या फुलाची उपवनातून बहुतेक हकालपट्टी झाली. कांहीं थोडीशी काटेकुपाटीला जीव धरून होतीं. या तांबड्या फुलाच्या नायनाटाला या निर्गंध गुलाबानें मुळींच आळा घातला नाहीं व त्याच्या तक्रारीकडे लक्ष दिलें नाहीं. त्यानीं एखादे वेळ प्रयत्न करून तक्रार आणली तर तो निर्गंध गुलाब त्याना गोड शब्दानें असें सांगे कीं, " काय करावें ? तुमचे हाल आम्हाला पहावत नाहींत. पण तुमचें बहुमत नसल्यामुळें आम्हाला काहीं करता येत नाहीं." त्याच्याकडे या निर्गंध गुलाबानें जें लक्ष दिलें नाहीं त्याचें कारण इतकेंच होतें कीं, तांबड्या फुलाचा नायनाट होणेंच त्याला इष्ट होतें.

## अक्षयचे गुलाम

तांबड्या फुलाचा बहुतेक नायनाट झाल्यावर या गुलाबानें निर्गंध असें एक मत मांडलें कीं, आजपर्यंत जें आपण वर्णाचें वर्गीकरण करून कायदे करून घेत होतो, ते काहीं बरें नाहीं. कारण त्यामुळें तांबड्या सुगंधित फुलाचा आज या उपवनातून बहुतेक निकाल झाला आहे. तें काहीं चांगलें झालें नाहीं. जीं तांबडीं फुलें एका काळीं या उपवनाच्या सार्वभौमपदाचा उपभोग घेत होती, त्याचा या असल्या निवडणुकीच्या कायद्यानी निकाल व्हावा हें काहीं चांगलें झालें नाहीं. तेव्हा अशी आपत्ति या उपवनावर पुन्हा न यावी एवढ्यासाठीं आता जातवार प्रतिनिधीच निवडून देण्याचें तत्त्व अंमलांत आणलें पाहिजे.

असें झाल्यावर थोड्याच दिवसात मोगरा, जाई, जुई, निशिगंध वगैरे फुलाचीहि तांबड्या फुलाप्रमाणेंच स्थिति झाली. कारण धोतरा, दुधाणी, इंदगा, रोयगा, पांढरा कण्हेर या हलक्या फुलाचेंच बहुमत होऊं लागलें. असें झाल्यावर लगेच पुन्हा एकमत प्रस्थापित झालें कीं, ज्याअर्थी या हीन फुलानीं उपवनाची जागा नाहक व्यापून टाकिली आहे, त्याअर्थी याचा उपवनाच्या हितीकरता सक्तीनें नायनाट करून त्या ठिकाणीं या सुगंधित फुलांची वाढ बंद करून या निर्गंध फुलाची वाढ होऊं दिली पाहिजे. त्यांना निकाल आलेल्या फुलांप्रमाणें जरी वास नसला तरी

नेत्रानंद प्राप्त होईल असा कायदा करून त्या सौगंधिक उपवनाचे ठिकाणीं या निर्गंध फुलानीं आपला जयजयकार करून घेतला व तेथील कटीमर्चीं नादत असलेलीं फुलें क्वचित् काटेकुपाटीला दृष्टीस पडू लागली. जी फुलं एका काळी त्या उपवनात सत्ताधारी होती तींच या पाहुण्याच्या कृपेनें अश्रयीचीं गुलाम होऊन आसूं गाळीत राहिलीं.

—— o ——


प्रेस ॲक्टनुसार सादर करावयाची माहिती

तक्ता क्रमांक ४

## श्री साईलीला

मालकी व तत्संबंधी इतर तपशील

| | | |
|---|---|---|
| १ प्रकाशन स्थळ | : | साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट न. ८०४ बी. दादर, मुंबई १४. |
| २ प्रकाशनाचे नांव | : | श्री साईलीला ( मासिक ) |
| ३ मुद्रकाचे नांव | : | शरद कृष्णाजी सापळे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | रुक्मिणी निवास, मोरबाग रोड, दादर मुंबई १४. |
| ४ प्रकाशकाचे नांव | : | श्रीपाद बाळकृष्ण दर्प ( रिसिव्हर ) |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट न. ८०४ बी, दादर, मुंबई १४. |
| ५ संपादकाचे नांव | : | श्रीपाद बाळकृष्ण दर्प ( रिसिव्हर ) |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट न. ८०४ बी, दादर, मुंबई १४. |
| ६ पत्राची मालकी | : | श्री साईबाबा शिरडी संस्थान, व्यवस्थापक रिसिव्हर—दर्प |
| पत्ता | : | वरीलप्रमाणें |

मी श्री. बा. दर्प असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती-प्रमाणें खरा आहे.

प्रकाशकाची सही

**श्रीपाद बाळकृष्ण दर्प**

प्रकाशक

# उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म

— संत विनोबा

**आपण प्रत्येक गोष्ट श्रद्धायुक्त अंतःकरणाने केली पाहिजे. तसेच सर्व सेवा परमेश्वरार्पण करावयाची हा भाव सतत जागा हवा. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. ईश्वरार्पण बुद्धि असल्याशिवाय तिला सेवामयतेचे स्वरूप येऊं शकत नाही.**

## ज्ञानी पुरुषांचा आचार्य

आपली वृत्ति प्रसन्न व मोकळी रहावी असें वाटत असेल तर आपण आपले वर्तन बाधून घेतलें पाहिजे. आपला नित्य कार्यक्रम कोणत्या तरी ठराविक भूमिकेवरून चालला पाहिजे. त्या मर्यादेने, त्या एका निश्चित नियमित रीतीनें आपले जीवन चालले तरच मन मोकळे राहू शकेल. नदी मोकळेपणे वाहते. परंतु तिचा प्रवाह बाधलेला आहे. जर बाधलेला नसेल तर तिचा मोकळेपणा वाया जाईल. ज्ञानी पुरुषांचे उदाहरण आपण डोळ्यासमोर घेऊ या. सूर्य हा ज्ञानी पुरुषाचा आचार्य आहे. भगवतानीं प्रथम कर्मयोग सूर्यास शिकविला व सूर्यापासून मनूस, म्हणजे विचार करणाऱ्या मनुष्यास, प्राप्त झाला सूर्य स्वतन्त्र व मोकळा आहे. तो नियमित आहे यातच त्याच्या स्वतंत्रेचे सार आहे. आपल्या अनुभवाची गोष्ट आहे की, ठराविक रस्त्यानें फिरावयास जाण्याची जर आपणास संवय असेल तर रस्त्याकडे लक्ष न देता मनानें आपणास विचार करीत फिरता येतें. रोज नवीन नवीन रस्ता जर फिरण्यासाठीं आपण काढू, तर सारे लक्ष त्या मार्गाकडेच द्यावे लागेल. मनाला मग मोकळीक राहणार नाही. साराश, जीवनाचा बोजा न वाटता जीवनात आनद वाटावा, यासाठीं आपण वर्तन बाधून घेतले पाहिजे.

## तीन संस्था

आपण जन्मताच तीन सस्था बरोबर घेऊन जन्मत असतो. या तीन सस्थाचे कार्य मनुष्याने उत्तम रीतीनें चालवून ससार सुखमय करावा यासाठीं गीता कार्यक्रम सागत आहे. कोणत्या या तीन सस्था ? आपल्याभोवती गुंडाळलेलें हे शरीर ही एक संस्था; आपल्या आसपास पसरलेलें हें विशाल ब्रह्माड, ही अपार सृष्टि, जिचा आपण एक अंश आहोंत ती दुसरी संस्था; आणि ज्या समाजात आपण जन्मलो तो समाज, आपल्या जन्माची वाट पाहत असलेले ते आईबाप, बहीणभाऊ, आसपासचे शेजारी-पाजारी, ही तिसरी संस्था. या तिन्ही सस्था आपण रोज वापरतो, झिजवतो. गीतेची अशी इच्छा आहे कीं, या संस्थांची आपल्यासाठी जी झीज होते ती भरून काढण्यासाठी आपण सतत प्रयत्न करावा व जीवन सफल करावें. अहंकार दूर ठेवून या संस्थांसबंधींचें हें जन्म-प्राप्त कर्तव्य आपण केले पाहिजे.

हे कर्तव्य करायचे खरें, पण त्याची योजना कोणती? यज्ञ, दान व तप या तिहींनीं मिळून ही योजना होते. हे शब्द आपल्या परिचयाचे असले तरी त्यातील अर्थ आपणास नीट समजत नसतो. अर्थ समजून घेऊन जर जीवनात त्या गोष्टी भरुन राहतील तर तीनहि संस्थांचे साफल्य होऊन आपलें जीवनहि मोकळें व प्रसन्न राहील.

### त्रिविध क्रियायोग

हा अर्थ समजून घेण्यासाठी प्रथम यज्ञ म्हणजे काय तें पाहू. सृष्टिसंस्था आपण रोज वापरतो. शंभर माणसें एके ठिकाणीं राहिलीं तर दुसऱ्या दिवशीं तेथील सृष्टि बिघडलेली दिसते तेथील हवा आपण बिघडवितों, जागा गलिच्छ करतों. अन्न खातों व सृष्टिहि झिजवितों. सृष्टि–संस्थेची ही झिज भरून काढली पाहिजे. यासाठी यज्ञसंस्था निर्माण झाली. यज्ञाचा उद्देश काय? सृष्टीची जी झीज होते ती भरून काढणे म्हणजे यज्ञ. आज हजारो वर्षे आपण जमिनीची मशागत करीत आहोत. भूमीचा कस कमी होत आहे. आपण तिला झिजवीत आहोंत. यज्ञ म्हणतो, "पृथ्वीचा कस परत दे. जमीन नांगर. सूर्याची उष्णता निच्यात साठू दे. खत घाल." झीज भरून काढणे हा यज्ञातील एक हेतु. दुसरा हेतु म्हणजे वापरलेल्या वस्तूंचें शुद्धीकरण करणें. आपण विहीर वापरतों. आजूबाजूस घाण होते. पाणी साचते. विहीरीजवळची ही जी सृष्टि बिघडली, ती शुद्ध करावयाची. तेथील पाणी काढून लावायचे. चिखल दूर करावयाचा. झीज भरून काढणे, शुद्धि करणें, या गोष्टी बरोबरच प्रत्यक्ष काहीं निर्माण करावयाचे ही तिसरी गोष्टहि यज्ञात आहे. कापड वापरलें, रोज पुन्हा सूत कातून तें निर्मावयाचे. कापूस पिकविणे, धान्य निर्माण करणें, सूत कातणें, हीहे यज्ञक्रियाच. यज्ञात जे निर्माण करावयाचें ते स्वार्थासाठी नव्हे. आपण जी झीज केली ती भरून काढण्याची कर्तव्य–भावना तेथें असली पाहिजे. हा परोपकार नाही. आपण आधीच ऋणी आहोत. जन्मतःच ऋण डोक्यावर घेऊन आपण आलों हे ऋण फेडण्यासाठीं जी निर्मिति करावयाची तो यज्ञ म्हणजे सेवा आहे, परोपकार नव्हे त्या सेवेनें ऋण फेडावयाचे आहे. पदोपदीं सृष्टि — संस्था आपण वापरतों. तिची झीज भरून काढण्यासाठीं, तिची शुद्धि करण्यासाठीं, व नवीन उत्पन्न करण्यासाठीं, यज्ञ करावयाचा.

### मनुष्य समाज

दुसरी संस्था म्हणजे मनुष्य—समाज. आईबाप, गुरु, मित्र हे आपल्यासाठीं मेहनत करीत असतात. हे समाजाचें ऋण फेडण्यासाठी दान आहे. समाजाचें ऋण फेडण्यासाठी केलेला प्रयोग म्हणजे दान. दान म्हणजे परोकार नव्हे समाजापासून मी अपार सेवा घेतलेली आहे. मी या जगात असहाय व दुबळा होतों. या समाजानें मला लहानाचें मोठे केले. यासाठीं मी समाजाची सेवा करावयाची. दुसऱ्याचें काहीं न घेतां केलेली सेवा म्हणजे परोपकार. परतु येथें समाजापासून आधींच भरपूर घेत लेलें आहे. समाजाच्या या ऋणातून मुक्त होण्यासाठीं जी सेवा म्हणजेच दान. मनुष्य

समाजाला पुढे जाण्यासाठी मदत करणें म्हणजे दान सृष्टीची झीज भरून काढण्या साठीं केलेली मेहनत म्हणजे यज्ञ. समाजाचे ऋण फेडण्यासाठीं शरीरानें, द्रव्यानें, वा अन्य साधनानें, केलेली मदत तें दान होय.

याशिवाय तिसरी एक संस्था आहे. ती म्हणजे शरीर. शरीराचीहि दिवसेंदिवस झीज होत असते. आपण मन, बुद्धि व इंद्रियं या सर्वांना वापरतो, झिजवतो. या शरीररूपी संस्थेत जे विकार, जे दोष, उत्पन्न होतील त्याच्या शुद्धीसाठीं तप सांगितलें.

अशा तऱ्हेने सृष्टि, समाज व शरीर या तिन्ही संस्थाचे काम उत्कृष्ट चालेल असें वागणें हे आपलें कर्तव्य आहे. आपण योग्य वा अयोग्य अनेक संस्था निर्माण करतो. परंतु या तीन संस्था आपण निर्मिल्या नाहींत. त्या स्वभावतःच आपणास मिळाल्या आहेत. या संस्था कृत्रिम नाहीत. अशा या तीन संस्थाची यज्ञ–दान–तप या साधनांनी झीज भरून काढणें, हा माझा स्वभावप्राप्त धर्म आहे. या रीतीनें आपण वागू लागू तर आपली असेल नसेल ती शक्ति येथें लागेल. इतर गोष्टी करण्यास अवान्तर शक्ति शिल्लकच राहणार नाहीं. सृष्टि, समाज व हे शरीर या तिन्ही संस्था सुंदर राहण्यासाठीं आपली सारी शक्ति खर्च करावी लागेल. कबीरासारखें जर आपणासहि म्हणता आलें, "देवा, तूं मला जशी चादर दिलीस, तशी मी परत देऊन चाललो. नीट तपासून घे ही चादर." तर केवढी सफलता आहे ती! परंतु अशी सफलता प्राप्त व्हावी यास्तव यज्ञ–दान–तपाचा त्रिविध कार्यक्रम आचरला पाहिजे.

### भव्य सृष्टिसंस्था

यज्ञ, दान व तप याच्यात आपण भेद पाहिला. परंतु खरें म्हटलें तर भेद नाहीं. कारण सृष्टि, समाज व शरीर या तीन अजिबात निरनिराळ्या संस्था नाहींत. हा समाज सृष्टीबाहेर नाहीं. हें शरीरहि सृष्टिबाहेर नाहीं. तिन्ही मिळून एकच भव्य सृष्टि-संस्था होते. म्हणून जो उत्पादक परिश्रम करावयाचा, जें दान करावयाचें, जें तप आचरावयाचें, त्या सर्वांना व्यापक अर्थानें यज्ञच म्हणता येईल. गीतेनें चौथ्या अध्यायात द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, वगैरे यज्ञ सांगितले आहेत. गीतेनें यज्ञाचा अर्थ विशाल केला आहे.

या तीनहि संस्थासाठी जी जी सेवा करू, ती सेवा यज्ञरूपच असणार. ती सेवा निरपेक्ष असली म्हणजे झालें. या सेवेंत फलाची अपेक्षा ठेवता येणारच नाहीं. कारण फल आपण आधींच घेऊन चुकलो आहोत. ऋण अगोदरच शिरावर आहे. घेतलेलं परत करावयाचें आहे. यज्ञानें सृष्टिसंस्थेंत साम्यावस्था प्राप्त होते. दानानें समाजात साम्यवस्था प्राप्त होते. तपानें शरीरात साम्यावस्था राहते. अशा रीतीनें तीनहि संस्थात साम्यावस्था ठेवण्याचा हा कार्यक्रम आहे. यानें शुद्धि होईल व दूषित भाव नाहींसा होईल.

ही जी सेवा करावयाची, त्यासाठीं काहीं भोगहि घ्यावा लागेल. भोग हेंहि एक यज्ञाचेंच अंग आहे. या भोगाला गीता आहार म्हणते. या शरीररूपी यंत्राला अन्नरूपी

कोळसा दिला पाहिजे. हा आहार जरी स्वतः यज्ञ नसला तरी यज्ञ सिद्ध होण्याचें तें एक अंग आहे. म्हणून "**उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म**" असें आपण म्हणतो. बगीच्यातून फुलें तोडून आणून देवाच्या शिरीं वाहिली ही पूजा. परतु फुलें निर्माण करण्यासाठीं बगीच्यात मेहनत केली, तीहि पूजाच. यज्ञ पुरा करण्यासाठी जी जी क्रिया करावयाची, ती एक प्रकारची पूजाच होय. देहाला आहार दिला तरच देह उपयोगी पडेल. यज्ञ–साधन अशी कर्मे, तींहि यज्ञच. गीता या कर्मांना "तदर्थीय कर्म" यज्ञार्थ कर्म असें म्हणते. हें शरीर सेवेसाठीं सदा उभें रहावें, म्हणून या शरीराला जी मी आहुति देईन, ती आहुति यज्ञरूप आहे. सेवार्थ केलेला आहार पवित्र आहे.

या सर्व गोष्टींच्या मुळाशी पुन्हा श्रद्धा हवी सर्व सेवा परमेश्वरार्पण करावयाची हा भाव हवा. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. ईश्वरार्पण बुद्धीशिवाय सेवामयता येऊ शकत नाहीं. ईश्वरार्पणता ही प्रधान वस्तु विसरून चालणार नाहीं.

## साधनेचें सात्त्विकीरण

परतु आपल्या क्रिया ईश्वराला केव्हा अर्पण करता येतील? त्या सात्त्विक होतील तेव्हा. आपलीं सर्व कर्मे जेव्हा सात्त्विक होतील तेव्हाच ती देवास अर्पण करता येतील. यज्ञ, दान, तप, सर्व सात्त्विक पाहिजेत. क्रिया सात्त्विक कशा करावयाच्या ह्याचें तत्त्व आपण पाहिलें.

ही सात्त्विकतेची योजना करण्यात गीतेचा दुहेरी उद्देश आहे बाहेरून यज्ञ–दान तपाची जी विश्व–सेवा चालली आहे, तिलाच आतून आध्यात्मिक साधनेचें नाव देता यावें. सृष्टीची सेवा व साधना याना दोन निरनिराळें कार्यक्रम नकोत. साधना व सेवा या दोन निरनिराळ्या गोष्टी नाहींतच मुळी. दोहोसाठीं एकच प्रयत्न, एकच कर्म. असें केलेलें जें कर्म ते पुन्हा शेवटीं ईश्वरार्पण करावयाचें. सेवा+साधना+ईश्वरार्पणता हा योग एकाच क्रियेनें साध्य झाला पाहिजे.

यज्ञ सात्त्विक होण्यासाठीं दोन गोष्टीची जरुरी आहे. निष्फलतेचा अभाव व सकामतेचा अभाव. या दोन गोष्टी यज्ञात असाव्यात. यज्ञामध्यें जर सकामता असेल तर तो राजस यज्ञ होईल. निष्फलता असेल तर तो तामस यज्ञ होईल.

सूत कातणे हा यज्ञ आहे. सूत कातताना जर त्यात आत्मा ओतला नसेल, चित्ताची एकाग्रता नसेल, तर तो सूत्रयज्ञ जड होईल. बाहेरून काम चालले असता आतून मनाचा मेळ नसेल तर ती सारी क्रिया विधिहीन होईल. विधिहीन कर्म जड होतें. विधिहीन क्रियेंत तमोगुण येतो. ती क्रिया उत्कृष्ट निर्मिति करूं शकत नाहीं. फलाची निष्पत्ति तिच्यापासून होत नाहीं. यज्ञात सकामता नसली तरी उत्कृष्ट फल त्यापासून मिळालें पाहिजे. कर्मात जर मन नसेल, आत्मा नसेल, तर तें कर्म बोजारूप होईल. त्यापासून मग कोठलें उत्कृष्ट फल? बाहेरचें काम बिघडलें तर आत मनाचा मेळ नव्हता ही गोष्ट निश्चित. कर्मात आत्मा ओता. आतून मेळ ठेवा. सृष्टि–संस्थेचें

# तुळसी-रामायणांत भारताचें महत्व

— संत विनोबा

**रामायणांतलि भरत हा तुळसीदासजींची ध्यानमूर्ति होता. ही ध्यानमूर्ति निवडण्यांत औचित्य आहे. लक्ष्मण व भरत दोघेही रामाचे परम भक्त. पण एकाला संगतीचें भाग्य लाभलें आणि दुसऱ्याला लाभलें वियोगाचें भाग्य. पण भरतानें वियोगांतही रामाच्या संगतीचा अनुभव मिळविला. आमच्या नशिबी परमेश्वराच्या वियोगांत रहाण्याचें लिहिलें आहे. त्या वियोगाचेंही भाग्य कसे बनवितां येतें याचा उत्तमादर्श म्हणजे भरत. आणि तोच आम्हांला उपयोगी आहे, कसा तो पहा !**

तुलसीदासजींच्या रामायणाचें हिंदुस्थानच्या साहित्याच्या इतिहासात एक स्वतंत्र स्थान आहे. हिंदी राष्ट्रभाषा. तिच्यातला हा सर्वोत्तम ग्रंथ. म्हणून राष्ट्रीय दृष्टीनें त्याचे स्थान अद्वितीय आहेच पण हिंदुस्थानातल्या सातआठ कोट लोकांत वेदतुल्य प्रमाण मानलेला, नित्यपरिचित धर्मजागृतीचा एकच एक आधार म्हणून धर्मदृष्ट्याहि त्याचें स्थान अद्वितीय म्हटलें पाहिजे. आणि रामभक्तीचा प्रचार करण्यात "**शिष्यादिच्छेत् पराजयम्** " ह्या न्यायानें वाल्मीकि-रामायणालाहि पराजयाचा आनद देणारा म्हणून भक्तिमार्गाच्या दृष्टीनेंहि तें अद्वितीयच. तिन्ही दृष्टि एकवटून विचार केला तर हें अनन्वयालकाराचे उदाहरण होतें. रामरावणाचें युद्ध जसें रामरावणाच्या युद्धासारखें तसें तुलसीरामायण तुलसीरामायणासारखें.

आधींच रामायण म्हणजे मर्यादापुरुषोत्तम रामचद्राचें चरित्र. पुन्हा तुलसीदासजींनीं ते विशेषच 'मर्यादेनें लिहिलेलें. त्यामुळें ग्रथ लहान मुलाच्याहि हातात देण्यासारखा निर्दोष आणि पवित्र झाला आहे. सर्व रसाचीं वर्णनें नैतिक मर्यादा

---

ऋण फेडण्यासाठीं आपणास उत्कृष्ट फलोत्पत्ति केली पाहिजे. कर्मात फलहीनता येऊ नये म्हणून ही आतरिक मेळाची विधियुक्तता असली पाहिजे.

अशा रीतीने निष्कामता अंगीं बाणून विधिपूर्वक यशस्वी कर्म हातून होईल, तेव्हाच चित्तशुद्धि होऊ लागेल. चित्तशुद्धीची कोणती कसोटी? बाहेरचें काम तपासून पहावें. तें जर निर्मळ व सुदर नसेल तर चित्तहि मलिन समजण्यास हरकत नाहीं. कर्मात सौंदर्य तरी केव्हा निर्माण होतें? चित्तशुद्धिपूर्वक व परिश्रमपूर्वक केलेल्या कर्मांवर परमेश्वर आपल्या पसंतीचा, आपल्या प्रसन्नतेचा, शिक्का मारतो. प्रसन्न परमेश्वरानें कर्माच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवला म्हणजे तेथें सौंदर्य उत्पन्न होतें. सौंदर्य म्हणजे पवित्र श्रमाला मिळालेला परमेश्वरी प्रसाद होय.

---

सांभाळून केलेलीं आहेत. खुद्द भक्तीलाहि नीतीची शिस्त लावली आहे. त्यामुळें सूरदासांसारखी मस्त भक्ति येथें पहावयास सांपडत नाहीं. तुलसीदासजींची भक्ति नेमस्त भक्ति. नेमस्त भक्ति आणि मस्त भक्ति ह्यांतला फरक म्हणजे मूळ रामभक्ति आणि कृष्णभक्ति ह्यांतलाच फरक आहे. पण त्यांतहि तुलसीदासजींचें कांहीं तरी आहेच.

तुलसीरामायणाचा वाल्मीकिरामायणापेक्षां अध्यात्मरामायणाशीं अधिक संबंध आहे. पुष्कळशा वर्णनांवर, विशेषतः भक्तीच्या उद्‌गारांवर, भागवताची छाप पडलेली आहे. गीतेची तर आहेच. महाराष्ट्रांतील भागवतधर्मीय संतांच्या ग्रंथांशीं ज्याचा परिचय आहे त्याला तुलसीरामायणांत कोठेंच चुकल्याचुकल्यासारखें म्हणून वाटत नाहीं. तीच नीति, तीच निर्मल भक्ति, तोच संयम. सुदामदेवाला जसें आपल्या नगरींत आल्यावर आपण पुन्हां द्वारकेंतच गेलों की काय असें वाटलें तसें तुलसीदासजींचें रामायण वाचतांना महाराष्ट्रीय संतमंडळींच्या वचनाशीं परिचय असलेल्या वाचकाला आपण तींच आपलीं पूर्वपरिचित वचनें वाचत नाहीं ना अशी शंका येण्यासारखी आहे. त्यांतल्या त्यांत, नाथांची आठवण विशेष होते. नाथांचें भागवत आणि तुलसीरामायण ह्यांत विचाराचें साम्य विशेष आहे. नाथांनीं रामायणहि लिहिलें आहे. पण नाथांचा आत्मा उतरला भागवतांत. रानड्यांना पागल केलें नाथांच्या भागवतानें. नाथ कृष्णभक्त. तुलसीदासजी रामभक्त. नाथांनीं कृष्णभक्तीची मस्ती जिरवली हा नाथांचा विशेष. ज्ञानदेव, नामदेव, तुकोबा नाथ—सगळेच कृष्णभक्त. आणि असें असून अत्यंत मर्यादशील. म्हणून ह्या बाबतींत तुलसीदासजीपेक्षां त्यांना दोन मार्क जास्त देणें गैर होणार नाहीं.

## वियोगाचें भाग्य बनलें

तुलसीदासजींची मुख्य करामत त्यांच्या अयोध्याकांडांत आहे. त्यावर त्यांनीं विशेष परिश्रम घेतले आहेत. आयोध्याकांडांत भरताची भूमिका अद्‌भुत रंगविली आहे. भरत तुलसीदासजींची ध्यानमूर्ति होता. ही ध्यानमूर्ति निवडण्यांत औचित्य आहे. लक्ष्मण आणि भरत दोघेहि रामाचे परम भक्त. पण एकाला संगतीचें भाग्य लाभलें आणि दुसऱ्याला वियोगाचें भाग्य. वियोगाचें 'भाग्य' बनलें. कारण वियोगातहि भरतानें संगतीचा अनुभव मिळविला. आमच्या नशिबीं परमेश्वराच्या वियोगात राहून काम करण्याचें लिहिलें आहे. लक्ष्मणासारखें संगतीचें भाग्य आमचें नाही. म्हणून वियोगाचेंहि भाग्य कसें बनवितां येते हें समजण्याला भरताचा आदर्शच आम्हांला उपयोगी आहे.

शारीरिक संगतीपेक्षां मानासिक संगतीचें महत्व अधिक आहे. शरिरानें मनुष्य वियोगाचेंहि भाग्य कसं बनवितां येतें हें समजण्याला भरताचा आदर्शच आम्हांला उपयोगी आहे.

शारीरिक सगतीपेक्षा मानसिक सगतीचे महत्त्व अधिक आहे. शरिराने जवळ असून मनुष्य मनाने दूर राहू शकतो, रात्रदिवस नदीचें पाणी पाघरून निजलेला दगड ओलेपणापासून अजीबात अलिप्त राहू शकतो. उलट, शारीरिक वियोगातहि मानसिक संयोग असूं शकतो. त्यांत संयमाची कसोटी होते. भक्तीची तीव्रता वियोगाने वाढते. आनद पाहिला तरी साक्षात स्वराज्यापेक्षा स्वराज्यप्रतीच्या प्रयत्नाचा आनंद काहीं औरच आहे. मात्र तो अनुभवण्याइतकी रसिकता पाहिजे. भक्ताना ही रसिकता असते. म्हणून भक्त मुक्ति मागत नाहीत, भक्तीत खुश राहतात. भक्ति म्हणजे बाहेरचा वियोग पतकरून आतून मिसळून जाणें. हे नुसतें भाग्यच नव्हे तर परम भाग्य आहे. मुक्तीच्या माथ्यावरचे भाग्य आहे. भरताचे हे भाग्य होते. लक्ष्मणाचें भाग्यहि थोर. पण एक तर आमच्या नशिबी ते नाही आणि तेहि कमअसलच. ह्याचें कारण द्राक्षें आबट असेच केवळ नव्हे तर उपवास गोड हेंहि आहे. भरताच्या भाग्यात उपवासाची गोडी आहे.

“सन्यासी झाला तरी त्याला मोक्षाचा लोभ असतोच” असा गीतारहस्यात टिळकांनीं टोला हाणला आहे. पण हा टोला चुकविण्याचीहि युक्ति आमच्या साधुसतांनीं शोधून काढली. त्यानी लोभालाच संन्यास देऊन टाकला. खुद्द तुलसीदासजी भक्तीच्या भाजीभाकरीवर राजी आहेत. मुक्तीच्या मेजवानीचा त्यानीं तिटकारा केला आहे. ज्ञानोबानी “भोगमोक्ष निंबलोण । पायातळी,” “मोक्षाची सोडीबाधी करी,” “चहू पुरुषार्थां शिरीं भक्ति जैसी” वगैरे वचनात मुक्तीला भक्तीच्या घरची मोलकरीण बनविलें आहे. आणि तुकोबानीं तर “नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव” म्हणून मुक्तीचा राजीनामाच देऊन टाकला आहे. ‘मुक्तिवर भक्ति’ ही कल्पना नाथानीं पाचदहा वेळा माडली आहे. इकडे गुजराथेंतला नरसी मेहता “हरिना जन तो मुक्ति न मागें” हेंच गात आहे. मिळून सर्व भागवतधर्मीय वैष्णवाची परपरा मुक्तीच्या लोभापासून पूर्णपणें मुक्त आहे. ह्या परंपरेचा उगम भक्तशिरोमणि प्रल्हादापासून आहे. “नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्षु एकः ।”—गरीब लोकाना सोडून मी एकटाच मुक्त होऊ इच्छित नाहीं—असा रोकडा जबाब प्रल्हादानें नृसिंहाच्या तोंडावर देऊन टाकला आहे आणि कलियुगात श्रौतस्मार्तसन्यास–मार्गाची स्थापना करणाऱ्या शंकराचार्यांनीहि “ब्रह्मण्याध्याय कर्माणि सगं त्यक्त्वा करोति यः।” ह्या गीतेंतील श्लोकावर भाष्य करताना ‘सगं त्यक्त्वा’ म्हणजे “मोक्षेऽपि फले सगं त्यक्त्वा’—मोक्षाचीहि आसक्ति सोडून—असें मुद्दाम आपल्या पदरचे शब्द घालून प्रतिपादन केलें आहे. तुलसीदासजींचा भरत ह्या भक्तिभाग्याची मूर्ति आहे. भरताचें मागणे पहा :—

**अरथ न धरम न काम रुचि गति न चहउं निरवान ।**
**जनम जनम रति रामपद यह बरदानु न आन ॥**

*एकंदरींत टिळकानीं हाणलेला टोला संतानीं अगदींच हुकविला.*

भरताच्या ठिकाणीं वियोगभक्तीचा उत्कर्ष दिसून येतो म्हणून तुलसीदासजींना तो आदर्श झाला. भरतानें सेवा धर्म चोख बजावला. नैतिक मर्यादांचे संपूर्ण पालन केलें, देवाचे विस्मरण कधींहि होऊं दिले नाही. त्याची आज्ञा समजून प्रजेचे पालन केले पण त्याचे श्रेय देवाच्या चरणी अर्पण करून आपण मोकळा राहिला. लोकवस्तींत राहून अरण्यवास अनुभविला वैराग्ययुक्त चित्तानें यमनियमादि विषम व्रताचे पालन करून आत्म्याला देवापासून दूर राखणारा देहाचा पडदा पातळ करून टाकला. तुलसीदासजी म्हणतात. असा भरत जन्माला आला नसता तर माझ्यासारख्या पतिताला रामसन्मुख कोण करता ?—

सियराम-प्रेम-पियूष-पूरन होत जनम न भरतको
मुनि-मन-अगम जम-नियम सम-दम विषम व्रत आचरत को॥
दुख-दाह-दारिद-दंभ-दूषन सुजस-मिस अपहरत को।
कलिकाल तुलसीसे सठह नि हठि राम-सनमुख करत को॥

रामायणात रामसखा भरत, भारतात शकुंतलेचा पराक्रमी भरत आणि भागवतात जीवन्मुक्त जडभरत असे तीन भरत प्राचीन इतिहासात प्रसिद्ध आहेत. हिंदुस्थानला 'भारत-वर्ष' ही संज्ञा शकुंतलेच्या वीर भरतावरून पडली असावी असें ऐतिहासिक मत आहे. नाथांनी ज्ञानी जडभरतावरून ही संज्ञा पडली असें म्हटलें आहे. तुलसीदासजींना कदाचित् ती राम भक्त भरतावरून पडली असे वाटत असावें. कसेंहि असले तरी आजच्या वियोग भरताला भरताच्या वियोग-भक्तीचा आदर्श सर्व प्रकारें अनुकरणीय आहे. तुलसीदासजींनीं हा आदर्श आपल्या पवित्र अनुभवानें उजळून आपल्यापुढे ठेवला आहे. त्याप्रमाणें आचरण करणे आपले काम आहे.

—:०:—


# MATUNGA CLANING WORKS

**ESTD. 1934** *Prop.* **S. V. PRADHAN**

MODI NIWAS, BOMBAY 19

**Washers, Dyers and Dry Cleaners.**

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

# माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

# जें पिंडीं तें ब्रह्मांडीं—

************************

**नेहमीच्या प्रचारांतील म्हण, " पिंडी तें ब्रह्मांडी " आपण ही म्हण पुष्कळ वेळां ऐकली आहे. व तिचा अर्थ न समजतां, असेल कांही तरी म्हणून सोडूनही दिली आहे. या म्हणीचा अर्थ किती खोल आहे. ती किती व्यापक आहे, हें कळले, समजलें तर काय बहार होईल?**

### बुद्धीला पटले पाहिजे !

स्थुल मानानें याचा अर्थ, जे पिंडात म्हणजे वस्तुजातात आहे तेच ब्रह्मांडांत आहे. कसें ! हें समजून घेण्यास ईश्वरानें ( निसर्गाने म्हणा ) आपणास बुद्धि हें इंद्रिय दिले आहे. तिला पटले म्हणजे आपण ते ग्राह्य मानतो. बुद्धीला कसे पटतें ? प्रत्यक्ष प्रमाणानें किंवा खात्रीशीर अनुमानानें. त्यासाठी आपण विज्ञानाची कास धरतों. सृष्टीत आढळणाऱ्या वस्तुजातीचें पृथःकरण करता, करता शास्त्रज्ञानीं कांहीं मूळ द्रव्यें व त्यांचे अणु निश्चित केले. त्याचाहि विस्फोट करून अणु हा विद्युत् शक्तीतून निर्माण होतो व त्याचें रूप घन विद्युत् स्थिर व त्याभोंवतीं सतत फिरणारे ऋण विद्युत्कण असा निश्चय केला. बाह्यसृष्टीतहि आपला[1] सूर्य मध्यवर्ति व त्याचेंभोवतीं सतत पिंगा घालणारा ग्रह मेळा. मिळून झालेली सूर्यमाला म्हणतात. प्रत्येक अणु हा स्थूल सूर्यमालेचा लहान प्रतीकच आहे. व अशा अणूचेच श्रेढीनें विश्व बनले आहे. म्हणजे " पिंडी ते ब्रह्मांडी " यथार्थ झालें. ज्यानीं ही म्हण ब्रह्मांडाची रचना चिंतनात निरीक्षण करून निर्माण केली असेल त्याच्या बुद्धीचे कौतुक करावे तेवढें थोडेंच.

### ईश्वराचा शोध

" पिंडी ते ब्रह्मांडी " या म्हणीचा अर्थ इतकाच काय ? सृष्टीचे निर्मितीचे रचनेचा प्रकार येवढा समजला. पण त्यानें समाधान झालें नाहीं. अणु अणु मिळून सर्व दृश्यसृष्टी निर्माण झाली पण तिच्यात चलनवलन कशानें निर्माण झालें, तिची धारणा कशाचे आधारावर आहे. शिवाय जीवसृष्टींत, सुख, दुःख, संवेदना, वात्सल्य, दया, इत्यादि भावना प्रकार कशातून निर्माण होतात. याना उत्पन्न करणारा कोणी आहे काय ? असल्यास त्याचें रूप कसे आहे ? तोहि " पिंडी ते ब्रह्मांडी " या व्याख्येंत बसतो काय ? या शोधालाच ' ईश्वराचा शोध " म्हणतात. कारण स्थूल दृश्यसृष्टीच्या रचनेच्या बाहेरच्या या गोष्टी—भावना—आहेत. आपण हे हृदयाचे विकार मानतों. पण हृदयात काय आहे ? त्याचे सतत स्फुरण—आमरणात कसें चालतें. आपण हें पाहतों कीं, सजीव सृष्टींत " हृदय " आहे व तें जन्मापासून सतत चालू असतें. तें विराम पावलें कीं, तो जीव, देह मृत होतो. चलनवलन रहित, संज्ञेविरहित होतो व नासू लागतो. चलन वलन असेतो तो नासत नाहीं, कार्यप्रवण असतो. ही हृदयक्रिया

कशाने बद पडते. काय झालें म्हणजे ती क्रिया बद पडते ? क्रिया घडणारें हृदय तर तेथेंच असते. मग त्यातून काय जाते ? काय जातें याचा अद्याप विज्ञानाला शोध लागलेला नाही. पण अध्यात्मवादी म्हणजे चिंतनशील म्हणतात कीं, अदृश्य असा आत्मा हें हृदय धारण करून चालवीत असतो. साकार, सजीव देह हे या आत्म्याचे घर असून तो त्याचा स्वामी असतो. घर पडावयास झाले, जीर्ण झाले कीं, तो ते सोडून जातो व दुसरें आपले इच्छेनुरूप बाधतो.

## याला पुरावा काय ?

याला पुरावा काय ? बाह्य सृष्टींत आपण पहातो कीं, घर हे स्वतःचे मालक नसून त्याचा मालक ते बाधतो व त्यात राहून त्याचा उपभोग घेतो, व तें कालांतरानें पडकळीस आलें तर सोडून दुसऱ्या घरात जातो. मग या प्रपचात घडते तेंच ब्रह्माडातहि घडत असेल काय ?

शास्त्रज्ञ मोठ्या दुर्बीणींतून पाहून सागतात कीं, आकाशाच्या अनत अवकाशात आपल्या सूर्यमालेसारख्या अनंत माला, काही बनत आहेत, काहीं फिरत आहेत, काहीं नाशाप्रतहि जात असतील. मग हा विराट कारखाना चालविणारा कोणी असावा काय? घर बाधावयास तर मालमसाला, मजूर लागतातच पण तें सर्व जमविणारा मालक लागतोच. जीवनमात्राचें असेंच असेल काय ? मग तो आत्मा कोठे गवसेल ? कोठें दिसेल ?

## त्याचे स्वरूप काय ?

त्याचें स्वरुप काय ? विज्ञानाला त्याचा शोध लागला नाही. चिंतनशील म्हणतात कीं, ब्रह्माडात एकच सर्वव्यापी आत्मा आहे. अदृष्य आहे पण सत्य आहे—त्याचे आधारावरच ही सृष्टि साकार होते, कार्यप्रवण होते. तिचा आकार तोच. तोच तिचा निर्माता, धारण करतो व ती खराब झाली कीं तिचा नाशहि तोच करतो. नाशातूनच पुन्हा जनन पहा आपण धान्य वगैरेंचा पोटात फडशा पाडतो त्यातूनच रक्त निर्माण होऊन शरीरातील पेशी निर्माण होऊन शरीर कार्यप्रवण करतात. ते जर्जर झाले कीं, तो त्यातून जातो. मृत मासे मानवाचे रुचिर अन्न होतात हें आश्चर्य नव्हे काय ? एक सजीव जीवन— भक्ष्य व्हावे ही काय अजबलीला आहे ? ही रचना कोणी केली ? कशी चालली आहे ? मग लहान लहान "पिडात" हे जें चालले आहे तें "ब्रह्माडात" ही चालू असेल काय ? हें चालू ठेवणारा कोणी बुद्धीमान् रचनाकार व कुशल इजीनीयर या विश्वात असेल काय ? हे सृष्टीयन्त्र किती बिनचूक चालू आहे ? सेकदाला सात मैल हा पृथ्वीचा वेग व अनत अवकाशात एकटी जडपृथ्वी एकाद्या चेंडू सारखी फिरते आहे व ज्या सूर्याभोंवती ती फिरते ती कोणत्या बधनानें ? अदृश्य शक्तीनें जिला आम्ही गुरुत्वाकर्षण म्हणतो. पण समजत मात्र काहींच नाही. हें आकर्षण कशाचें ? कोणी निर्माण केलें ? इतकें बळकट कसें ? या अनत अफाट पोकळी पलीकडे काय आहे ! कोण जाणें ! आईची ओळख नसलेलें बालक तिला कसे चिकटतें, तिच्यावाचून त्याचे

प्राण कसे कासावीस होतात? जन्म देण्यापूर्वी ज्याला पाहिलेहि नसते त्या बालकावर आता जीव की प्राण का करते. त्याचा गू, मूत, हौसेने काढतें. रक्ताचें दूध करून त्याला पाजून मोठा करतें, व त्याचे सुखात स्वतःला विसरते. हे कसलें आकर्षण?

**ही माया निर्मिणारा कोण?**

ही माया कोणी निर्माण केली? ही नसती तर या सृष्टीवर जीवजगलाच नसता. ही चतुर योजना कोणाची? व ती चालू ठेवणारा पोशिंदा कोण? हे प्रेमाचे ततु चतुरपणे विणणारा व त्याचे माया जाळात सृष्टीचा मखमाली जरतारी रंगीबेरंगी झगझगीत शालू विणणारा कोण? मुरलीच्या बाबूतून गोडस्वरालाच काढणारा, आकाशाच्या फलकावर चित्र-विचित्र आकृती ढगाने काढणारा व दिवसभर बेमालूम रंगाची खुलावट करून सायकाळी पडद्याआड करणारा हा महान् चितारी आहे तरी कोण? कोणीया पृथ्वीच्या आसाला २३ अशाचा झोक देऊन ऋतूची निर्मिती केली व त्याच्या सयोजनेने जीवमात्राला लागणारे अन्नाची निर्मिती केली? पृथ्वीचें एक लहानसें ढेकूळ आकाशात फेकून रात्रीच्या अंधारात सर्वांना शीतल प्रकाश देणारा जीवत फिरणारा दिवा— तैल न बत्ती विझुनहि जाती— असा कोणी पृथ्वी भोंवती सतत तेवत ठेवला. की ज्याकडे पाहताच हृदय उचबळतें काय आश्चर्य आहे की, शास्त्रज्ञांचे मतानें पृथ्वीचे एक ढेंकूळ दूर आकाशात फेंकले गेले व त्याचे वर सूर्याचा प्रकाश पडून तो परावर्तित प्रकाशच ज्याला आपण चद्रिका म्हणतो. कुठें सूर्याचे भाजणारे तप्त किरण आणि चद्राचे शीतल चादणें!

**ही निर्मिति कोणाची?**

एकाच वस्तूची इतकी भिन्न अनुभव देणारी दोन रुपें कोणी निर्माण केली? उत्तर ध्रुवाजवळ ६ महिने काळोख्या रात्रींत जीवाला दिलासा देणारी ती विजेची रंगीबेरंगी झालर आकाशात कोण निर्माण करतो? कशाला निर्माण करतो? जन्माला घातलेल्या जीवाची कोण एवढी काळजी घेतो? व्यवहारात बाप जसा नाना नव्हेचे कष्ट करून आपण निमित्तमात्र झालेल्या प्रजेसाठी रात्रंदिवस झटत असतो तसाच ब्रह्मांडात या विश्वसृष्टीचा ससार सुखाचा होण्यासाठींच ही अनंत सुख समृद्धीची रेलचेल मोठ्या चतुराईनें कोणी बरे निर्माण केली असावी? तो परम दयाळु कनवाळु परमेश्वर या सज्ञेला प्राप्त झालेला कोणी तरी महान् चतुर, शक्तिशाली, सृजनशील महान् असलाच पाहिजे. चिंतनशील म्हणतात तो आहेच. तोच परमेश्वर व हेंच पिंडी तें ब्रह्मांडीं.

—०—

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांचें वर्ष एप्रीलपासून सुरू होते व ज्यानी अद्याप श्रीसाईलीलेची वर्गणी पाठविली नसेल त्यानी कृपा करून यापुढे विलंब न लावतां ती पुढील पत्यावर स्मरणपूर्वक पाठवावी अशी नम्र विनती आहे.

वर्गणी पाठविण्याचा पत्ता:—व्यवस्थापक : श्रीसाईलीला साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, मुंबई १४.

—व्यवस्थापक

# ' ईश्वरविषयक विचारांचें ' विडंबन

लेखक—हरिभाऊ जोशी

वार्षिक परीक्षा जवळ आल्यानें मी माझ्या नातवंडाशीं सहज बोलत होतो.

' काय अभ्यास वगैरे केला आहेस का ? पास होणार का ? ' मी माझ्या नातवास विचारिलें.

' हो, आता परीक्षेची तयारी आहे यदा क्लास मिळवून दाखवतो ! ' तो उत्तरला.

' निकाल लागेपर्यंत तू आम्हाला बनवू शकशील ! पास झालास म्हणजे मिळविले. '

' अहो तो काहीं अभ्यास करीत नाही. नुसत्या थापा देतो आहे ' मध्येंच माझ्या नातीनें आपल्या वडीलभावाच्या अभ्यासाबद्दल निर्वाळा दिला.

' तू मधे बडबडू नकोस, तू किती अभ्यास करतेस ते ठाऊक आहे, मी यदा १ ल्या वर्गात येईनच, तू बैस ' हरि विठ्ठल ' करीत '

' तू बडबडू नकोस '

अशा प्रकारे बहिण भावंडाची थोडी जुपली होती तोंच फुलवाल्याने फुलाचा पुडा आणून टाकला व पैसे मागितले.

## कशाला पुडा घेता ?

' कशाला उगाच पुडा घेता. रोज कोणी पूजा करीत नाहीत किंवा फुलांचा पुडा हा सोडलेला असत नाही, ' नातवाने सर्वांच्यावर टीका करण्याचें झोकात निवेदन केले. नातीनें फुलाचा पुडा उचलून धुवून तो मोडून देवापुढे नेऊन ठेवला.

' पूजा कोणी करीत नाहीं होयरे ? खोटें बोलतोस ? तुला काय झाल करायला ! ' नातीने सवाल केला.

' तू कर ! तुला पास व्हायचं म्हणून परिक्षेच्या वेळेपुरती ती पूजा करीत असते '

दोन्ही बहीणभावंडे १४ वर्षांचे आतील वयाची. पण त्याच्या प्रश्नोत्तरात थोडें परिस्थितिदर्शन होत होतें; घरोघरीं देव–देव्हारे नाहींत असे मध्यमवर्गीय कुटुंब सापडणें कठीण ! पण त्याचबरोबर शहरी जीवनात त्या देवाची पूजा होते कीं नाही हें पहाण्याला कुटुंब प्रमुखास सवडहि नसते. त्याची त्यावर श्रद्धा आहे कीं नाही हेंहि त्यास माहीत नसते, किंवा श्रद्धा म्हणजे काय हा विचारहि फार थोड्यानीं केलेला असेल. श्रद्धा किंवा विश्वास असला तरीं नोकरवर्गानें पूजेची नोकरी बहुधा बायकाचेकडेच सोपवलेली असते. शेंकडा एखादा कुटुंब प्रमुख स्वतः पूजाअर्चा समजून उमजून करीत असेल तसेच शेंकडा एखादा मनुष्य विचारपूर्वक मी देव मानतो–मानीत नाहीं, असें म्हणत असेल. हे प्रमाण कदाचित् हजारात एक, असेंहि पडेल. या दृष्टीनें माझ्या नातवंडाच्या भाडणांतील वाक्याकडे माझें लक्ष लागले होते.

'मी कशाला पूजा करीन? मला तें कांहीं पटतच नाहीं, तुला वाटतंय तर तू कर! परीक्षा झाल्यावर किति दिवस करशील तें पाहीन.' नातवानें सांगितलें.

**प्रश्न**—'तुझा विश्वास नाही म्हणजे काय? आणि ती –( नात ) परीक्षेसाठी पूजा करते म्हणजे काय?'

**उत्तर**—'आपल्याला काही कळत नाही. आणि पूजा करीत नाही, करणार नाही. ती तुळशीपत्रे तोंडात ठेवून परीक्षेला जाते.'

**प्रश्न**—'तुळशी पत्र कशासाठी?'

**उत्तर**—'ते तिला विचारा'

**माझी अंतर्मुखता**

'हो! मीच काय आम्ही कितीतरी मुली तसेंच करतो' नातीनें प्राजलपणें उत्तर दिलें. त्याचा संवाद थोडा वेळ चालला व त्याच्या श्रद्धेचा तो प्रश्नहि गुद्दागुद्दीपर्यंत पोचण्यासहि फार वेळ लागला नाही. पण १०।११ वर्षांची ही मुलगी परीक्षेस जाताना तुळशीपत्र तोंडात घालून जातें ही माहिती मला नवीन होती. वर्गांतील बहुतेक मुली असेच करतात, ही तिने दिलेली माहिती मला विस्मयकारक वाटली व त्या लहानशा संवादामुळे मी थोडा अंतर्मुख झालों.

पुण्यातील एका शाळेतील बऱ्याच मुली परीक्षेसाठीं तुळशीपत्राचा आश्रय घेत असतील; कदाचित् तीं शाळा तुळशी बागेला जवळ असेल. बेलबागेजवळचे विद्यार्थी परीक्षेचा संकट–सागर–तरून जाण्यासाठीं बिल्वपत्राचा आश्रय करीत असतील. यावर माझा विश्वास नव्हता. सध्याच्या मुला—मुलींचा देवावर असा विश्वास असेल यावरच माझा भरवसा बसेना. मुलाच्या विचार व भावनाच्या क्षेत्रापासुन निदान मी तरी इतका दूर गेलो होतो. पण त्या विचाराने धक्का देऊन मला माझ्या लहानपणाच्या भावनाचे स्मरण करून दिले व मीहि पुण्यात गावापासून मैल दीड मैल दूर असलेल्या एका दत्त मंदिराकडे नियमितपणे कसा जात होतो व एकदा परीक्षेचे दिवसात प्रदक्षिणा घालीत असता माझ्यापुढें वरून उत्तर पडले व ते मी महाप्रसाद म्हणून पुष्कळ दिवस जवळ कसें ठेविले याचे स्मरण झालें. या घटनेस आता पन्नास वर्षे लोटून शास्त्र युगाचा इतका बोलबोला चाललेल्या काळातील ही तिसरी पिढी आहे. त्याच्या ईश्वरविषयक विचारात ( कल्पनात ) काही बदल झालेला दिसत नाही. किंबहुना त्यातील विकृति अधिक वाढलेली आहे असे वाटलें.

ईश्वरविषयक विचार हा मानवी शरीरातील भावना इतकाच सत्य स्वरूपाचा आहे; असे असताहि जुन्या पगडी, जोड्या इतक्या उपहासानें किंवा अनादराने त्याकडे समाजनेते पहात असतात. हा अनादरहि खरा नसून तो बाह्यात्कारी असतो. बाह्य आचारातून देवदेवता, पूजाअर्चा या गोष्टी परिस्थितिमुळें निघरून गेल्या असल्या तरी मनांतील भावना तशाच राहिलेल्या व वाढलेल्या असाव्यात,

जितकी असहाय्यता वाढते तितकी श्रद्धाहि वाढत जाते. हें बरें का वाईट हा प्रश्न नसून ही सत्य स्थिति आहे. अशा परिस्थितींत या विषयींचें शक्य तें शास्त्रीय ज्ञान देण्यानेंच समाजहित साधतां येईल.

या दृष्टीनें या विषयाचा विचार करणें जरूर आहे.

**देवाला फेंकून द्या म्हणणें सोपें !**

हा विषय मानवी समाजाच्या इतिहासाइतका जुना असून त्यावरील वाङ्मयहि जगांतील कोठल्याहि इतर वाङ्मयापेक्षा अधिक असावें. तेव्हां त्याविषयीं विचार झालेला किंवा चाललेला नाहीं असेंहि नाहीं. पण तो फार अपुरा किंवा विपरीत स्वरूपांत चाललेला असतो. पुजारी, पुराणिक, मुल्ला मौलवी, पाद्री यांच्या पोटार्थी प्रचारांत तो गुरफटलेला आहे. आमच्याकडे ईश्वर विचार हा धर्म विचाराचाच एक भाग आहे; व जुना धर्म विचार हा इतका काल-विसंगत झाला आहे कीं, त्यामुळें धर्म ही खरोखर अफूच्या गोळीप्रमाणें धोक्याची वस्तू आहे असा समज रूढ होत आहे. कांहीं अंशी तो खराहि आहे. काल-परिस्थितिप्रमाणें आचार धर्मात बदल न केल्यामुळें बूट-पँट आदि अद्यावत आंग्ल पद्धतीच्या पोषाखावर डोकीस पांढरी बांधीव पगडी-फेंटा-व त्याखालीं आंत शेंडीची मोठी किंवा छोटी गांठ ठेवणाऱ्यांप्रमाणें आमचें आचारधर्म हास्यास्पद होत गेले व त्यामुळें ते फेंकले गेले ही अटळ अशीच बाब होय. पण धर्माचार व त्यास मूलाधार असणारी ईश्वरविषयक श्रद्धा या दोन भिन्न गोष्टी होत. आपली कपड्यांची पद्धति आपण बदलत आलों आहोत. पण शरीर रक्षणाची गरज त्यामुळें कमी अधिक झालेली नाहीं. तद्वतच आपल्या शरीराच्या मूलभूत भावना व गरजा यामध्येंहि बदल होऊं शकलेला नाहीं. बदल बाह्यस्वरूपांत कमी अधिक होऊं शकतो. पण मूलभूत घटकांत नाहीं.

ईश्वरविषयक विचार हा असाच भावनेचा एक खंबीर असा भाग आहे. घरांतील मूर्ति फेंकून देण्यानें किंवा मंदिरें पाडून टाकण्यानें या श्रद्धाभावनेवर फारसा परिणाम झालेला नाहीं. फक्त योग्य अशा तत्वप्रचारकांच्या प्रचारामुळें, साधुसंतांच्या आचारामुळें सर्वव्यापक अशा ईश्वरी शक्तीकडे विचारी समाज वळत जातो; त्या विषयाचा शास्त्रीय अभ्यास करतो व आत्मशांतीरूपी मुक्तीचा-समाधानाचा-अनुभव लुटतो. ईश्वराच्या शास्त्रीय विचाराची समाजस्वास्थ्यास फार जरूर आहे.

देव फेंकून द्या म्हणण्यानें ते फेंकले गेलेले नाहींत; किंवा शेंकडो नव्हे पण हजारो वर्षे जीव-ब्रह्म-सगुण-निर्गुण-विश्व व विश्वसंचालक याविषयीं विचारमंथन व प्रचार चालू असतां त्यांचें खरें ज्ञान लोकांपर्यंत पोचलेलें नाहीं. जातिधर्मादि संकुचित विचारांच्या पकडींत सांपडलेल्या भारतीय समाजामध्येंच ही वैचारिक दैन्यावस्था आहे असें नसून एकेश्वरी विचाराखालीं नांदणारा इस्लाम किंवा ख्रिस्तानुयायी समाज हाहि

कोणत्याहि दृष्टीने या बाबतीत प्रगत नाही. विशेष आश्चर्याची गोष्ट ही की, सामाजिक जीवनातून धर्मकल्पना किंवा धर्मगुरू याचे समूळ उच्चाटन करून टाकणाऱ्या साम्यवादी कम्युनिस्ट देशामध्येंहि सध्या चर्च व धर्मगुरू याची अधिक चलती आहे असें दिसते. तेव्हा हा विषय एक जीवनविषयक गरजेचा विषय आहे हें स्वीकारून त्याला शिक्षणक्रमात योग्य ते स्थान दिले जाणें अवश्यक आहे. हा विषय म्हणजे आचार धर्म विषय नव्हे, त्याचाहि योग्य तो विचार व्हावा. पण ईश्वरविषयक विचार हा सुलभ करून तो शिक्षणात कसा आणावा हा विचार महत्वाचा आहे.

## विपरीत-पणाचें स्वरुप

माझ्या नातवंडाचें सवाद ऐकल्यावर वाड्यातील आठदहा मुलाना मी तेच प्रश्न विचारले. त्याची उत्तरें साधारणतः एकाच प्रकारची होती. बहुतेक सर्व मुलें परीक्षेच्या-वेळी देवाची कदर या ना त्या रूपानें ठेवीत असल्याचें त्याच्या उत्तरावरून दिसलें. देव म्हणजे काय,त्याची भीति कां बाळगावी? किंवा तो आपल्या उपयोगी पडेल कशावरून? तो पावेल म्हणजे काय? तुमच्या चुकलेल्या गणिताची उत्तरें बरोबर धरण्याची बुद्धि परिक्षकाला होईल का तुमचा पेपर तपासताना तो वेशुद्ध राहील, का १२ मार्क देण्याऐवजीं चुकून २१ लिहिल? तुमच्या ईश्वर प्रार्थनेचा परिणाम कोणावर कसा होईल हें प्रश्न त्या मुलाना विचारणे हे, त्या मुलाच्या ईश्वरविषयक ज्ञानाइतकेंच मनुष्य स्वभावाचें आपल्यास ज्ञान आहे याचें निदर्शक ठरेल. मुले निदान खुळया समजुतीने तें करतात, परतु सारा प्रौढ समाज इतर बहुतेक क्षेत्रात विचाराने वागत असता या श्रद्धा क्षेत्रात मात्र त्या मुलाच्या-पेक्षा फारसा वेगळ्या रीतीने वागत असल्याचें दिसत नाहीं. समाजातील समजस समजला जाणारा वर्गहि ज्या क्षेत्रात मुलासारखा किंवा अडाण्यासारखा वागतो. त्या क्षेत्रांतील अज्ञान हा एक चिंतेचा विषय ठरला पाहिजे. या विषयीं चिंता वाटणें दूर राहिलें पण त्यात काही चुकत आहे असेंहि मोठमोठ्याना वाटत नाही. कदाचित् येथे कोणींहि कशीहि बॅट चालवली तरी हरकत नाही असेंच क्रीडाक्षेत्र असेल. विचारवताला हे पटणार नाहीं. समाजात ईश्वर विषयक विचाराचें जें भयावह अज्ञान आहे त्याचे फार मोठे दुष्परिणाम भोगावयास लागतात. वाड्यातील मुलाची चांचणी घेतल्यानतर एका चागल्या शिक्षकास विचारले तेव्हा त्याने बाल विद्यार्थीच काय पण कॉलेजमधील प्रौढ विद्यार्थीहि परीक्षेचें वेळीं कसें अपरिहार्यतेने देव-भक्त बनतात याची उदाहरणे सागितली. याचा अर्थ जीवनातील महान् सकटापैकीं परीक्षा ही एक जीत आमच्याकडे बनली आहे हा एक भाग लक्षात घेण्याजोगा आहे.

## सर्वत्र हाच अनुभव

ज्याला परीक्षेची भीति नाहीं अशा एखाद्या शेटजीच्या मुलाला परीक्षेच्या वेळीं देवाची आठवण कदाचित् होणारहि नाहीं! 'पण' खिशांतील एक अधेली

हरवल्यास त्याला घेरी येईल व तो ती सापडून देण्यासाठीं परमेश्वराचा धावा करील. देवाच्या आठवणीचे कारण फक्त बदलले, दोघाच्या संकटकालातील श्रद्धेची वस्तू एकच; भले चार्वाक विचाराप्रमाणें तो काल्पनिक किंवा दुर्बलपणा-तून निघालेली असली तरी त्यावेळीं त्या आधाराची त्या मनाला जरूर लागते व ती श्रद्धा अगर तो विश्वास ( अंध ) यामुळे तो निभावूनहि जातो.

हा जो विद्यार्थी विषयक विचार झाला तोच अनुभव समाजात सर्वत्र येतो. प्रात भेद, परिस्थिती भेद याप्रमाणे या श्रद्धाविषयात वेगवेगळे प्रकार दिसून येतील. पण सर्व सामान्यतया संकटमुक्ती व सौख्यसाधन यासाठीं समाजातील किमान पंचाण्णव टक्के लोक ईश्वरकल्पनेचा वापर करीत असावेत. एखादा टक्का 'आत्मकर्तृत्व' हीच शक्ती असें मानणारा असेल, दोनचार टक्के काही आकलन न होणारे असे असतील. या पंचाण्णव टक्क्यामधे पाच टक्के संस्कारनें किंवा समजुतीने ईश्वर म्हणजे विश्वाच्या चालनेमागील सूत्रधार असे ओळखून त्याची आराधना कदाचित् करीत असतील. बाकीच्या नव्वद टक्क्यामधे सुमारे ऐंशी टक्के अज्ञानजन्य अशा पूजाअर्चेत लिडबिडले असावेत व दहा टक्के लोकाना उपासपोटच्या वेदना दृष्टिआड करण्याचे कामीं देव कदाचित् उपयोगी पडत असेल. हीं आकडेवारी बरोबर आहे, असा दावा करण्याचें कारण नाहीं. सर्वसाधारणपणे फार प्रचंड समाज विपर्यस्त अशा विचाराच्या जबरदस्त पकडीत असता त्यातून त्याला सोडविण्याची जरूर समाज नेत्याना दिसत नाही. कदाचित हजारों वर्षांचे प्रयत्नाची असफलता पाहून त्या विषयात पदार्पण करण्याची कोणास जरूर वाटत नसावी. पण या विषयींच्या अज्ञाना-मुळे मानव समाजाचे स्वास्थ्य धोक्यात येत आहे व ईश्वर विषयक यथार्थज्ञान झाल्यास मानव अधिक सरळ मार्गाने जाण्याचा संभव वाढेल, या दृष्टीने या विषयाकडे पहाणें जरूर आहे. ही निकड पटण्यासाठीच आपल्या सभोंवारच्या या हास्यास्पद परिस्थितीची थोडी अधिक जाणीव होणें जरूर आहे.

### देव माझ्या कुऱ्हाडीत आहे

मनुष्य केवळ अडचणीच्या परिहारार्थ किंवा न्याय्य सौख्य प्राप्तीसाठी देवाची आराधना करतो असें नाही, समाजात जे पाप समजले जातें अशा पापकर्मात यश यावें यासाठीहि आसक्त मनुष्य दैवी शक्तीचे सहाय्य भाकीत असतो, तसे सहाय्य लाभेल अशा भरवशावर कर्मप्रवृत्त होत असतो. हा प्रकार समाजहिताचे दृष्टीने भयावह होय दरवडा घालण्यास जाणारा मनुष्यहि देवाचे नाव घेऊन आपल्या उद्योगास निघतो व यश मिळवल्यावर आपल्या परंपरेनुरूप देवाला बकरे–कोंबडे देत असतो. खुनाच्या गुन्ह्यासाठी शिक्षा भोगणाऱ्या एका कुटुंबातील सहासात कैद्याशीं बोलत असता असें आढळून आले की, त्यापैकी एकानेंच उत्तर दिलें की माझा देव माझी

कुऱ्हाड होती. ते पिवळा–टोपी म्हणजे प्रदीर्घ शिक्षेचे कैदी होते. जबरदस्तीने मिळवलेली जमीन आपल्याच ताब्यात ठेवण्यासाठीं त्यांनीं मारामारी केली होती व त्यात दोनतीन मृत्यूहि झाले होते असें वाटते. आपण यशस्वीरीत्या खून पचवलें म्हणून त्यांनॉ सत्यनारायणहि केला होता. पण खुनाला पुढे वाचा फुटली व खटला होऊन ते शिक्षा भोगीत होते. त्या सातापैकीं एक वृद्ध व अंध झालेला होता. त्याने व 'कुऱ्हाडी'ला देव मानणाऱ्यानें आपण खरोखर गुन्हेगार होतो हे कबूल केलें. दंगलीच्यापूर्वी व नंतर आपण देवाची किती आळवणी केली होती तें त्या वृद्ध-गृहस्थाने रसाळपणे सांगितले होते. तो खुनाचा गुन्हेगार तर होताच. पण समाजातील इतर कोणत्याहि सभ्य मनुष्या इतका तो सभ्य व स्नेहशील असा होता असा माझा समज तीन महिन्याच्या परिचयाने झाला होता. पण इतक्या भयानक कृत्याशीही देव मदत करूं शकतो असे गुन्हा करतेवेळी त्याला वाटत होते. आणि समाजात असे कितीतरी गुन्हेगार सापडतील की, ते गुन्हे पचवण्यासाठी देवाला वाटेल ती लाच पोचवण्यास तयार असतात, तिलाच पोचवयाचा धंदा करणाऱ्या दलालावर भरवसा ठेवणे हाहि या लोकाच्या श्रद्धेचा भाग बनलेला असतो. एका तरुण व सुस्वरुप मुलाच्या शरीर विक्रमावर पोट भरणारे दोन प्रतिष्ठित समजले जाणारे प्राणी होते. त्या मुलीला लोभ बुद्धीनेंच एकानें पळवून नेली. मुलीचा बाप आपली मुलगी आता सापडू नये, त्यामुळे जाहीर रीत्या बेइज्जत होईल, म्हणून देवापुढे धरणे धरून बसला होता; पोलिसानाहि फसवीत होता; ज्यानें तिला पळवून नेले होते तोहि आपण सापडू नये म्हणून पोलिसाप्रमाणेच देवालाहि रोज लाच पोचवीत होता. ही सत्यकथा असून या खटल्यातील सबंधी माणसे पांढरपेशा वर्गातील होती. समाजातील सर्व थरात या स्वार्थजन्य अंध भावनेचा सर्वत्र संचार असल्याचें आढळून येईल. आणि हा विषय सर्वांच्या कातडीपर्यंत पोचत असल्यामुळेच त्याचा कोणी विचार करण्यास धजावत नसतील. एखाद्या राजघराण्याच्या वारसाप्रमाणेच म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षपदासाठी किंवा मंत्रिमंडळातील एखाद्या जागेसाठी जशी अचाट कपट–कारस्थाने चालतात त्याचप्रमाणे तेथें देवधर्माच्या सहाय्याचेहि प्रयत्न दुर्लक्षिले जात नाहींत. मध्य सरकारातील मंत्रिपदाच्या एका जागेसाठी प्रयत्न करणारे दोन उपवर रातोरात एकाच सत्पुरुषाचे स्थानदर्शनासाठीं धावले होते अशी एक आख्याइका आहे.

दरोडेखोरापासून मंत्र्यापर्यंत मुलापासून तो महंतापर्यंत सर्वांना भल्या अगर बुऱ्या सर्वच कामांत आपल्यास सहाय्यक होऊं शकेल असा भ्रम हजारो वर्षेपर्यंत चालू ठेवू शकणाऱ्या परमेश्वराची लीला अगाध नव्हे तर काय? ही अगाधता परमेश्वरी लीलेचीच खास होय! फक्त अशी हीतश्रद्धा युगानयुगें टिकू देण्यामध्येच ही अगाधता आहे इतकेच.

## ज्ञानाची उपेक्षा केल्याचें पर्यवसान

ईश्वरविषयक ज्ञान हेंच उद्दिष्ट, आर्यवाङ्मयाचें निर्माते ऋषिमुनी, दर्शनकार किंवा भाष्यकार व नंतरचे भागवतधर्माचें पुरस्कर्ते संत महंत, यांच्या पुढें होते जड व सृष्टि व सर्व विश्व व त्याचें ससूत्र संचलन यांचा परस्पर संबंध काय हें समजून घेण्यासाठी महान् तत्वचिंतकांनी व संतांनी हजारो वर्षें प्रयत्न केले व आपले अनुभव समाजासाठी पोचविले. भारतानें किमान पक्ष पांच हजार वर्षें हा ज्ञानयोग चालवला व आपल्या अनुभवाचें ' दर्शन ' जगापुढें ठेवलें. ज्या देशांत असा हा अपूर्व ज्ञानसंग्रह आहे तेथेंच किंवा तेथेंहि इतक्या विपरीत अज्ञानाचें तांडव चालू रहातें हा एक दैवदुर्विलासच म्हणावा लागेल. वैदिक परंपरेची सुमारें गेली दीड वर्षें सक्त व संकुचित जातिधर्मांच्या पकडींत गेला हें खरें असलें तरी ज्या वरिष्ठ वर्गांना हें सर्व ज्ञान मुक्त होतें त्या उच्चवर्णीयांचीहि या क्षेत्रांतील आजची स्थिति कनिष्ठ वर्गापेक्षा वेगळी नाहीं. हेंहि सहज लक्षांत येईल. कोणी जंगलांतील अनात्मक दगडाला शरण जाऊन दरोडा घालण्यास निघेल तर उच्च वर्णीय महादेव मल्हारी किंवा बजरंग भगवान हीं नांवें घेऊन भलीं बुरीं कृत्यें करण्यासाठीं ईश्वरी शक्तीचें सहाय्य अपेक्षितील. आपल्या आत्म्यासाठीं चांगल्यासाठीं ईश्वराची करुणा भाकणें हे वेगळें, तसा विचार केल्यास वेदकालांतील बहुतेक प्रार्थना मानवी संसार सुखाचा करण्यासाठीच आहेत. धन धान्य पुत्रपौत्र संपत्ती व आनंद यांची अपेक्षा ही रास्तच होय ! पण ती देण्यासाठीं ईश्वरी शक्तीची आराधना कशासाठीं ? या वैदिक प्रार्थनेंत सावकारानीं आपल्या पासून फाजील व्याज घेऊनये अशाहि प्रार्थना आहेत. जन्म व मृत्यू यांच्या न उलगडणाऱ्या कोड्यामुळें मनुष्याची दृष्टी त्या अदृष्टावर खिळून रहावी व निसर्गावरच विसंबून रहाव्या लागणाऱ्या समाजानें अग्नि-वरुण-सूर्य यांच्या प्रार्थना कराव्यात हें स्वाभाविक होय. बॅंकस्ट्रीट किंवा बॉंडस्ट्रीटवरील करोडोपती आपलें भांडवल जगभर फेकतांना ईश्वराचें स्मरण करीत नसणार; साखरेच्या कारखान्याप्रमाणेंच दारुगोळ्याच्या कारखान्यासहि तो समदृष्टीनेंच पैसा पुरवतो. पण तोहि चर्चमध्यें प्रार्थना कशाकशाची करतो ? सर्व विज्ञान शास्त्रज्ञ विश्वाच्या घटनेमागील आदिशक्ति मानीत नाहींत असें नाहीं. विज्ञानानें होणाऱ्या संभाव्य संहारानें तेहि व्यथित किंवा घाबरे होतात हेंहि मधून मधून दिसून येतेंच. पण संहारभीतीनें आठवणारें मानवप्रेम वेगळें आणि ईश्वरी पितृत्वाच्या नात्यानें सर्वत्र जाणवणारा भ्रातृभाव वेगळा.

भारतांत या शुद्ध ज्ञानाच्या गंगायमुना हजारो वर्षें दुथडी भरून वाहिल्या. पण गंडकींतील शालिग्रामाप्रमाणें येथील समाज मन पूर्ण कोरडेंच राहिलें. इतकेंच नव्हे तर चोप्या संस्कारामुळें तें विकृत असें झालेलें आहे. ज्ञानाची उपेक्षा केल्यास ' घोर अंधेरांत धडपडाल ' हा इषारा देणाऱ्या ईशोपनिषदाची पारायणें करणारेहि या ज्ञानाची खरी उपासना करीत नाहींत, सगुण साकाराची पूजा; व सौख्यलाभासाठीं

याचना आपण करीत रहातो. आणि हाहि प्रार्थना कोणाची? देवाची, आमची बहुतेक सर्व देवळे, रामकृष्ण, शंकर—गणपति, मारुति —जगदंबा, आदि देवदेवतांची आहेत. ही सर्व पौराणिक दैवते असून त्यांच्या कथा—गोष्टी खेड्या-पाड्यातील सर्वांना माहीत आहेत. खेड्यातील ग्राम देवता तेथील नदी डोंगर यांच्या नावातून निघालेली एखादी देवता असते. एवंच रामकृष्ण किंवा मारुती महादेव हे पराक्रमी पुरुष होते व त्यांच्या मूर्ती म्हणजे हे पुतळेच होत. आता जर मारुती पुढे पुत्र प्राप्तीसाठी प्रार्थना करावयाची तर कालांतराने गांधी किंवा टिळक यांच्या पुतळ्या-पुढेहि केली जाईल. प्रश्न फक्त काळाचाच. स्टेशनवर जर सुंदर—हॉल असला व तेथे एक मूर्ति ठेविली तर तेथें आज द्विभाविक अश्र प्रार्थना—लाभ—याचना—करू लागतील. पण आजचा सुशिक्षित मनुष्यहि स्वसुखासाठी रामकृष्णादि सर्व देवता मूर्तींना अभिषेक आराधना पोचवितो, महाराष्ट्र संतांनीं एका विठ्ठलाकडे समाजाला नेण्याचा प्रयत्न केला व तोहि केवळ मुक्तिसाठीं; पण नियमाने वारी करण्यास जाणारा वारकरीहि मोक्षाची वाट पुसण्याऐवजीं पिकाला भाव येण्याची प्रार्थना करतो. जीवन कल-हाच्या झगड्याचाच प्रकार आहे व तो स्वाभाविक आहे. पण बाजार भावाची चौकशी मारुतीजवळ किंवा विठ्ठलाजवळ करून उपयोगी नाहीं. हें थोड्याशा शिक्षण प्रसारानें कळू शकेल. ईश्वरी शक्ति सर्वगामी आहे व ती निरंकुशहि आहे, याचा अर्थ ईश्वरी इच्छेनें सृष्टी व जमीन निर्माण झाली; ऊन मिळेल व पाऊस पडेल. बीज पेरल्यास धनधान्याची समृद्धि होईल. या घटनांत ईश्वराचे देणे कोणते व मानवी कर्तृत्वाचा—पुरुषार्थाचा—भाग कोणता हें जर 'ओळखले' नाहीं तर जगत निर्माण करणाऱ्या निसर्गाकडे—ईश्वराकडे—आपण खुर्ची-टेबल किंवा पिठलें—भाकरी पुरवण्याबद्दल प्रार्थना करू लागू. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' यातील उपहास चटकन लक्षांत घेणारा माणूसहि पुत्रप्राप्तीसाठीं गणपतीस अनुष्ठान करतो. हीं सर्व विपरीत ज्ञानाची लक्षणें होत.

आमच्या समाज मनावर दीर्घकाल तत्वज्ञान विचाराचे संस्कार झालेले आहेत. पण त्या दिव्यावर काजळी इतकी चढलेली आहे कीं तेथें वात पेटच घेत नाहीं. अज्ञानाची ही काजळी कातरून टाकल्यावाचून तेथें प्रकाश निर्माण होणार नाहीं.

## समाज धारणेस अवश्यक

वर उल्लेखिल्याप्रमाणें ईश्वर विषयक विचार हा अगदी उपहासाचा नसला तरी मागसलेला विचार असे सर्वसामान्यतया भासविलें जातें. अर्थात ही सुशिक्षित समाजाची समज अगर बतावणी आहे. पण ती अगदी वरपांगी आहे. हा सर्व सुशिक्षित समाज मनाने श्रद्धा असाच आहे. फक्त सध्याच्या बुद्धिवादी जगाची उसनी दृष्टी घेतल्यानें आचारात त्यानें देव दृष्टीआड केलेला आहे. त्यांच्या अंतरंगातील भावनांची मुळें हलविणे त्यांच्या शक्तिबाहेरील आहे. अशा कुचंबणेतून त्यांची सध्याची विकृती झालेली आहे. ईश्वरी सत्ता मानणें किंवा तिचा प्रभाव पडू देणें हा मानवी दुर्बलतेचाच परिणाम आहे ही

समज आता फारशी राहिलेली नाही. महा सामर्थ्यवान व्यक्ती व समाजहि वेगवेगळ्या क्षेत्रात ईश्वराधीन होण्यास तयार असतात, शेवटी ज्या मनःशांतीवर जीवनाचे यश अवलंबून असते ती शांति केवळ ऐहिकावर आधारित नाही हे तत्वचिंतकांना पटते.

आणि ईश्वरी शक्तीचे सर्वगामी स्वरूप हें पटवून घेणे हेहि फारसे कठीण किंवा बुद्धिनिष्ठेला बाधा आणणारे आहे असेहि नाही. ही श्रद्धा स्वभावतःच मनात असते. ती अज्ञानाने विकृत होत जाते, स्वार्थदृष्टीमुळे ती दूषित होते; त्याऐवजी सुलभ शास्त्रीय ज्ञानाची जोड देण्याने या स्वाभाविक श्रद्धेला खंबीर पाया लाभतो. ईश्वरी शक्ति ही मानवाचे कल्याणासाठीं आहे. कारण मानवाच्या कल्याणातच स्वतःचें कल्याण आहे. ईश्वर स्मरण व चिंतन हाहि एक मनाचा छंदच आहे. तो टाळता येणार नाही. त्या ईश्वराचे स्वरूप हें शेवटी ज्यांनीं अनुभव घेऊन इतरासाठीं वाट दाखवून ठेवली. त्याचेकडूनच समजून घेतले पाहिजे.

ज्यानी ज्यानी साऱ्या मानव समाजावर प्रभाव पाडला आहे त्यानी ईश्वरी सत्ता मानलेली आहे. ती ईश्वरी सत्ता समाजाचे फक्त भले करण्यासाठीं आहे. सर्व सृष्टीची अत्यंत सुसंबद्ध अशा व्यापार अविच्छिन्न चालू आहे याचाच अर्थ मानवाचे भलें करणें हीच त्या शक्तीची योजना आहे. त्या शक्तीचेच आपण एक घटक आहोत. या दृष्टीनें सर्व मानवच नव्हेतर सर्व जीव सृष्टि ही मातृप्रेमाने व्यापलेली अशी करणें हें सुसंस्कृत मानवाचें कर्तव्य आहे या ईश्वरी सृष्टीचा नाश किंवा संहार करण्यास सहाय्यक होणें म्हणजे एका हातानें दुसऱ्या हाताची हत्या करणे होय ! हें ज्ञानच सर्व तत्ववेत्त्यानी, संतानी सांगितलेले आहे. जगजेत्या सम्राटाचे भले बुरे शासन मानवाच्या स्मृतींत जेवढें आहे त्यापेक्षा अधिक ईश्वरविषयक विचाराचे ज्ञान त्यानें आपल्या मनोभूमीत संग्रहित करून ठेवलेलें आहे. दीर्घकालीन अनास्था—संभ्रम किंवा विपरीत संस्कार यामुळें त्यात भ्रष्टता आलेली आहे. फांद्या वेड्या वाकड्या झाल्या म्हणून झाड उपटून टाकावे लागत नाहीं; किंवा दात वेडेवाकडे आले किंवा डोळे तिरळे झाले म्हणून मुलाना कोणी मारून टाकीत नाहीं. ही विपरीतता नष्ट करणें कठीण नाही. फक्त सत्य व शुद्ध ज्ञानाची निकड आहे. ते समाजात न पोचल्यानें समाज आज रोगी बनलेला आहे हे पटले तरच या सत्यज्ञानाची उपासना रूढ होईल. गांधीजीनी तर ही श्रद्धा माझ्यातून नष्ट होईल तर मी जिवंतच राहू शकणार नाहीं, असें म्हटलें आहे. येशूनें सर्व यातना या श्रद्धेच्या बळावर आनंदानें सोसल्या. या ईश्वरी ज्ञानालाच सत्याची उपासना असेहि गांधीजींनीं म्हटले आहे. या सत्यज्ञानाला वेदात ' ऋत ' असे संबोधिलेले आहे व ऋत म्हणजे सर्व विश्वाचाससूत्र विकास घडवून आणणारी प्रेरणा शक्ति अस म्हटलें आहे. या शक्तीची ईश्वरी सत्तेची किंवा सत्याचीं उपासना करणे, त्याची नीट ओळख बाल मनाला वेळेवर करू देण्यानें जगाच्या धारण पोषणाला सहाय्य होईल. तें न करण्यात स्वतःची व जगाची हानी आहे.

———




## शिर्डीवृत्त फेब्रुवारी १९६२

या महिन्यात भक्ताची गर्दी शिर्डीस मागील महिन्याप्रमाणे बरीच होती काही कलाकारानी श्रीपुढे हजेरी दिली. ती खालील प्रमाणेः

**कीर्तन—**

श्री. ह. भ. प. रामराव पाटील मु॥ सावर गाव. ( डुकरे ) ता. चिखली. जि. बुलठाणा. ( वऱ्हाड ), श्री. ह. भ. प. दौलतबुवा मु॥ अत्री. ता. मल्कापूर जि. बुलढाणा ( वऱ्हाड ), श्री. ह. भ. पोपटबुवा लोहणेरकर मु॥ लोहणेर. ता. सटाणा. जि. नासिक, व संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे याची माघ शु. ११ माघ व. ११ व महाशिवरात्र अशी तीन कीर्तने या महिन्यात झाली.

**प्रवचन—**

श्री. धिरुभाई जगजिवनदास गढीया मंगलूर.

**गायनः—**

श्रीगायनाचार्य सुरेंद्रराव दादर मुंबई, श्री. वामन गोविंद आपटे दादर मुंबई, श्री. लीलाधर बी. पाटकर दादर मुंबई, सौ. कुसुमावतीबाई चद्रचूड बांद्रे मुंबई, श्री. चन्द्रकात प्रधान दादर, मुंबई, श्री. नरहरबुवा व्यास तळेगाव दाभाडे जि. पुणे, श्री. रत्नकात राजाराम पागम साखळी गोवा, सौ. वीणा वासुदेव लाभे चेंबुर मुंबई, श्री. प्रेमानद राघोबा आचार्य मुंबई, श्री. नारायण बी. भोरकर परेल मुंबई.

**गीतरामायण—**

श्री. सदाशिव मधुसूदन भिडे, मुंबई.

**पोवाडे गायन—**

श्री. शाहिर सुदामराव लातुरकर मु. कऱ्हाड जि. सातारा.

**बासरीवादन—**

श्री. देविदास बेल्लारी कल्याण जि. ठाणे.

**भजन—**

श्री. शंकरबाबा सोलापूरकर, सोलापूरकर. श्री. केशवराव कुलकर्णी, पुणे. श्री. काशिनाथ सावळेराम शितोळे, वरळी, मुंबई. श्री. बाळाराम पारकर, मुंबई. श्री. विनोद गीध, मुंबई.

**तबलावादन—**

श्री. गुरुदत्त मु. साकोरी. श्री. गोपिनाथ शिरसाठ, मुरवळी, मुंबई.

**हार्मोनियम वादन—**

श्री. विनोद गीध झंकार म्युझिक सर्कल मुंबई.

श्री. पुरुषोत्तम नरहर लोढे राहता.

श्री. विष्णुपंत–होनप दादर मुंबई.

**लोकनाट्य—**

श्री. दशरथ गणपत बडे. पागुळ ता. पाथर्डी. जि. नगर.

श्री. हिरामन गंगाराम कोळेकर, मु. भुसावळ.

( लिलाबाई मलकापूरकर पार्टी )

**मोठ्यांच्या भेटी—**

श्री. नामदार एस. एल. कदम उपमंत्री जंगल व दारु बंदी खाते महाराष्ट्रराज्य.

श्री. ना. के. पाटील, समाज कल्याण उपमंत्री महाराष्ट्रराज्य.

शिर्डीची हवा पाणी उत्तम. रोगराई नाही.

---

## कै. राजारामभाऊ रुमडे

श्रीसाईलीला मासिक ज्या छापखान्यात छापले जाते त्या रामकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे मनमिळाऊ मॅनेजर श्री. राजारामभाऊ रुमडे हे गेल्या महिन्यांत २०।३।१९६३ रोजी पायधुणीवर काही कामानिमित्त गेले असता तेथेंच अकस्मात् हृदयक्रिया बंद पडून निधन पावल्याचें लिहिण्यास आम्हाला दुःख होत आहे. कै. राजारामभाऊ आपल्या कामात दक्ष, स्वभाव नम्र व मनमिळाऊ यामुळें सर्वांना त्याच्याबद्दल प्रेमादर भाव वाटत असे. ते साईबाबांचे भक्त होते. त्याच्या निधनामुळे त्याच्या कुटुंबियाची, त्याच प्रमाणे ज्या प्रेसची त्यानी अनेक वर्षे एकनिष्ठपणें सेवा केली त्या रामकृष्ण प्रिं. प्रेसचे सहसा भरून न येणारे नुकसान झालें आहे. त्याच्या दुःखांत आम्ही सहभागी आहोत.

* उत्कृष्ट कागद * आकर्षक रचना

* स्वच्छ व सुबक छपाई

**बॉम्बे सेंट्रल प्रेस**

मुरलीधर टेंपल कंपाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं

जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकूरद्वार मुंबई २

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N S Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगाशेकरकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | **साईबाबा–अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. घोड | २–०० |
| (११) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपित) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | **स्तवन–मंजरी** | (मराठी) | श्री दासगणू | ००–१३ |
| (१६) | **श्री साई-सुमनांजली** | (मराठी १०८ नावें) | | ००–०६ |
| (१७) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R S Harshid Mehta | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng ) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (२३) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००–२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, , 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | , ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP and 37 nP for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs 15) *Can be had from* (मागवा):

1 **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
P O Shirdi Dst Ahmednagar

2 **Sai Baba Office 'Sai Niketan',**
Dr Ambedkar Road, Dadar, Bombay 14

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आम्बेडकर रोड, दादर, मुंबई १४ करिता
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते।

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रे, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४
संपादक व प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.